मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष १९ वे] मे १९६६ [अंक ८

वार्षिक वर्गणी ९ रु.] [किरकोळ अंक १ रु.

प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला

(१) धर्मकोश– व्यवहारकाण्ड भाग १ ते ३		किंमत
	साधी बांधणी	८०.००
	कापडी बांधणी	१०४.००
(२) धर्मकोश - उपनिषत्काण्ड भाग १ ते ४		
	साधी बांधणी	१५०.००
	कापडी बांधणी	१८२.००
(३) धर्मकोश– संस्कारकाण्ड भाग १ ला		४५.००
	कापडी बांधणी	६३.००
(४) मीमांसादर्शन		३०.००
(५) मीमांसाकोश ... भाग १ ते ६		२३०.००
(६) कौषीतकिब्राह्मणारण्यकविषयकोश		६.००
(७) बौद्धागमार्थसंग्रहः		२०.००
(८) हिंदुधर्माची समीक्षा (लक्ष्मणशास्त्री जोशी) ...		५.००
(९) वैदिक संस्कृतीचा विकास		६.००
(१०) नवमानवतावाद		२.५०
(११) मानवाचा आदर्श		३.००
(१२) चार्वाक– इतिहास आणि तत्त्वज्ञान		
	(प्रा. सदाशिव आठवले) ...	३.००
(१३) गीता-प्रवेश (डॉ. गो. वि. देवस्थळी) ...		२.५०
(१४) महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना		
	(श्री. चा. अ. दाभोलकर)	२.००

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष एकोणिसावे | अंक आठवा

नवभारत

मे १९६६

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर — प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

वार्षिक रु. ९ | सहामाही रु. ५ | अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
'गणेश भुवन' २७६, तेलंग रोड, माटुंगा–मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत ' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमराववाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

प्रा. मधुकर ना. लोही

नवकला (मॉडर्न आर्ट) : एक अभ्यास

[प्रस्तुत लेख हा Span च्या एप्रिल १९६२ च्या अंकातील William Snaith यांच्या Anguish of Modern Art या लेखाचा बराच स्वैर अनुवाद आहे— लेखक]

नवकलेसंबंधी भूमिका

नवकलेच्या भोवती घोटाळणारे तिचे पूजक पूर्णपणे तिच्या आहारी गेलेले पाहून खेद होतो. बौद्धिकता आणि भावना, तांत्रिकता आणि भावना-संक्रमण यांतील संघर्षाबद्दलचा प्रश्न उपस्थित करणे हेसुद्धा नवकलेच्या भक्तांना आक्षेपार्ह वाटते. नवकलेचे पुरस्कर्ते नवकलेच्या संप्रदायातील गूढतेची तरफदारी करताना जेव्हा अध्यात्मातील अमूर्ततेचा आणि अस्पष्टतेचा दाखला देतात, तेव्हा तर तिच्या वास्तव आणि सत्य स्वरूपाचा शोध करून अवबोध घेण्याच्या मार्गात मोठाच अडथळा निर्माण होतो. तरीही आजचा गोंधळलेला सर्वसामान्य रसिक नवकलेतील उत्क्रांतीच्या प्रक्रियेमुळे आध्यात्मिक अधिष्ठानाला मुकला असूनसुद्धा आजच्या आपल्या संस्कृतीच्या विकासार्थ तिची निश्चित गरज असल्याचे निमुटपणे प्रतिपादन करू लागला आहे !

भावनेला आवाहन करून रसिकांच्या मनात सहसंवेदना निर्माण करीत सौंदर्याचा साक्षात्कार घडवण्याच्या आपल्या कार्यापासून, निदान आज तरी, कला (Modern Art) परावृत्त झालेली दिसत आहे. हळूहळू ती सामान्यांकडून शिष्टांकडे वळत चालली आहे. कलेतील वैश्विकता (Universality) लोप पावत आहे. कलावंताची नवकला वैश्विकतेला पारखी होत असली तरी कलावंताने बौद्धिक सामर्थ्य आणि तांत्रिक कौशल्य मिळवले आहे. त्यातूनच सौंदर्याविष्काराच्या नव्या युगाची सुप्रभात होण्याचा संभव आहे. सध्या तरी नवनिर्मितीच्या प्रयोगाची प्रदीर्घ रात्र सुरू असून तिचा यातनामय अनुभव आपल्याला येत आहे. तरीही आपण नवकलेकडे वस्तुनिष्ठ पण आपुलकीच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करावा. स्थिरता आणि सांकेतिकता (Cant) यांचा त्याग करावयास हवा. प्रगतिशील नवकला समजण्याचा प्रयत्न करावयास हवा.

आजची कला निवडक व्यक्तींसाठी

मात्र ज्या कलेच्या–ईश्वरी भाषेच्या– माध्यमातून आजवर कलावंत सत्य आणि सौंदर्य यांच्या सहसंवेदना सर्व समाजाला घडवीत आला त्या कलामंदिराची दारे निवडक लोकांसाठीच उघडी असावीत हे मोठे दुर्भाग्य होय ! आधीच यांत्रिक प्रगतीमुळे खऱ्या कलेविषयी उदास बनत चाललेल्या आजच्या समाजाला मनोविनोदनासाठी कलेकडे वळवणे हे जिकीरीचे काम आहे. त्यातून वर्तमानकाळातील अधिकतर कला दुर्बोध म्हणून कंटाळवाणी होत असल्याचे प्रत्ययाला येत आहे. चित्रकलेतील निसर्गचित्रणाचाच विचार केला तर असे दिसून येते की पूर्वीचा कलावंत त्याच्या मनावर होणारे निसर्गाचे संस्कार चित्रित करीत असे तर आजचा चित्रकार आपल्या कल्पनेतून रेघोट्यांचा एक चक्रव्यूह निर्माण करीत असतो. त्या चक्रव्यूहाचा भेद करण्याची युक्ति मात्र रसिकाला अवगत नसते. साहजिकच कलेचा आस्वाद आणि आनंद, कलेशी एकरूपता आणि एकात्मता यांना आजचा सामान्य प्रेक्षक व रसिक पारखा झाला आहे. कला ही जनतेचा संपर्क टाळण्याचे साधन बनत चालली आहे.

एक स्पॅनिश तत्त्ववेत्ता– Ortega y Gasset– म्हणतो- " एखादी कलाकृति रसिकाला समजली पण आवडली नाही तर आपल्या चोखंदळपणाबद्दल त्याला अभिमान आणि आनंद वाटतो. तथापि, एखादी कलाकृती आवडली नाही आणि समजलीही नाही तर रसिकाला तो आपला अपमान वाटून क्रोध येतो. गूढता आणि दुर्बोधता यामुळे आपण शुद्ध सौंदर्य ग्रहण करण्याला नालायक आहोत असे सक्तीने सामान्य रसिकाला भासवण्याचा नवकलेने विडाच उचलला आहे. कलेचे संस्कार आपल्यावर होऊ शकत नाहीत. आपण डोळे असून आंधळे आणि कान असून बहिरे आहोत; अशीच रसिकाची भावना होऊ पाहात आहे. एवढेच नव्हे तर वरच्या थरातील समाजासाठी

होणारी कलानिर्मिती आपल्या हक्कांची पायमल्ली करीत आहे अशाही सामान्य रसिकांचा समज होऊ पाहत आहे. ''

सामान्यांच्या समाजात राहणाऱ्या आजच्या नव-कलाकाराने अस्मितेच्या शोधात एवढ्या बेगुमान बंडखोरीचा प्रयत्न चालवला आहे की त्यामुळे त्याचा समाजाशी कायमचा संबंध तुटण्याचे संकट आज दत्त म्हणून उभे राहिले आहे. आजच्या कलावंताला जे तंत्रविषयक धडे सांकेतिक भाषेत दिले जातात त्यांच्या आधारे तो आत्माविष्काराची एखादी पद्धती शोधून काढतो. अर्थात् त्यात वावगे काहीच नाही. प्रत्येक कलाकृती तंत्रबद्ध असतेच. पण आजच्या कलावंताचा भर तंत्रावर अधिक दिसून येतो. तांत्रिक ज्ञानापासून प्रेरणा घेऊन तो एक नवा साचा–पॅटर्न–तयार करू पाहतो आणि भावसंक्रमणाच्या कलेच्या प्रकृतिधर्मा-कडे दुर्लक्ष करतो. वस्तुतः भावसंक्रमण हेच कलेचे कार्य असून रसिकांत सहसंवेदना निर्माण करण्यासाठी कलावंताला प्रयास करावे लागतात. ती गोष्ट सहज-साध्य का आहे ?

हृदय-संवादाचे खरे मर्म कवि होरेस याने जाणले होते. त्याने कलावंताला बजावले आहे – 'मी रडावं अशी तुझी इच्छा असेल तर तुझ्या हृदयात वेदना जागृत झाली पाहिजे.' आपली भावना आणि कल्पना रसिकापर्यंत पोचवून त्याच्यात सहसंवेदना निर्माण करण्यासाठी, त्याची भावजागृती होण्यासाठी, कला-वंताने रसिकाला कळेल अशा भाषेतून भावविश्व निर्माण केले पाहिजे. त्याच्या पद्धतीचा रूढ पद्धतीशी काही संबंध हवा. कलावंताने आत्माविष्कार करण्या-साठी वापरलेली रंग वा स्वरांची भाषा वेगळी आणि क्लिष्ट असली किंवा तिचा बोध होण्यासाठी कला-वंताच्या भावानुभूतीशी तद्रूप होण्याची गरज असली तरी एक गोष्ट निश्चित; आणि ती ही की कलावंताची भाषा ही भूतकाळाशी संलग्न असावी. प्रत्येक नवी पिढी भूतकाळाला गाडू पाहत असली तरी ते भूत स्वस्थ बसत नाही. इतिहास हा अव्याहत घडत असतो. साहित्य आणि संगीताप्रमाणेच चित्रकला ही बदलत्या रूढी, तंत्र आणि विषय यावर प्रकाश पाडते. तरीही प्रत्येक नवीन पिढी आपणच संस्कृतीच्या विका-साचे खरे पाईक आहोत अशा ईर्ष्येने विगत कालां-तील कलेचा मुर्दा गाडू पाहते. निर्वाततेत सौंदर्य-विकास अशक्य आहे. जुन्याची जाणीव, गतकालाच्या कलेचे संस्कार, याशिवाय कोणताच चित्रकार चित्र-फलकावर नवी कला साकार करू शकत नाही. निदान कलावंताला नवनिर्मितीसाठी आव्हान देण्यासाठी आणि रसिकाला तुलना करून निर्णय देण्यासाठी परि-माण देण्यासाठी निकट भूतकाळातील कला आवश्यक व उपयुक्त ठरते. नव्हे ती वर्तमानकाळातील कलेच्या कक्षेत जबरीने घुसून स्वतःचे अस्तित्व मान्य करा-वयास लावते.

चित्रकलेतील तीन साधने

कलेच्या इतिहासात कलावंताची आत्माविष्काराची उत्कट इच्छा मध्यवर्ती आणि अविरत जागृत असलेली आढळून येते. अगदी इजिप्तमधील भित्तिचित्रे पाहिली तरीही आकृतिवादाच्या स्तोमातून आत्माविष्काराची धडपड व्यक्त होते. आजच्या बुद्धिनिष्ठ नवकलेतही ती आहेच! कलावंताची मूलभूत प्रेरणा तीच असली तरी बदल घडून येतो तो आघातपद्धतीत (Emphasis). आधुनिक कलेत संक्रमणावर भर नसल्यामुळे ती दुर्बोध आणि गूढ बनत आहे.

संक्रमण (Communication) घडवून आण-णारी चित्रकलेतील महत्त्वाची साधने म्हणजे वास्तव-वाद, (Naturalism) आकृतिवाद (Forma-lism) आणि प्रतीकवाद (Symbolism) ही होत. वास्तवता म्हणजे चित्रविषयाची चटकन् ओळख पटवून देणारी पद्धती. मानवसौंदर्य आणि निसर्गसौंदर्य यांचा रसिकाला या पद्धतीमुळे पुनः-प्रत्यय येतो. स्वानुभूतीचा बोध आणि वस्तूची ओळख हे वास्तववादाचे महत्त्वाचे घटक होत. महत्त्वाची गोष्ट अशी की, वास्तववादी चित्रणातून चित्रकार सृष्टीकडे पाहाण्याचा स्वतःचा दृष्टिकोण, निसर्गाचे त्याला घडलेले दर्शनच तो रसिकाला घडवीत असतो. जणू तो गोचर सृष्टीची पुनर्निर्मिती करीत असतो. यासंबंधी व्हिस्लर या चित्रकाराची एक मजेदार आख्यायिका सांगतात. व्हिस्लरला निसर्गचित्रणाचा फार सोस होता. त्याप्रमाणे त्याने थेम्स नदीचा परिसर चित्रफलकावर रंगवला. त्याची चित्रे पाहावयास आलेली एक स्त्री व्हिस्लरकडे येऊन सांगू लागली, '' थेम्सचा काठ म्हणजे व्हिस्लरने रंगवलेल्या चित्रांची मालिकाच

वाटली मला ! " (ती थेम्सच्या काठाने बसचा प्रवास करून प्रदर्शन पाहावयास आली होती.) त्यावर नम्रपणे व्हिस्लर म्हणाला " बाईसाहेब, निसर्ग आता कुठे साकार होत आहे ! "

सोप्या शब्दात आकृतिवाद समजून सांगायचा तर असे म्हणता येईल की, साहित्य आणि संस्कृतीचा जो वारसा रसिकाला लाभलेला असतो त्याच्या प्रतिक्रियात्मक तारा छेडून कधीही न पाहिलेल्या वस्तूची हक्-कथन पद्धतीने हुबेहूब प्रतिमा रसिकाच्या मनःचक्षूपुढे उभी करण्याची पद्धती म्हणजे आकृतीवाद ! आकृतिवादी चित्रांचा प्रेक्षकांवर होणारा परिणाम हा त्याच्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या श्रेणीवर अवलंबून असतो. जी व्यक्ती, वस्तू अगर घटना रसिकाच्या हृदयात खोल रुजली असेल तिच्या चित्रणाने त्याच्या भावना उचंबळून येतात. अशा चित्रात सहसंवेदना निर्माण करण्याची शक्ती अधिक असते,

अंतःस्फूर्त अगर प्रतिकात्मक अवबोधाच्या प्रक्रियेत संक्रमण तत्त्वाचा महत्त्वाचा वाटा असतो. कलावंताने एखाद्या प्रतीकाचा वापर केला असेल तर त्याचे आकलन रसिकाला झाले पाहिजे. सामान्य माणसाच्या ज्ञानाच्या कक्षेत बसू शकेल आणि कलावंताच्या अनुभूतीचा पुनःप्रत्यय घडवू शकेल अशीच प्रतीकाची योजना असावी. ऐंद्रिय, भावनात्मक आणि बौद्धिक शक्ती एकवटून रंग, आकृती किंवा भावनांचे साहचर्य यातून वैयक्तिक प्रतिक्रिया घडवतात. ही प्रतिक्रिया प्रतीकांच्या परिचयामुळे आणि कलावंताने त्यांचा केलेला वापर अवगत झाल्यामुळे घडून येत असते. पुष्कळदा त्या प्रतीकामध्ये असलेल्या भावनोद्दीपनाच्या सहजात शक्तीमुळेही प्रेक्षकाला ते उद्दीपित करते.

गेल्या पन्नास वर्षात कलात्मक नवनिर्मितीच्या कार्यात प्रतीकवादाला अग्रस्थान प्राप्त झाले आहे. छायाचित्रणाच्या यांत्रिक प्रगतीमुळे आणि गतकालीन श्रेष्ठ परंपरेमुळे दडपला गेलेला आधुनिक कलावंत साहजिकच प्रतिकात्मतेच्या आहारी गेला. आपल्या कुवतीनुसार त्याने प्रतीकात्मक प्रतिमा–निर्मितीकडे मोर्चा वळवला. चित्रकला म्हणजे हुबेहूब निसर्गदर्शन घडवणारा आरसा आहे; ते निसर्गाचे प्रत्यक्षाबरहुकूम वर्णन करणारे मनोहारी भाष्य आहे, या जुनाट कल्पनांपासून कलावंताला मोकळीक मिळाल्याने आकृती, तंत्र आणि शास्त्र यांत अवगाहन, संशोधन आणि प्रयोग करण्यात तो गढून गेला. परिणामस्वरूप, भावना व कल्पनांचे संक्रमण घडवून आणण्याचे माध्यम म्हणून कलेकडे पाहण्याचे त्याने सोडून दिले.

मात्र पारंपरिक चित्रपद्धतीचा अव्हेर करूनही रंग, आकृती आणि सूक्ष्मदर्शन यांचा स्वैर उपयोग करूनही, या काळातील नवकलाकाराने भावदर्शनात कमालीची उंची गाठली. फ्रेंच कलावंतांनी तर मानवी प्रश्नांपेक्षा सौंदर्यनिर्मितीच्या क्षेत्रात प्रयोग करून त्यावरच आपले लक्ष केंद्रित केले. याच्या उलट जर्मनीची प्रतिक्रिया होती. नॉर्वेजियन चित्रकार एडवर्ड म्यूंच (Munch) म्हणतो, " चित्रकलेतून मला प्रेम करणारी, दुःख भोगणारी, श्वासोच्छ्वास करणारी, अगदी जिवंत माणसं उभी करायची आहेत ! " फ्रेंच कलावंतांनी तांत्रिक प्रश्नांवर भर दिला. त्यांनी व्यक्तिनिष्ठ सौंदर्यभावनेचा परिपोष केला. प्रचलित तत्त्वांना धाब्यावर बसवले. एवढेच नव्हे तर त्यांनी असाही निष्कर्ष काढला की, सौंदर्य आणि भावना यांची गल्लत केली जाऊ नये. सौंदर्यशास्त्र हे बौद्धिक स्वरूपाचे असून त्याची प्रेरणा बौद्धिकच असावी. किंबहुना वस्तुनिष्ठ सौंदर्याकडून चित्रकलेला व्यक्तिनिष्ठ सौंदर्याकडे खेचून आणण्यात त्यांचाच हात अधिक आहे. त्यामुळे कला आणि जीवन यांची कायमची फारकत झाली. क्यूबिझम आणि इतर बौद्धिक कलाप्रकार उदयाला आले.

क्यूबिझम्

क्यूबिझमने कलेच्या पूर्वपरंपरेशी असलेला संबंध पार तोडून टाकला. या चित्रप्रकाराचा उगम (Cezenne या कलावंताच्या निसर्गातील भूमितिविषयक संशोधनातून झाला. विसाव्या शतकातील या चित्र–पद्धतीचे अनेक प्रकार जन्माला आले. त्या सर्वांच्या मुळाशी एक निहित तत्त्व आहे आणि ते म्हणजे वस्तूंच्या पृष्ठभागाकडे लक्ष केंद्रित न करता आंतरिक सत्याचा शोध करण्याची वृत्ती कलाकाराने बाळगावी. ऐंद्रिय किंवा मानसिक अभिव्यक्तीची कास न धरता रेषा, रंग आणि पातळ्या यांच्या माध्यमातून प्रेक्षकाशी हृदयसंवाद साधण्याची पराकाष्ठा करावी.

या नवीन पंथाचे प्रवर्तक म्हणून पिकॅसो व ब्रॅक यांची नावे घेतली जातात. दोघांनीही मारख्याच साध-

नांचा वापर केला असला तरी त्यांच्या अभिव्यक्तीच्या प्रकारात भिन्नता दिसून येते. पिकॅसो हा आत्यंतिक आत्मनिष्ठ आणि बेफिकिर कलावंत. पूर्वपरंपरेचा पूर्ण विच्छेद करून नव्या युगाची नांदी सुरू करण्यास तो कमालीचा उत्सुक झाला होता. कलाविषयक प्रश्नाकडे पिकॅसो उत्स्फूर्त बेहोषीने पाहात असे. त्याची अंतःशक्ति दांडगी. तो म्हणे– "I do not seek, I find !" न शोधतांच ते मला गवसते) पिकॅसोला त्याच्या चित्रांचा अर्थ विचारला तर तो म्हणे– " तुम्ही पक्षांना कधी त्यांच्या गाण्याचा अर्थ विचारता का ? "

ब्रॅक हा अधिक संवेदनाशील आणि भावविवश होता. जुन्यावर नव्याची उभारणी करण्याची त्याची मनीषा होती. तरीही तो भावनेला दुय्यम लेखून तिला नियंत्रित करण्यावर भर देई. तो म्हणतो, " चित्र विषय हा काही खरा चित्राचा विषय नव्हे. चित्रलेखन पद्धतीतून साधली जाणारी काव्यात्मता आणि एकता हा चित्रविषय होय. "

क्यूबिस्ट चित्रात विषय धूसरतेने आणि अस्पष्टपणे मांडलेला असून द्विपरिमाणात्मक पद्धतीने त्याचे चित्रण केले जाते. जेन काक्टोच्या कथनानुसार ' चित्र म्हणजे काही उघडी खिडकी नव्हे. ' हे तत्त्व क्यूबिझमने विशेष उचलून धरले.

आजचा कलावंत आपल्या अनुभूतीच्या आणि भावनेच्या संक्रमणासाठी आसुसलेला नाही. तो त्याच्या कलेचा मूलभूत उद्देश नव्हे. उलट प्रेक्षकाची चित्राबद्दल व्यक्तिनिष्ठ प्रतिक्रिया दिसून आली की त्याला साफल्याचे समाधान लाभते. नवकलेतील तांत्रिक दुर्बोधता हे हृदयसंवाद न साधण्याचे कारण नव्हे. सौंदर्यविषयक कल्पनांची विचित्रता आणि विक्षिप्तता• भावसंक्रमणाच्या आड येते. जोपर्यंत कलाकार सहसंवेदना निर्माण करण्यासाठी धडपडत असतो तोपर्यंत रसिकाने त्याची कला समजून घेण्याची अपेक्षा तो करू शकतो. दुसऱ्या कोणत्याही प्रकारे भावनांची अभिव्यक्ती अशक्यप्राय असताना ज्या भाषेत ती व्यक्त केली जाते ती भाषा म्हणजेच कला. आणि भाषा ही उभयताना सारख्याच गम्य असलेल्या प्रतीकांद्वारे हृदयसंवाद घडवून आणण्याचे, भावना संक्रमणाचे कार्य करीत असते. आपली प्रतिक्रिया शब्दाद्वारे रसिकाला व्यक्त करता आली नाही तरीही तो कलाकृती (चित्रकृति) समजू शकतो. पण कलावंताने वापरलेली प्रतीके रसिकाला अगम्य असली तर मूळ आशय बाजूलाच राहून कलाकृतीचा अगदी वेगळा आणि कलावंताला मुळीच अभिप्रेत नसलेला अर्थ रसिक कलाकृतीला चिकटवण्याची शक्यताच अधिक. कारण कलावंताची प्रतीकातून व्यक्त होणारी भाषा त्याला समजू शकत नाही. हा पेच अद्याप सुटला नाही. कलावंतापुढील युगानुयुगे न सुटलेला असा हा महत्त्वाचा प्रश्न आहे !

कलावंताची अस्मिता

या प्रश्नाचा उगम कलावंताच्या अस्मितेच्या अभिव्यक्तीतून झालेला आहे. कारण डि व्हिन्सीच्या कलाविषयक तत्त्वापासून आजचा कलावंत ढळला आहे. व्हिन्सी म्हणे - " चांगल्या चित्रकाराने दोन गोष्टीचे आलेखन करावे– पहिली गोष्ट म्हणजे माणूस आणि दुसरी म्हणजे त्याचे मन. " आणि नवकलावंत तर रसिकाचा विचारच करायला तयार नाही !

अस्मितेच्या शोधात असलेला नवकलाकार मानवी जीवनापासून पराङ्मुख झाला आहे. वैयक्तिक शैलीचा शोध हाच कलेचा हेतु त्याच्या मनात सदैव वसत असतो. शैलीच्या अधिसत्तेइतकी तापदायक गोष्ट दुसरी नाही. मार्गात येणाऱ्या प्रत्येक वस्तूचा चुराडा करणारा तो जगन्नाथाचा रथ आहे. कोणतीही नवी शैली जुनीचा निःपात करते. ही वस्तुस्थिती काही नवीन नाही. Cizanne आणि इतर संस्कारवादी कलावंतावर टीकेची झोड उठवणाऱ्या टीकाकारांची झालेली फजिती माहित असल्याने भ्यालेले टीकाकार प्रचलित शैलीबद्दल नुसतेच बोलायला कचरतात असे नव्हे तर तिचा उदोउदो करू लागतात. शैलीच्या शोधामागे नाविन्याची हौस असते. जर्मन चित्रकार ॲर्नाल्ड बॉक्लिन (Bocklin) म्हणे. " अस्तित्वात असलेल्या पद्धतींविरुद्ध सतत संघर्ष हेच खऱ्या कलेचे गमक होय. " कलावंताच्या कलाकृतीच्या मूल्यमापनात नाविन्याला (Originality) अग्रस्थान मिळणे अपरिहार्य आहे. त्याची ही अस्मिता आणि नवीनता कलेच्या क्षेत्रात सतत धुडगूस घालीत असते. कलावंताची स्वयंस्फूर्त कला बिचाऱ्या सामान्य रसिकाला दिपवून टाकते. उलट, कलेची नवी क्षितिजे कलावंताला आव्हान देत असतात. परंपरेपासून मुक्त

झालेला कलावंत अस्मिता व नाविन्य यांच्या फेऱ्यात सापडून कलेच्या मूळ हेतूकडे पूर्ण दुर्लक्ष करतो.

एक मूल्य म्हणून अस्मितेला कमी लेखता येत नाही. अस्मितेशिवाय कलावंताची कला मृत्युपंथाला लागेल. परंतु अस्मितेसाठी धडपड सुरू झाली की भावना संक्रमणाला हरताळ फासला जातो. कलावंत जेव्हा भूतकाळाशी संबंध तोडून टाकतो तेव्हा त्याला कलाविषयक वारसा मिळत नाही. त्याची अवस्था त्रिशंकूसारखी होते. रसिकांचे आपल्या कलेकडे लक्ष वेधून घेण्यासाठी तो अस्वस्थ होतो. मग बाह्य तंत्रावर भर देऊ लागतो. कारागिरी करू लागतो. कलावंताचे हे कौशल्य आणि चापल्य कलेच्या सौंदर्याला, स्पष्टतेला तेला आणि सखोलतेला मारक ठरते.

अत्यधिक अस्मितेमुळे सामान्य रसिक गोंधळून जातो. तो कलेला दुरावतो. दैनंदिन जीवनाच्या भाराने दडपलेला बिचारा रसिक या नाविन्यामुळे गुदमरून जातो. कलेतील तिलाच अवगत असलेली अस्पष्टता आणि गूढता रसिकाची पूर्ण निराशा करते. आजकाल गूढ भाषेत आत्माविष्कार करण्यात कलावंत दंग असून त्याची कला समजून घेण्याचा रसिकाचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. ही रस्सीखेच अशीच कुठवर चालणार कुणास ठावुक !

आजची परिस्थिती

नवसौंदर्याची रसिकावरील प्रतिक्रिया शक्ती कितीही शब्दातीत असली तरीही त्याची अवहेलना करता येत नाही. कारण कलावंताने पुन्हा रसिकाशी तादात्म्य साधण्याचा, भावसंक्रमणाचा प्रयत्न केला तर त्याला अभूतपूर्व उत्साहाने त्याचे स्वागत होईल अशी खात्री देता येते. आजची कलेची व्यथा ही आहे की, नवे कलावंत नव्या युगाच्या नांदीसाठी जुन्या परंपरेवर, जुन्याच्या ज्ञानावर एकदम पडदा टाकायला आतुर आहेत ! त्यासाठी मनस्ताप करून घेत आहेत.

तथापि नवसृष्टीच्या निर्मितीसाठी सज्ज असलेल्या या विश्वामित्राला (नवकलावंताला) लक्ष्मीरूपी मेनका त्याच्या तपश्चर्येपासून चळवू पाहत आहे. एखाद्या कलावंताला थोडे नांव मिळाले की त्याच्या भोवती भक्तांचा मेळावा भरतो. ज्या एखाद्या चित्राने खळबळ माजली असेल त्याचीच मागणी धनिक, रसिक आणि राष्ट्रीय चित्रसंग्रह करू लागतात. प्रगतिपथावर असलेला कलावंत मार्गातच बसकण घेतो. त्याची प्रगती तेथेच खुंटते. आणि या मोहापासून कलावंताला परावृत्त करणारी एकमेव शक्ती म्हणजेच त्याच्या हृदयातील प्रगतीची पराकाष्ठेची आकांक्षा !

कला समजून घेण्याची मनापासून इच्छा असलेल्या सामान्य रसिकाला चित्रकलेतील आणि सर्वच नवकलेतील ही अलिप्तता अस्वस्थ करून सोडते. तटस्थतेने तो या सर्व प्रयोगांकडे पाहू शकत नाही. आणि कोणताही एक पक्ष न उचलून धरण्यासाठी मोठाच सूज्ञपणा आणि संयम हवा. बरे, त्याने भूतकालीन कलेकडे पाठ फिरवून प्रचलित कलेलाच पाठिंबा दिला तर ती धृष्टता खऱ्या कलेला मारक ठरणार नाही का ? जग आणि जीवित यांचा व्यापक आणि विविध अनुभव घेतल्यानंतर रसिक एकाच पातळीवरून आणि पद्धतीने कलेचा अवबोध करून घेऊ शकत नाही. एकाच कलानिकषाची अपेक्षा व्यर्थ होय. वस्तुतः , कलाविषयक निर्णय देताना एकाच मूलभूत तत्त्वाचा स्वीकार करणे अन्याय्य नाही का ? आजपर्यंत कला ही भावनासंक्रमणाचे वैश्विक स्वरूपाचे माध्यम राहिली आहे. त्यामुळे यापुढे तिने काही लोकांची बटिक म्हणून राहणे कितपत बरोबर होईल ? कदाचित् सामन्यांना दिलासा व प्रेरणा देणारे नवीन माध्यम निर्माण झाल्यास नकळे ! पण यावर विश्वास ठेवणे अशक्य आहे.

जर कलेला मानवांशी व मानवासांठी बोलावयाचे असेल तर तिच्या ठिकाणची भावसंक्रमणाची इच्छा आणि शक्ती जागृत केलीच पाहिजे. कलात्मक अनुभूतीचा सर्वश्रेष्ठ परिपाक म्हणजे कलानिर्मितीच्या कार्यात सहभागी होण्याची अनिवार लालसा रसिकाचे ठिकाणी निर्माण होणे. सर्वसामान्य रसिकाच्या आवाक्याबाहेरचे हे कार्य असल्याने पुढची पायरी म्हणजे कलेच्या निर्मितीची मूलभूत, तार्किक आणि भावनात्मक बाजू समजून घेणे. तसे न झाल्यास कलाकाराची अनुभूति त्याच्याचपुरती मर्यादित राहते. पण तशी पाळी न येता एका कलाकाराने अचूकपणे वर्णन केलेला रसिकाच्या कलाकृतीशी तादात्म्याचा, अनिर्वचनीय निर्मळ आनंदाचा क्षण पुन्हा आल्याशिवाय राहणार नाही अशी श्रद्धापूर्वक आशा करू या !

श्री. प्रभाकर पुरुषोत्तम सिरास

'रंगबावरीच्या' निमित्ताने

इंदिरा संतांची कविता :

दुसऱ्या महायुद्धाच्या जगभर पसरलेल्या ज्वाळांनी मराठी जीवनही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या होरपळलेच. भरीस भर म्हणून यंत्रयुगाने जीवनाची दिशा बदलवून टाकल्याची जाणीव ह्याच काळात प्रकर्षाने झाली, स्वाभाविकतःच नंतरच्या मराठी कवितेतून ह्या साऱ्यांची प्रतिक्रिया उमटू लागली. बदलत्या काळातील कोसळून पडणाऱ्या मानवाविषयीच्या अपार सहानुभूतीने मर्ढेकरांच्या कवितेने एक वेगळे वळण घेतले, तर मुक्तिबोधांची कविता एकंदर समाजजीवनाच्या संदर्भात माणसाच्या उध्वस्त होण्याचा अर्थ शोधत नव्या युगाची मळवाट निर्माण करू लागली.

थोडे आगे-मागे; पण साधारणतः ह्याच काळात इतर अनेक कवी अशा वेगळाल्या जीवनदृष्टीने लिहू लागले. परत एकदा मराठी कविता झपाट्याने नवी वळणे घेत नवनवे प्रांत समृद्ध करू लागली. विविध प्रयोगांना वाव मिळू लागला. नवे नवे रचनाप्रकार निर्माण होऊ लागले.

इंदिरा संतांची कविता वाचकांसमोर आली, ती ह्या पार्श्वभूमिवर.

सहवास ते मृगजळ

'सहवास' हा कै. ना. मा. संत ह्यांचेसह संयुक्तपणे निघालेला त्यांचा पहिला संग्रह. त्यानंतर शेला, मेंदी, मृगजळ, आणि 'रंगबावरी' ह्या काव्यसंग्रहातून त्यांची आजवरची कविता एकत्र पहावयास मिळते.

'सहवास' आणि 'शेला' मधील कवितांनी त्यांना रसिकमान्यता मिळवून दिली. मेंदीने त्या रसिकमान्यतेवर शिक्कामोर्तब करीत असतानाच त्यांच्या भावविश्वाच्या मर्यादा दाखवून दिल्या; तर मृगजळमध्ये ह्या मर्यादा अधिक स्पष्ट व ठळकपणे जाणवू लागल्या. 'रंगबावरी' मधील कवितालेखनात ह्या मर्यादा न नाकारता देखील त्यांच्या कवितालेखनाने सूक्ष्मसे परिवर्तन केल्याचे जाणवते.

प्रियकरासंबंधीच्या विविध भावनांची सुंदर व नेटकी अभिव्यक्ती करणे ही शेला, मेंदी किंवा मृगजळ ह्या सर्वच संग्रहातील बहुसंख्य कवितांमागची एकच प्रेरणा असूनही अनुभवाच्या कमीअधिक गडदपणामुळे त्या त्या संग्रहातील कवितांची परिणामकारकता कमी अधिक झालेली आहे.

शेला मधील अनुभव अगदी ताजा आहे. प्रियव्यक्तीविषयीच्या भावनांचा फुलोर किंवा त्याचे मृत्यूनंतरचे दुःख ह्या दोन्हीशी संबंधित कवितात अतिशय तीव्र अशा भावनिक मनःस्थितीतील लयबद्ध उद्गार आहेत. पतिनिधन ह्या विशिष्ट घटनेच्या संदर्भात संपूर्णपणे हादरून गेलेल्या एका भावनाशील मनातील गडद दुःखांची सावली ह्या कवितांवर पसरलेली आहे :

'जोवरी चांदणे येईल अभ्यंतरी
तोवरी चिरंतन आपण होऊं इथे'

हा विश्वास ढासळून पडला आणि निराशेच्या घोर तमांत:

'कापुरापरी हे मनातले चांदणे
घेतसे पेट अन् असह्य होई जिणे"

(उत्फुल्लवीत हे—शेला ३१)

अशी मनोवस्था झाली. ह्या अवस्थेतच त्यांचे मन कितीतरी काळ घोटाळत राहिले. त्यामुळे ह्या दुःखाचे अनेक पदर त्यांच्या कवितेतून उलगडले गेले.

अवचित कोठे तरी
डोळे तुझे भेटतात
कोसळून वीजलोळ
हृदयाचा तोल जात
(अवचित—शेला ८४)

किंवा

घुसमटे श्वास, जाई
देह—दुकुलाचे भान
वाटे मला आता व्हावे

ह्याच वादळा स्वाधीन
(वाटे मला–शेला ३८–३९)

अथवा

तुजवीण आता तुझ्या ह्या संसारी
अंगाराच्या सरीं वर्षतात
आंत बाहेरून, लागलीसे आग
तुझा घेत माग, येऊ कोठे ?
(कातरवेळला–शेला २९)

ह्यासारख्या थेट हृदयापर्यंत एकदम प्रवेश करणाऱ्या ओळी लिहिणे त्याना सहज शक्य झाले. एका अतिशय संवेदनाशील मनाच्या तीव्र आणि गडद अशा भावावस्थांचा यशस्वी आविष्कार शेलामधील कवितेतून झालेला आहे.

हें दुःखाचे व अतीव निराशेचे वादळ हळूहळू ओसरताना मेंदीमधील कवितातून आढळते. मेंदीमधील कवितांतून प्रत्यक्ष दुःखापेक्षा, त्या दुःखाच्या करुणरम्य स्मृतीच जास्त आहेत. दूर– खूप दूर– अनंतात निघून गेलेल्या प्रियकराचे शारीर अस्तित्वच हरवले आहे. पण त्याची जागा प्रियकराच्या स्मृतीतील अस्तित्वाने घ्यावयास सुरवात केलेली आहे. त्यामुळे प्रेमभावनेचा एक वेगळाच साक्षात्कार काही कवितातून घडतो.

'मेंदी' मधे दुःखाची तीव्रता ओसरल्यामुळे त्या दुःखाच्या स्मृती तटस्थपणे अनुभवणे वा स्वप्नीलपणे फुलवीत बसणे शक्य झाले. त्यामुळे कवितेच्या कलात्मकतेकडे अधिक लक्ष पुरविता येणेही शक्य झाले. 'मेंदी' मधील कवितांचा रचनेच्या दृष्टीने 'शेला' हून वेगळेपणा जाणवतो तो ह्यामुळेच. 'मेंदी' मधील कवितेत इंदिरा संतांनी आपले अधिक रेखीव, नेटकी, आकर्षक व परिणामकारक रचना करण्याचे कसब, पूर्णपणे विकसित केले. ह्या संदर्भात एकाकीपणाचे अतिशय जिवंत, रेखीव पण तेवढेच तटस्थ चित्रण असलेली कविता अभ्यासण्यासारखी आहे.

साथ

हा रस्त्यावरचा
दीप क्षीण तेजात
तेवतो एकटा
भीषण काळोखात
तिष्ठते कुणि तरी
समोरच्या खिडकींत
केव्हढी मनाची
सोबत आणिक साथ (मेंदी ३३.)

ह्या रचनेवर मिळविलेल्या हुकमतीमुळे अतिशय तरल– शब्दात पकडण्यास कठीण असे नाजुक अनुभव देखील त्यांनी यशस्वीपणे कवितेतून साकारलेत. उदा. —

तो चहा गुलाबी
चर्चा खळखळणारी
तो पिवळा रस्ता
थट्टा आडवणारी;
ते तळे सावळे
झपाटलेले मौन
ती निळी अक्षरे
गुप्त आसवे दोन
(तो चहा गुलाबी–मेंदी ५१)

'वाट पाहते तुझी अशी मी
वाटेपरि भावोत्कट होऊन,
वाटच होऊन
वाट पाहते तुझी अशी मी'
(वाट पाहते–मेंदी ३९)

ह्यासारख्या ओळी देखील वरील विधान अधिक स्पष्ट करतात.

इथवरची इंदिरा संतांच्या कवितेची वाटचाल निश्चितच महत्त्वाची व वेधक झाली. एका विशिष्ट संदर्भात त्यांचे कविमन हादरले. आणि त्या हादरण्याशी संबंधित अशा सर्व प्रतिक्रिया कवितेत उमटणे साहजिकच होते. ह्या हादरून गेलेल्या व्यक्तिमत्त्वाची संवेदनशीलता जेवढी तीव्र होती, तेवढी तीव्रता त्यांच्या कवितेनेही पेलली आणि भावकवितेशी अतिशय जवळच्या अशा काव्यगुणांनी समृद्ध कवितांची मराठीत भर पडली.

पण ह्या साऱ्या प्रक्रियेला स्वतःची अशी मर्यादा होती. मेंदीमधील काही कवितातून ही मर्यादा जाणवू लागली होती.

प्रियकराचा कायेवर जागा आहेसा वाटणारा स्पर्श कधीचाच हरवला होता.

तुझ्यातील सारे तुझे
आहे जरी बिलगुन
दिसामाजी तुला परी
चालले मी विसरून
(कातरवेळेला– शेला २५)

ही प्रियकरापासून दूर जात असल्याची जाणीव तीव्र दुःखासह 'शेला' मधेच नोंदली गेली. मेंदीमधे हे अंतर आणखी वाढले, पण त्यामुळे कवितेची कलात्मक बाजू अधिक विकसित झाली. मृगजळामधील बहुसंख्य कवितातून हरवलेल्या स्मृतींच्या स्मृती पकडण्याच्या प्रयत्नात मग कवितेत बराचसा वेगडीपणा चोरपावलाने शिरकाव करून बसला.

मी कधीच मिटून गेले आहे
रात्रीच्या कृष्ण कमळात
हा जो वर दिसतो आहे,
तो आहे
मिटता मिटता माझ्या
डोळ्यांतून ओघळलेला
चंद्राचा थेंब;
ज्याच्यावर उमटले आहे
तुझे आभाळलेले डोळे
(तरंग– मृगजळ ४२)

ह्यासारख्या नुसत्याच कल्पनाविलासात्मक आणि काव्यदृष्ट्या कोरड्या ओळी ह्यामुळेच लिहिल्या जाऊ लागल्या. दारे खिडक्या ह्यांना बोलावयास लावणे भाग पडू लागले (ऐक जराना, मृगजळ ५) आणि ह्या सर्व प्रपंचात निखळ भावना हरवून बसली. उपसावे उपसावे (मृगजळ ५४) निघते जेंव्हा (मृगजळ ५५) किंवा वर्षा (मृगजळ ६७) ह्यासारख्या कवितांतून ह्या निखळ भावनेची इतर अनेक कला बाह्य कारणांनी केलेली गळचेपी जाणवते. 'नाहिस तू' ही कविता मूळ भावनेपासून होत असलेले मनाचे विकेंद्रिकरणच चित्रित करते. 'नाहिस तू' जे भरले अंबर...वारे. वगैरे नंतर–

विसरून गेले क्षणभर तुजला
आणि लोभला
जीव बुटाच्या कंगोऱ्यावर,
त्या मेघावर...
(नाहिस तू–मृगजळ ३१)

नेमके ह्या कवितेत वर्णिले तेच कविता लिहिताना, आता वारंवार घडते, भावनेची तीव्रता संपते आणि कल्पनारम्यता सुरू होते. आणि ह्या कवितेच्या मर्यादा रुळू लागतात.

कधीतरी स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांची कोंडी फोडून, संपूर्ण मानवी जीवन कलहाच्या संदर्भात स्वतःच्या सुखदुःखांचा अर्थ शोधणे आवश्यक असते. ह्यातूनच पुढे मानवी जीवनातील विविध संघर्ष आणि उलथापालथी ह्यांनी कवीचे मन अस्वस्थ होते आणि समग्र जीवनाच्या तळाशी असणारी सत्ये वेचण्याचा त्याचा प्रवास सुरू होतो. दीपस्तंभाप्रमाणे उभी राहून अनेक पिढ्यांना प्रकाश देणारी कविता निर्माण होण्याची शक्यता संभवते ती ह्यातून.

इंदिरा संतांनी ही अशी आपल्या वैयक्तिक सुखदुःखांची कोंडी न फोडल्याने मेंदीमधील काही कवितातून उमटू लागलेले अपयशाचे ध्वनी मृगजळमध्ये अधिकच विस्तारले.

आपल्या अनुभवविश्वाच्या मर्यादा तोडून टाकण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला नसला तरी, ह्या विशिष्ट भावविश्वाच्या पलीकडील अनुभव मेंदी किंवा मृगजळ मधील काही तुरळक कवितांतून टिपले गेले आहेत. उदा. वाटचाल (मेंदी २४). अजंठा (मृगजळ ८४) इथे वेदना (मृगजळ ५९) इत्यादी. पैकी वाटचाल (मेंदी २४) इथे वेदना (मृगजळ ५९) ह्या कवितांच्या काही भागातील अभिव्यक्तीवर मर्ढेकरांची सावली जाणवते. तर 'अजंठा' (मृगजळ ८४) मधे अनुभवाचे आकलन पूर्णपणे झाले नसावे अशी शंका घेण्यास पुरेशी जागा आहे.

'रंगबावरी'

ह्या अशा पार्श्वभूमीवर रंगबावरी मधील कविता वाचत असताना इंदिरा संतांच्या अनुभवविश्वाच्या साऱ्या मर्यादा रसिकांच्या ध्यानात आलेल्या असतात; त्यामुळे ह्या कवितांचा आस्वाद घेणे सोईचे जाते.

नाही म्हणायला मृगजळच्या तुलनेत ही कविता किंचित निराळी आहे. पण हे निराळेपण एकदम नजरेत भरण्याइतके ठसठशीत नाही. एकतर प्रियव्यक्ती संबंधीच्या भावना व्यक्त करणाऱ्या कवितांची संख्या आता पूर्वीइतकी नजरेत भरत नाही. आणि दुसरे

म्हणजे वैयक्तिक भावावस्थांच्या, चित्रणात्मक कवितेच्या जोडीलाच शब्दचित्रात्मक कविता ठळकपणे बघावयास मिळते.

ह्यापूर्वी 'शेला'मधे त्यांनी शरदामधील 'निळी पांढरी दुपार' (शेला पृ. २६·२७) अत्यंत हळुवारपणे रंगविली होती. शरदामधील दुपारची संथ धुंदी आणि सर्व वातावरणात भरून असलेली सृजनात्मकता ह्यांचा अत्यंत रेखीव अशा निसर्गचित्रांतून आविष्कार झाला होता.

आता अधिक आटोपशीर रचना करण्याचे सामर्थ्य हाताशी असताना पूर्वीहून अधिक कमी शब्दात वेगवेगळी शब्दचित्रे काव्यबद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. उलटलेली रात्र (रंगबावरी १०९) श्रावणा (रं. ७२), शिकारा (रं. ४४) मध्यान्ह. (रं. ३९) हिमशिखरे उंच उभी (रं. ११) रंगबावरी (रं. ९) सावल्या (रं. ८) ह्या त्यापैकी काही. ह्यापैकी 'श्रावणा', मध्यान्ह आणि शिकारा ह्यातून कवयित्रिची स्वतःची भावावस्था देखील कमी अधिक प्रमाणात व्यक्त झाली आहे तर उरलेल्या शब्दचित्रात कवयित्री स्वतः अगदीच अलिप्त आहेत. हा अलिप्तपणा विशेषत्वाने जाणवतो.

रंगबावरी

खुरटी झुडपे हुंगत चाखत
उंच पहाडावरती बकरी
चकित उभी; तिज घालुन बघते
धनिण तिची तर रंगबावरी!
जर्द किनारी लाल लहंगा
उघड्या टाचांवर घुटमळतो,
माथ्यावरचा रुमाल पिवळा
काळ्या कुडत्यावर फडफडतो;
बटाबटांच्या असंख्य वेण्या
दो बाजूंनी भाळावरती
लवल्या कानामधुनी रुपेरी
झुमरु खांद्यावरती झुलती;
पिवळ्या-काळ्या खडे मण्यांची
अरास रचली उंच गळाभर,
मुद्या-अंगठ्या झिळमिळ गुंफण
हात कटीवर अन् डोळ्यांवर;
नभसन्मुख हिमउजळ चेहरा
हिमगंगेचा जोष तयावर,
डोळ्यामध्ये झुकलेले अन्
देवदारवन गहन गूढतर!

—(रंगबावरी ९)

ह्या शब्दचित्राची 'ही निळी पांढरी दुपार' (शेला) मधील शब्दचित्राहून वेगळी जात आहे. ह्या वेगळेपणातूनच इंदिरा संतांच्या शेला ते रंगबावरी ह्या प्रवासाचे काही विशेष प्रकट होऊन जातात.

वरील कवितेचे अधिक रसग्रहण करण्याच्या प्रयत्नात मुख्यत्वेकरून रचनेचे कमावलेले कसत्री सौष्ठव, वर्णनात्मक शैलीवरील प्रभुत्व. ह्या दोन गोष्टी जाणवतात. हा वर्णनात्मक शैलीचा विकास ह्या पूर्वीच्या काव्यसंग्रहातून विशिष्ट स्वरूपाची कविता लिहिताना झालेला आहे. ह्यामुळे हिमालयकन्येचे तपशीलवार चित्र उभे करणे साधले. शेवटल्या चार ओळीत त्या चित्रात जिवंतपणा यावा म्हणून हिमगंगेचा जोष ज्यावर आहे अशा हिमउजळ चेहऱ्यावरील डोळ्यांत झुकलेले गहन गूढतर देवदारवन चित्रबद्ध करण्यात आलें; तरीही कविता मुळगावकरांच्या चित्रातील हिमालयसुंदरीच्या फारशी पुढे जाऊ शकत नाही. शेलामधील निसर्गचित्रांना नव्हती अशी ही नवी मर्यादा इथे जाणवते. ह्या मर्यादेचा अधिक विचार होणे आवश्यक वाटते.

उलटलेली रात्र हे ह्याहून वेगळे असे आणखी एक शब्दचित्र. रंगबावरी कवितेचे अपयश घडले ते निदान एका विशिष्ट उंचीवर. 'उलटलेली रात्र' (पृष्ठ १०९) मधील शब्दचित्रात पोरगा मोठा होऊन आपली दुःखे दूर करील असे स्वप्न पाहणाऱ्या बाईचे व तिच्या स्वप्नाचे वर्णनच केलेले आहे. ह्यातील निरीक्षणाचा उथळपणा ठळकपणे जाणवावा इतका स्पष्ट आहे. आणि शेवटी देण्यात आलेली कलाटणी नाटकी आहे. 'सुखाची स्वप्ने पाहणारी दरिद्री बाई' ह्या विषयावर लिहिलेली वाटण्याइतकी ही कविता फसली आहे.

जवळ शब्दांचे व शैलीचे सामर्थ्य असूनही चांगली शब्दचित्रे निर्माण होण्यासाठी ('शेला' मधे आहे तसा) अनुभवाचा सच्चेपणा आवश्यक असतो. तसेच एखाद्या **अनुभवाचे वर्णन करणारी** कविता

विशिष्ट पातळीच्या पलीकडे जाऊ शकत नाही; ह्या दोन महत्त्वाच्या गोष्टी ह्या शब्दचित्रांनी परत एकदा सिद्ध होतात.

ह्या शब्दचित्रांच्या जोडीलाच काही प्रासंगिके देखील रंगबावरीत समाविष्ट करण्यात आली आहेत. उदा. – लाखरंगता कैलासावर (रं. ९५) पंचारती (रं. ४०), ध्वजवंदन आणि आम्ही (रं. ८४) इत्यादि. ध्वजवंदन मधे नाही म्हणायला शेवटल्या काही ओळीतील भावना उल्लेखनीय आहे. पण एकंदरीत ह्या कविता बिन महत्त्वाच्या वाटतात.

आपले वेगवेगळे भावानुभव व्यक्त करण्याचे तंत्र इंदिरा संतांनी ' मेंदी ' मधेच प्रगल्भ केले होते. ह्या तंत्राचा मृगजळनंतरच्या म्हणजे रंगबावरीमधील कवितांमधे बराच यशस्वीरीत्या वापर करण्यात आला आहे. ह्या तंत्राची गम्मत अशी आहे की, अतिशय बिनमहत्त्वाचा अनुभव देखील प्रथमदर्शनी महत्वाचा वाटावा. शेवटल्या काही ओळीत कवितेला अधिकाधिक धूसर करून टाकण्याची इंदिरा संतांची पद्धत ह्या बाबतीत विशेष परिणामकारक ठरते.

उदा. अघटित ह्या कवितेत चौथ्या कडव्यात क्षितिजाचे दालन ओलंडून ओठावरती अमृतबिंदु असलेले धुके समोरून रांगत येते आणि (शेवटल्या ओळी :–)

दुदुल्या ओठी म्हणते " घे, घे. "
पायाभवती विळखा घालुनि,
ओणवते मी लगबग, त्याला
उचलायाला... कोटिकरांनी !

– (रं. ५)

किंवा पुढील कविता–

शीण

किती चालावे वाटते
  कधी कधी येतो शीण,
वाटे घ्यावासा विसावा
  कुठे... कुणाशी थांबून...
असे वाटतां कांहीसे
  काही वाटेनासे होते
भुते फुटती पायांना,
  वाट भिऊन पळते...

–(रं. ६०)

अशा कितीतरी लकबा त्यांनी निर्माण केलेल्या आहेत. आजोबा ऐवजी अजोबा आवंढा ऐवजी अवंढा ह्यासारखी शब्दयोजना करणे वगैरे ह्या लकबांचे तपशील देता येतील. पण त्याचे महत्व विशेष नाही. महत्व आहे ते संपूर्ण कवितेच्या रचनेचे. स्वतःचे असे त्यांनी जे साचे बनविले त्यांचे. एकतर ह्या विशिष्ट साच्यांच्या प्रभावामुळे त्यांच्या कित्येक कवितातील कलात्मक अपयश दडविले जाते आणि रसिक संभ्रमात पडतो. आणि दुसरे असे की, इंदिरा संतांच्या मागून लिहू लागलेल्या कित्येक कवयित्रींनी ह्याच साच्यांचा कित्ता कळत न कळत गिरविला आहे, अधिक खोलवर अभ्यास करणाऱ्याला रंगबावरीमधील दर्शनी यशस्वी वाटणाऱ्या अनेक कवितांचे कलात्मक अपयश जाणवले तर मला नवल वाटणार नाही.

रंगबावरीमधे समाविष्ट कवितातील काही भावचित्रे मात्र हृद्य आहेत. त्यातील काहीत निसर्ग आणि कविमन ह्यांची एकरूपता आहे; तर काही भावचित्रांतून इंदिरा संतांच्या कवितेला आजवर अज्ञात असलेल्या मूलभूत प्रश्नाला स्पर्श केला गेला आहे.

सावल्या

पुढे स्वच्छ तावदान
  मागे घनदाट मन
बाहेरील काळोखाचा
  काचेवर मुका ताण !
दिवा सारखा डोलतो
  दिसे बाहेर दालन
सावल्यांची हालचाल
  आली छताशी दाटून !
  ... ...
ओघळल्या वीजधारा
  तडकल्या कांचेतून
फक्त ढाळते सावल्या
  मागे घनदाट मन !

–(रं. ८)

ही कविता वर्णनात्मकतेची बंधने तोडून एका वरच्या पातळीवर जाते. आणि संपूर्ण कवितेतून विशिष्ट भावनुभवाची एक स्वयंपूर्ण प्रतिमा निर्माण होते. हे ह्या कवितेचे यश.

किंवा ' कित्येक आठवणींच्या पलीकडे ' ह्या कवितेने अगदी सहजपणे एका मूलभूत प्रश्नाला केलेला स्पर्श—

कित्येक आठवणी ओलांडल्यावर
अलीकडे ...

आज मी माझ्या किनाऱ्याशी
उभी आहे

पण

मी कुठे आहे ? मी कुठे आहे ?

– (रं. १००)

किंवा ' अबंढा ' मधील ह्या सहज सुंदर अकृत्रिम ओळी—

ते दिवस : बहर जाईचे,
हे : अभाळ मुंडे बघणें,
त्या आर्त चांदण्या रात्री,
ही काळझोप नच ढळणें;
ते होते माझे जीवन,
ही आता नुसती श्वसनें !

– (रं. ८९)

मध्यान्ह (पृ. ३९), अस्वस्थ (पृ. २४), सावल्या (पृ. ८), सावध (पृ. ६), कशी अचानक (पृ. १९), उध्वस्त (पृ. ६७), सांगावा (पृ. १०५) ह्यासारख्या कित्येक कविता सरस उतरल्या आहेत. त्यातील विविध भाववृत्ती, त्या भाववृत्तींशी एकजीव झालेला निसर्ग आणि त्या भाववृत्तींचे कधी गडद होणारे तर कधी अत्यंत तरल रंग ह्या साऱ्यांचा वाचकांनी मुळातूनच आस्वाद घ्यावा. इंदिरा संतांच्या कवितेतील खरी लज्जत ह्या व असल्या कवितांतून वाचकांना सहज लाभले.

ओल्या गर्द मातीवर
जर्द पाकळ्यांचे मौन,
पाना पानांच्या टोकाशी
अस्वस्थाचा मुका कण.

(अस्वस्थ पृ. २४)

ह्यासारख्या, निसर्ग चित्रातून आपला मूड प्रभावीपणे व्यक्त करणाऱ्या सुरेख ओळी ह्या कवितांतून मोठ्या प्रमाणावर सापडतात.

इंदिरा संताच्या भावविश्वाच्या मर्यादा ह्या त्यांच्या कवितेच्या मर्यादा ठरू पाहत असल्याचा धोका त्यांची समग्र कविता काळजीपूर्वक वाचली असता जाणवतो. मर्यादित अनुभवविश्वात वावरूनही अत्यंत प्रभावी व खूप मोठी झेप असलेली कविता लिहिणाऱ्या बहिणाबाईंची ह्या संदर्भात सहजच आठवण होते.

इंदिरा संताच्या कवितेविषयी मते देण्याचा खरे म्हणजे माझा अधिकार नव्हे. पण थोडसा अधिक्षेप होतो आहे हे जाणवत असूनही मी माझ्या प्रामाणिक प्रतिक्रिया इथे नमुद केल्या आहेत त्यांना वैयक्तिक आवडी निवडीच्या मर्यादा पडू नयेत अशी दक्षता घेत.

डोक्यापरीस लहान
आज वाटते आकाश
रात्र-दिवसाचा काळ
झाला निमिष निमिष !

मन सुटून चालले
शरीराच्या मिठीतून
विश्वापल्याडचे काही
काय गेले त्या स्पर्शून ?

ह्यासारखे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. इंदिरा संतांची वाटचाल येथून पुढे झाली तरी आज आहे त्याहून त्यांच्या कवितेला अधिक आणि नवी परिमाणे लाभतील असा विश्वास वाटतो.

श्री. शं. बा. जोशी

अदिती व अंभृणी देवी

(अंभृणी देवींचे आत्मकथन चालू)

विश्वकर्त्री, विश्वभर्त्री मी !

ऋचाः– ७. अहं सुवे पितरं अस्य मूर्धन्
मम योनिः अप्सु अंतः समुद्रे
ततो वितिष्ठे भुवनानु विश्वा ।
उत द्यां वर्ष्मणोपस्पृशामि ॥

अर्थः– (" द्यौः " पितरं) पित्याला मीच जन्म दिला आहे; त्याचे मस्तक हे माझे जन्मस्थान; तेथील समुद्र (अंतरिक्ष) जळात मी जन्मले; त्याचप्रमाणे, हे सारे विश्व व्यापून मी उभी आहे. त्या द्यौर्लोकाला माझे शरीर स्पर्शून जाते.

विवरणः- शेवटच्या (७ व ८) या दोन ऋचामध्ये या देवीने आपले अनन्य-साधारण अलौकित्व परोपरीने सुचवले आहे :

माझ्या पित्याला मीच जन्म दिला !

(I) सातव्या ऋचेत या देवीने सांगितलेली आपल्या जन्माबद्दलची अद्भुत वैचित्र्यपूर्ण सांकेतिक भाषेतील कथा, याचे निदर्शक होय.

ही देवी, (जन्मून–) " **आहे;** " म्हटल्यावर तिचा पिता असलाच पाहिजे, हिला पिता आहे; परंतु तो कोण ? असा प्रश्न साहजिकच पुढे येतो. " त्या पित्याला मीच जन्म दिला आहे ! " (अहं सुवे पितरं) असे, या भगवतीचे त्या प्रश्नाला उत्तर ! " माझ्या पित्याला मीच जन्म दिला आहे " हे कोडेवजा बोल आहेत; या गूढ बोलातील रहस्य काय ? बालक हे मानवाचा पिता ('Child is the father of man') असे वर्डस्वर्थचे म्हणणे, किंवा " पिता सन् अभवत् पुत्रः " हे अथर्ववेदाचे वाक्य, ही अशाच प्रकारची समस्यात्मक वाक्ये आहेत.

मानवपित्याला त्याचे माता-पिता, प्रथम एका " शिशु स्वरूपात " (कुमार व कुमारी) असलेच पाहिजेत; ही गोष्ट तार्किक-तात्त्विक भूमिकेवर गृहीत स्पष्ट बाब आहे. या वैचारिक भूमिकेत, पित्याच्या आधी " बालक " अशी ही धारणा (Concept) निश्चित आहे. आजचे " शिशु " हेच उद्याचा पिता (किंवा माता) असल्यामुळे, " **सनातन शिशु** " ही " संतती " (संतत-सतत चालावयाची म्हणून ' सनातन ' होय) ' कुमार ' वा ' कुमारी ' पूजा हा मानवजनांच्या " दिव्य " आराधनेचा विषय झाला आहे युगानुयुगे चालत आलेली " कुमार "–" कुमारी "च्या पूजेची प्रथा भारतात आजही आहे. ' वडाच्या पानावर पहुडलेले बालक ' हेच मानववंशाचा पिता असलेले आदि–बालक होय ! मानवशास्त्रज्ञ युग (Jung) याच्या अभिप्रायाप्रमाणे हा सनातन नमुना : हे अमर (सनातन) बालक होय ! याच्या मताप्रमाणे, मानवाच्या सुप्त चित्तात, मुळातच असलेल्या या प्रतिमा (arch-types) होत. यालाच फ्राईड् fixed symbols म्हणतो. अशा मूळ प्रतिमात मूल हे एक आहे. माता वा पिता होण्याची आकांक्षा निर्माण करणारे व त्याच्या सफलतेच्या मार्गावर परस्परांना आकर्षित करण्यासाठी मानवांच्या स्वप्नात येऊन स्त्री-पुरुषांना एकमेकांच्या पाणिग्रहणास भाग पाडणारे ' सनातन शिशु ' हेच होय ! याप्रमाणे, मानवांचा पिता असणाऱ्या नित्यसनातन शिशूची सांकेतिक पूजा जगात सर्वत्र रूढ आहे, (An introduction to A Science of mythology by Jung and Kereneyi पाहा).

ही देवी अंभृणी, विश्वजननी असली तरी, स्वतः **कन्यका–परमेश्वरी** आहे; ही गोष्ट विश्वाच्या निदर्शनास आणीत आहे : ' अहं सुवे मम पितरं ' या उक्तीने ! पित्याला जन्म देणारी ही देवी, कुमारी असल्याचे, येथे ध्वनित होत आहे.

अनुक्रमणिका

(II) "मी माझ्या पित्याला जन्म दिला" (अहं सुवे मम पितरं). हा विचित्र प्रतिमासंकेत साऱ्या विश्वासाहित्यातच अपूर्व आहे. "या पित्याचे मस्तक, माझे जन्मस्थान." (अस्य मूर्धन मम योनिः) या वाक्यातील आगळी एका प्रतिमा–संकेताने या कवीची अद्‌भूत दार्शनिक प्रतिभा' प्रत्ययास येते.

"मी (माझ्या) पित्याला जन्म दिला", एवढेच वाक्य असते, तर याचा अर्थ संदिग्ध झाला असता; आणि याचा अर्थ इतकासा प्रशस्तही नाही. मी '**कुमारी**' शिवाय (विश्व–) **जननी** ! हे आक्षेपार्ह वाटण्यासारखे आहे. अदिती व दक्ष यांच्या संबंधात हाच आशय आहे. (X, ७२.४२५.); अंभृणी सूक्तात आढळणारी, ही वरील अपूर्व बौद्धिक चमक तेथे किंचितही आढळत नाही. त्या सूक्ताशी तुलना केल्यास, अंभृणीच्या या शब्दातील (मूर्धन् मम योनिः) ह्या प्रतिमेत सामावलेल्या अर्थाची उंची व विशालता मनाला थक्क करून टाकणारी आहे.

अंभृणीचे हे आत्मचरित्र, एका दिव्य, उदात्त, सांस्कृतिक पातळीवरील तात्त्विक घटनांचे दर्शन घडवीत आहे. या "दर्शना" चे हे जग, लौकिक जगापासून दूर आहे. परंतु अज्ञात दिव्य गूढाचा परिचय करून देण्यासाठी रूढ ज्ञात गोष्टींची मदत घेणे अपरिहार्य आहे. म्हणून अशा प्रसंगी उपयोजिलेले प्रतिमासंकेत, पार्थिव-लौकिक अर्थाने संपूर्ण मुक्त असणे शक्य नाही.

एका आदी दिव्य, मूळ तत्त्वापासून सृष्टीचा आरंभ झाला आहे, असा हा आशय आहे. विश्वाची ही जन्मकथा, ज्ञात प्रतिमासंकेतापासून, म्हणजे जनक-जननी या संकेतानीच अभिव्यक्त होणे अपरिहार्य आहे. परंतु याच गोष्टी हा कवी किती उदात्त भूमिकेवरून स्पष्ट करतो ते पहाः–

विश्वाचा पिता "द्यौः" ही वेदकाळातील एक श्रद्धा ! अंभृणीही या श्रद्धेच्या आधारेच सांगते की, आपण (स्वतः) "द्यौः" पित्याला, जन्म दिला असून, त्याच्या **मस्तकात** आपण जन्म घेतला आहे !

'द्यौः' – दिव् > दिव्य– दिव्याला जन्म देणाऱ्या या देवीचे जन्मस्थान त्या 'द्यौः' पित्याचे मस्तक होय ! या कवीने योजिलेल्या 'अस्य मूर्धन् मम योनिः' या संकेतातून, विशेष तात्त्विक अर्थ ओसंडत आहे ! मूर्धन् म्हणजे मस्तक. ही देवी, दिव्य मस्तकात जन्मते, याचा उघड अर्थ काय ? मस्तक हे कल्पना, विचारांचे जन्मस्थान. या देवीला जन्म देणारे 'मूर्धन्' तर 'द्यौः' पित्याचे डोके ! यामुळे ही अंभृणी नामक देवी दिव्य, उदात्त, भव्य, तात्त्विक विचाराची मूर्तीच म्हणावयाची !

'मी (कन्यका परमेश्वरी), बापाला जन्म देते,' या विधानात डोकावणारा गौण अर्थ, "माझा जन्म 'द्यौः' पित्याच्या माथ्यात झाला" या दुसऱ्या विधानाने संपूर्ण बदलतो; व भक्ताला ही जन्मकथा, अत्यंत उच्च तात्त्विक भूमिकेवरून त्या देवीचे दर्शन घडविते.

'मातृप्रधान कुटुंबपद्धती रूढ असलेल्या एके काळच्या भौतस्वरूपाच्या मूळ घटनेचे रूपांतर, या उदात्त दिव्यानुभूतीत होण्यास कारण, मानवाची अंतर्यामी प्रज्ञा–ती प्रतिभाच ना ! मानवाला आपल्यातील या अभौतशक्तीच्या अस्तित्वाचा प्रत्यय कसा आला ? या अगाध दिव्य, अपार्थिव मानवी अंतःशक्तीचे दर्शन, या विश्वजननी भगवतीच्या अद्भुतरम्य प्रतिमा-निर्माण क्रियेमुळेच लाभलेले येथे दिसत आहे. विश्वातील नाना अमूर्त शक्तींची भव्य उदात्त मूर्त देवता-सृष्टी प्रसवणारी ही **प्रज्ञा** (**conciousness**) श्रेष्ठ, का त्या प्रज्ञेस जन्म देणारे ते साक्षात्कारी **दिव्य** (देवता) **संस्पर्शन** श्रेष्ठ ? किंवा, ते 'दिव्य' संस्पर्शन हेच 'प्रज्ञा' रूप ? किंवा त्या 'दिव्य' प्रज्ञेनेच देवतारूप धारण केले ?

'द्यौः' पित्याच्या मस्तकात जन्मलेली म्हणून, या भगवतीला '**वाक्**' अंभृणी (मेधादेवी, सरस्वति) असे संबोधण्यात असलेली समर्पकता रम्य आहे.

(III) पण ही केवळ 'वाक्' नाही. ही 'काली' सदृशही आहे कारण, (अ) 'कन्यका' स्वरूप दोघीत समान आहे. कालीला 'कन्यका' असे पर्याय नाव आहे. (ब) चंड-मुंडांचा संहार करणारी काली युद्धदेवी म्हणता येईल, तसे 'जनाय समदं' करणारी अंभृणी कालीप्रमाणे वीरा म्हणता येईल. (क) अंभृणीच्या पतीचे निश्चित नाव कोठेच, संबंध सूक्तात स्पष्ट नाही. तरी, या देवीचा रुद्रियांकडे विशेष ओढा आहे अशा अनुमानास जागा आहे (i) मी ज्यांच्या सह 'चरामि' म्हणते त्या देवगणांत, रुद्रियांचा प्रथम उल्लेख आहे.

(ii) तसेच 'रुद्राय धनुरातनोमि' म्हणण्यात रुद्राविषयीची आपुलकी उघड होत आहे.

अंतरिक्ष–समुद्रात जन्म

(IV) ह्या कवीने तत्कालीन आणखी एक 'समय' असा हाताळलेला आहे की त्यातून, प्रतीतीस येणाऱ्या विविधरंगाच्या अर्थछटा, व निघणारा सखोल अर्थ भावबुद्धीला स्पर्शून जातो; व हा 'समय' या देवी स्वरूपाच्या 'गूढं गभीरं' अशा विश्वव्यापी अनंताच्या परम बिंदूजवळ नेऊन उभे करतो. या देवीच्या जन्मस्थान सूचक प्रतिमासंकेतात हे सामर्थ्य प्रत्ययास येते. या देवीने जन्मस्थानाच्या स्पष्टीकरणार्थ उपयोजिलेल्या (... 'मूर्धन् मम योनिः =') "**अप्सु अंतः समुद्रे**" या प्रतिमेचे नितांत सौंदर्य अपूर्व आहे. भगवतीचे जन्मस्थान, येथे श्लेषाने दोन प्रकारे ध्वनित होत आहेः (१) 'द्यौः' पित्याचे मस्तक (२) (म्हणजे) अंतरिक्ष : अंतरिक्षरूपी समुद्रामधील 'आप' च्या उदरात, या देवीचा जन्म होतो या कवि 'समया'त अंतरिक्षाचा संकेत म्हणून 'समुद्र' या पदाचा उपयोग केला आहे. समुद्र म्हणजे जलाशय, असा येथे अर्थ निघत आहे; शिवाय त्याला अंतरिक्ष असा, वेदकालीन 'समय' ठरून गेल्यासारखा होता. 'द्यौः' चे 'मूर्धन्' म्हणजे 'समुद्र' असे जे सांगितले आहे, (मूर्धन् समुद्र म्हणजे अंतरिक्ष) त्यामुळे, या रूपकाचे सौंदर्य द्विगुणित होते. तो समुद्र पार्थिव जगातला नव्हे हा अ–पार्थिव, अर्थात् दिव्य समुद्र आहे. जलामध्येही श्रेष्ठ व कनिष्ठ असे तारतम्य अभिप्रेत आहेच. हे द्वैत पूर्वी नव्हते सारे 'आप' तत्त्व हे एकच; त्यातून सारे विश्व निर्माण झाले; या पूर्वीच्या धारणेला (concept) त्यानंतर तारतम्याची आवश्यकता भासू लागली असावी. देवांचा व मानवाचा जन्म झालेले ते 'मुन्नीर' ('आप') एकच कसे असेल ? अशा भडकतेने, 'आपो वा इदमग्र आसीत्; त्या आपातून सर्व विश्व निर्माण झाले- या मूळ श्रद्धेला पुस्ती जोडून दुरुस्ती सुचवली जाते असे दिसते. या प्रकारे ही देवी अंभृणी तारतम्य संप्रदायाची वाटते ही एक, विशेष बाब होय. "अंभो मरीचिः; मरं आपः" "याः अधस्तात् ताः आपः" (ऐतरेय उपनिषद् १·२.) अधोभागी असणारे जल हे "आप"; तसेच उर्ध्व-दिव्य भागात असणारे ते, 'आंभस्'; असे ऐतरेय उपनिषदात म्हटले आहे ऋग्वेदातील या अंभृणी देवीला जन्म देणाऱ्या समुद्र जलाला 'आपः' असेच प्रस्तुत सूक्ताच्या कवीने म्हटले आहे; तरीही देवतानामामध्ये 'आंभस्' आहे, हे ध्यानात घेणे जरूर आहे.

(V) या 'द्यौः' पित्याच्या मूर्धन् : समुद्रात (अंतरिक्षात) श्री देवी जन्मली असल्याचे सुचविणाऱ्या या रूपकात, पुराणकथातील श्रीलक्ष्मी जन्माच्या (समुद्रमंथनाच्या) कथेची पूर्वपीठिका असल्याचे दिसत आहे.

चिदग्निकुंड संभूता

(VI) अंतरिक्ष (समुद्र) जलात जन्मलेली ही दिव्य देवी कोण ? ही साक्षात् विद्युन्मालिनी देवी आहे अशा ध्वन्यर्थालाही येथे वाव आहे "(द्यौः) मूर्धन्"मध्ये जन्मलेली, या संकेतामुळे, ही भगवती, मेधादेवी : वाणी : विद्यादेवी तर आहेच शिवाय अंतरिक्ष जलांत जन्मणारी, ही तेजस्विनी, प्रत्यक्ष विद्युन्मालिनी भगवतीच होय, अशी निश्चित सूचनाही येथे आहे. तंत्र–ग्रंथांमध्ये हा ऋग्वेद 'समय', सनातन रीतीने सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न झालेला आहे : तंत्रग्रंथात श्रीदेवीचे "**चिदग्नि कुंड संभूता**" असे वर्णन येते ! या स्तोत्रातील हा 'समय' ऋग्वेदातील या वर्णनाचे सारच होय. 'मूर्धन्' ('चित्') हेच कुंड, या मूर्धनरूपी कुंडातून स्फुरणाऱ्या विश्वचैतन्यस्वरूपी अशा या देवीचा जन्म होतो. म्हणून ही देवी 'चिदग्नि कुंड-संभूता' होय. पाश्चात्य तत्त्वज्ञांचे विश्वाचे मूळ-तत्त्व 'Idea' हे पूर्ण रसवर्ज्य 'गद्य' आहे. अंभृणी सूक्तांतील हे प्रतिमा-सौंदर्य तेथे तिळमात्र नाही. 'सत्-चित्-आनंद' सूत्रही यांच्यापुढे फिके वाटते. विचार (ज्ञान) शक्तीला,–प्रतिभेला,–प्रज्ञेला भारतीय संस्कृतीत देण्यात आलेले हे उच्च उदात्त स्थान अनन्य साधारण आहे. परंतु उपनिषद्काळी 'ज्ञाना'ला केवळ संन्यासमार्गीय संप्रदायकानी 'रसवर्ज' अर्थ कल्पून भारतीयातील पौरुष व प्रेरक शक्ती वांझोटी बनविली आहे. मूळ अखंडित 'विद्या' पदांत विद्या, अविद्या असा आत्यंतिक स्वरूपाचा भेद कल्पून, आपली एकांगी दृष्टी झाल्याचे पूर्वी सुचविले आहे.

(VII) ही महान् देवी विश्वचैतन्यशक्ती असल्याचे स्पष्ट करण्यासाठी या ऋचेच्या दुसऱ्या पंक्तीचा पूर्णतया उपयोग करण्यात आला आहे. ' ततो वि तिष्ठे भुवनानु विश्वा, उत अमूम् द्याम् वर्ष्मणा उप स्पृशामि'

हे सारे विश्व व्यापून त्यावर उभी असलेली ही देवी, जगद्भरिता, चैतन्यरूपी आहे, हे स्पष्टच आहे. येथे पुन्हा चैतन्यशक्ती व (विचार) ज्ञानशक्ती या दोहोंना विद्युत्‌च्या साहचर्यात उल्लेखिलेले मननीय आहे. द्यावा- भूमीला आपण (' उपस्पृशामि ') किंचित् स्पर्शून जाते, असे, ही देवी सांगते. येथे ' उप ' हा उप-सर्ग फार महत्त्वाचा आहे. द्यावा-पृथिवीबरोबर या चैतन्यमयीचा संपर्क असताना त्यांत चित्‌कला-जिवंतपणा असतो, तो संपर्क सुटताच विश्व निर्जिव-चैतन्यरहित बनते, असे दोन्ही अर्थछटा सुचवण्यासाठी ' उप ' या उपसर्गाचा लाभ घेतल्याचे दिसते.

हा ' उप-स्पर्श ' कसा संभवतो ? तर ' वर्ष्मणा ' ; ' वर्ष्मन् ' पदामध्ये एकापेक्षा अधिक अर्थाची सूचना असून, त्या सर्वांचे प्रयोजन येथे आहे, असे आढळते. वर्ष्मन्‌चे अर्थ : (१) अभिमान, (प्रतिष्ठा), महिमा ही देवी आपल्या अगाध महिम्याने औन्नत्याने, हे सारे विश्व व्यापून राहिली आहे. (२) (वर्ष्मन्) देह. आपल्या शरीराने विश्व-व्यापून उभी आहे, म्हटल्यावर अशा प्रकारे विश्वव्यापून दशांगुळे उरणारा हा देहही देवी कोणत्या प्रकारची, असावी, असा प्रश्न मनात डोकावल्याखेरीज राहात नाही. त्यालाही एका उत्तराची सूचना येथे आढळते: (३) (वर्ष्मन्-) वृष्टी. व त्या पावसाबरोबर वीज- यांच्या माध्यमाने विश्वाला ही देवी ' उप-स्पर्श ' करते म्हणे ! पाऊस-वीज यांच्या संदर्भात ' उप ' या पदाचे औचित्य आणखी औचित्यपूर्ण होते. म्हणजे ही देवी सदा-सर्वदा आपल्यात या विश्वात, नाही; जागृत प्रज्ञेच्या मूर्धनात असते; इतर ठिकाणी ही देवी अधून-मधून चमकून जाते, लगेच अदृश्य होते !

ऋचा : ८. अहं एव वात इव प्रवामि,
आरभमाणा भुवनानि विश्वा ।

परो दिवा, पर एना पृथिव्या
एतावती महिमा सं बभूव ।।

अर्थ:– विश्वाचा प्रारंभ करणारी मी, वाऱ्याप्रमाणे (कुठून कुठेही इच्छामात्रे संचरते, सर्वतंत्र स्वतंत्र असल्यामुळे) कुठेही संचार करते. ' द्यु ' लोकाहूनही श्रेष्ठ अशी मी, पृथ्वीपेक्षा (वरच्या दर्जाची) विशेष मान असलेली मी, माझ्या स्वतःच्या माहात्म्यानेच जन्मले आहे. (स्वयं-भू देवी मी !)

विवरण :- द्यावा-पृथिवीपासून विश्व निर्माण झाले; ' द्यौः ' पिता; ' पृथिवी ' माता, असा सामान्य संकेत ऋग्वेदकाळी होता. ' द्यौः ' किंवा ' विवस्वान् ' विश्वाचा पिता अशी त्या काळच्या ' दिव् - (प्रकाश) पूजकांची श्रद्धा ' स्वयंभू ' विशेषण असलेला मनूसुद्धा विवस्वानाची (सूर्याची) संतती, ही सूर्याग्नी परंपरेतील धारणा !

परंतु येथ अंभृणी आपण ' **परो दिवा** पर एना पृथिव्या ' असल्याचे जाहीर करीत आहे ! ('**दिवा**') पित्याला जन्म देणारी मीच असे ही देवीम्हणते. विवस्वान् परंपरेहून निराळी, मी ' स्वयंभू ' देवी, असे म्हणणाऱ्या या देवीचा संप्रदाय हा विवस्वानाच्या परंपरेपेक्षा भिन्न असावा. हा संप्रदाय विवस्वानाच्या परंपरेचा प्रतिस्पर्धी असावा, या शंकेला या ऋचेत जागा आहे. ' इंद्राग्नीना, वरुणादिना ' आपण ' बिभर्मि म्हणण्यात ही शंका दृढ होत आहे. हे पूर्वी त्या ऋचेच्या विवरणात स्पष्ट केलेले आहे. वेदकाळीच ' आपोज्योतिः ' असा समन्वय झाला तरी, विश्वाचे प्रधान कारण कोण, उपादान कारण कोण, या स्वरूपाची स्पर्धा या दैवतवादामागे दडलेली दिसते. ज्योतीने आपला जन्म दिला, किंवा आपाने ज्योतीला जन्म दिला ? ' मी विवस्वानाला ज्ञान दिले' म्हणणाऱ्या गीता वाक्यात सुद्धा आपसंप्रदायाचा अभिमान उघडकीस येत आहे !

असो याप्रमाणे, हे अंभृणी सूक्त सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अनेक प्रकारे अपूर्व व मौलिक आहे. या सूक्ताचे आत्मचरित्रात्मक रचनातंत्र वेदातच अद्वितीय, एकमेव आहे. असे म्हणता येईल. या सूक्तरचनेतील वैचारिक कुसूर, मांडणीतील कौशल्य, व प्रतिभेची सुभगता, प्रत्येक ऋचेत भाव-बुद्धीला 'उप-स्पर्श करून त्या ' गूळहं गभीरं ' 'तत्-त्वाच्या मनन निदिध्यासास

प्रेरित करते. काव्यगुणाने असे श्रेष्ठ असलेले हे सूक्त, जलसंप्रदायाच्या प्रचार-तंत्राचे, व पुराणकथांच्या पुनः-सृष्टीचे एक उत्तम उदाहरणही आहे. ऋग्वेदात इंद्राला प्राधान्य; इंद्राच्या योग्यतेचे कुणी नाही, एके काळी 'सम्राट्' म्हणवून घेतलेला वरुणही वेदकाळी इंद्रा-समोर गौण झालेला आढळतो. सारे तज्ज्ञ असे एक-मुखाने सांगतात. पण या ऋग्वेदातच 'आपण इंद्राची भर्त्री' असे सांगणारी एक देवी, "नार" ही आहे! पण अशा या देवीकडे अजुनी कुणाचे विशेष लक्ष वेधलेले दिसत नाही, याचे आश्चर्य वाटते. ऋग्वेदात श्रेष्ठ साहित्यिक गुणाची उषासूक्ते आहेत. प्रत्येक सूक्तस्थ देवतावर्णनात, ते ज्या देवाचे स्तोत्र असेल त्या देवाशिवाय इतर कुणीही श्रेष्ठ नाही; 'देवांचाही देव हाच, 'एको देवः' 'देव एकः' अशा अभिनिवेशातील प्रचारस्वरूपाची स्तोत्रे आढळतात. (उदा :– X, ८१. ८२. १२१; वगैरे) परंतु अंभृणी देवीच्या या आत्मकथनात श्रेष्ठ साहित्यिक गुणांबरोबरच तितक्याच परिस्फुट स्वरूपात प्रचारकी आवेशही व्यक्त होतो, हे तितकेसे प्रशस्त वाटत नाही. या सूक्ताद्वारे भारतीय जीवनादर्शांत-सांस्कृतिक मूल्यांत झालेली स्थित्यंतरे सुस्पष्टपणे प्रकाशात येत असल्यामुळे या स्तोत्राचे महत्त्व सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.

देवी अदितीचे सम्यक् दर्शन घडण्याच्या दृष्टीने, अंभृणी देवीच्या या सूक्ताचे समीक्षण आवश्यक झाले. अंभृणीच्या आत्मचरित्राच्या अनुषंगाने यापुढे अदिती व अंभृणी यांच्यामधील समान व विशेष गुणांचा अभ्यास करणे शक्य आहे.

श्री. एस्. एस्. भोसले

केशवसुतांचे ‘ सर्वेश्वर ’ पूजन

केशवसुतांच्या सामाजिक– ‘ मानवता’वादी– कवितात त्यांचे सर्वांगीण क्रांतिकारकत्व सर्वार्थाने दृष्टीस पडते. कलावंताच्या कवेत येणाऱ्या बहुतांशी जीवनाला स्पर्श करू इच्छिणाऱ्या त्यांच्या कवितेने सामाजिक जीवनाचे आत्मनिर्भरतेने घेतलेले दर्शन लोभनीय आहे : कातळ फोडून जीवन उसळावे तसे ते उफाळले आहे, जीत पाण्याच्या सतत झटक्यानी कातळालाही कंगोरे पडावेत तसे समाजातील जीर्ण रूढींचे आणि शीर्ण अनीतीचे फुगवटे पार खणवटून टाकण्याची ईर्षा आहे. या ईर्षेत अव्वल प्रचाराचा ऐस असूनही केशवसुतानी आपल्यातील ‘ मी ’ कलावंत आणि ‘ मी ’ चिंतक- या दोहोचे मिळून बनविलेले (की बनलेले) केशवसुत ‘ आम्ही’चे संयुग लाखाचे आहे. त्यातून केवळ खुरटे अनुकरण किंवा दुबळे अनुवादन यांच्या आहारी न पडता त्यांच्या सामाजिक कवितेने ऊर्जस्वल रूप प्राप्त करून घेतले आहे. साहजिकच तिला नवा साजशिणगार चढून वेगळ्या उंचीचे देणे लाभण्यात झाला आहे. त्यामुळे ती स्वतः तर धुंदतेच खेरीज रसिकालाही धुंदवीत नेते, चढवीत राहते. असल्या धुंदीफुंदीत इतर कसलाही विचार मग बाकी उरत नाही. केशवसुतांच्या रासवट भाषेचा, खडबडीत शब्दसौंदर्याचा, ओबडधोड रचनाकौशल्याचा, ‘ रानगट ’ व्यक्तित्वाचा. कसला कसलाही तिथे उरतो केवळ कलात्मकतेने नटलेला परिपूर्ण सामाजिक आशय आणि त्याने उभे केलेले वैचारिक क्रांतीचे वाण.

या वाणातून अस्सल शाहिरी आवेश प्रगटतो. नेटका, धीट, सरळ, अचूक, स्पष्ट, नेमका आणि चैतन्यपूर्ण किंबहुना त्याखेरीज त्याला व्यक्तीकरणच लाभत नाही, मानवत नाही. ज्याची सुळकी उडी तळाचा ठाव घेणारी–अंतिमाच्या गाभ्यात हात घालणारी–त्याचे हे असेच असते. केशवसुतांच्या मानवतावादी कवितेने अंतिम समतेचा पुकारा केला आहे. अधेमधे तिचे थांबणे नाही. टीकाकारांनी हवे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता असले चलनी शब्द वापरावेत. पण केशवसुतांच्या मनीमानसी ती झिजवट नाणी आहेत. त्यांचे पूजन काळाला अनुसरून ठीक असेल पण ‘ ठिणगी’चा ध्यास असणाऱ्याला तो अपुरा वाटतो, पुरा पडत नाही. ‘ मानवाच्या उदात्त सामर्थ्याच्या जाणिवेतून ’ फुललेल्या केशवसुतांच्या ह्या ध्यासातूनच त्यांची उदंड मानवप्रेमाची, ‘ प्रमेये ’ पालटवणारी सामाजिक कविता जन्म घेते.

जीवनाच्या पैदाशीचे सुसंगत शास्त्र आहे. पण त्याच्या पैदाशीनंतरचे जीवन–चैतन्य (किंबहुना ही पैदाईश हेच जीवनचैतन्य असते.) सुसंवाद साधत नाही. चौकटीत बसायचे ते नाकारते. निदान आपण तसे मुळीच बसू शकत नाही असा त्याचा सूर असतो, माणसाचा यत्न राहतो. अगदीच चौकट उभारता येत नसली, काटेरी कुंपणे आणि फुटक्यातुटक्या काचांयानी परिसर बंदिस्त करता येत नसला– जीवन म्हणजे २ + २ = ४ होणारे ठोकताळ्याचे गणित नव्हे–तरी त्याचे आखणे सुरू असते. जीवन कंठण्याच्या मार्गपद्धतीतील ते अपरिहार्यत्व असते. जीवनाच्या ह्या झेपा–झुंजी, तुफान–उसळी केशवसुतानी ‘ शिपाई बाण्याने ’ स्पष्टपणे जाणल्या आहेत. म्हणून ह्या चैतन्याच्या सरळमार्गी चालीत आडव्या येणाऱ्या हरेकाचा (मग त्यात कुणीही येवो) सुपडासाफ करावयाचा असा त्यांचा निर्धार आहे. मानवाच्या जिव्हाळी लागणाऱ्या एकूण एक अनिष्टाचा - राजकीय परतंत्रतेपासून तो सामाजिक परवशतेपर्यंत नष्टांश हा त्याचा हेतु आहे. कदाचित शक्तिबाहेरचे हे वजन उचलणेही असेल पण जाणिवेचा जोम आणि प्रतीतीचा जोस अधले मधले हॉल्टिंग स्टेशन मंजूर करीत नाही. थेट धाव त्या ‘ ब्रह्मांडाला पकडण्याची (म्हणूनच केशवसुतांची राजकीय-राष्ट्रीय -सामाजिक कविता राजकीय–राष्ट्रीय–सामाजिक राहत नाही. ती निखळ मानवतावादाचे लेणे चढवून येते.)

या पकडापकडीत- ' स्वजनकुदशा वाचुनी' रडण्याचा किंवा ' हृदय भंगुनिया ' जाण्याचा आणि याहूनही अधिक-छळवाद अंतर्भूत असतो. हजारात एखाद्या-च्याच नशिबी तो येतो, समाजसंवादनासाठी त्याला तो भोगावा लागतो. अन्यथा येणारे-जाणारे खूप असतात. जगात त्यांना तोटा नसतो. मात्र येणाऱ्या जाणाऱ्यात नुस्ते येऊन जाणारे खूप, अगदी भयंकर, थांबून गंमत पाहणारे आणि बंद पडत असेल तर दगड टाकून ती वाढवू पाहणारे एवढ्याच संख्येत असणारे; पण थांबून पाहून उपाय शोधणारे फार कमी. हाताची बोटे पुरेत. अशांना वगळता उरलेल्या मायेच्या खुणा बुजवून कार्यांची झुडपे वाढविणाऱ्या शब्द–बढबड्यांची गणती हवी तर शिरगणतीत व्हावी पण समाज-संवादनाच्या क्षेत्रात त्यांचे मूल्य ' झीरो ' असलाच तर शीण देण्याचा उपयोग. पण समाजवळणाच्या प्रबोधनात ही खोगीरभरती सोबत राखावी लागते. समाजाच्या उत्थानासाठी निष्ठापूर्वक अंगिकारलेल्या उपासनेत पराक्रमाची प्रेरणा देणारे हे पाठबळ दुर्लक्षून चालत नाही. कुणाही समुद्धारक तत्त्वांच्या उच्चारवंताला त्याचा आदर–स्वीकार करावा लागतो. धरित्रीवरील, मर-गळ आलेल्या आत्म्याच्या कायपालटासाठी सर्वस्पर्शी महाशक्तीचे प्रगमन साधावे लागते. त्या आंधारे पुढे सरायचे, सरकायचे, रेटायचे असते. त्यातूनच आत्म्याच्या मुक्तीच्या हव्यासा बरोबरच स्वातंत्र्याचा जयनाद कानी पडतो. पारतंत्र्यामुळे आम्हाला बघायला डोळे आणि ऐकायला श्रुती नसल्या म्हणून दुर्दशेचे वारेच खात रहावे किंवा दुःखभोग कवटाळून त्याला मिठी मारून बसावे असे नाही. असुख देणारे ते बीजच होय. परवशता–मग ती कुठल्याही रूपातील असो ती वाईटच. समाजबंधने मान्यच पण म्हणून स्वातंत्र्याचे हरण मान्य नव्हे. त्याने जगातून उठल्या-सारखे होते आणि लाजिरवाण्या स्थितीस नेऊन पोचविते. म्हणून ते जिंकणाऱ्यांचा आणि जितू देणाऱ्यांचा दोघांचाही निषेधच. चुकणाऱ्यांचा गौरव सर्वस्वी अनिष्टच पण चुका दुरुस्त होऊ नयेत असे नाही. त्यासाठीच तर ' परवशपणाची निद्रा सरावी ' ही इच्छा आणि ' स्वातंत्र्याचा द्युमणि उदया ' यावा ही पृच्छा आहे. त्यासाठीची कार्यशीलता स्वतःला पुढे रेटता नाही आली तर तिने अन्य कुणाच्या माध्यमातून सगुण रूप घ्यावे ही तळमळ आहे. अन्य कुणी काही करायचे ते करोत. करतीलही. पण बापू जवळचा आहे. त्याच्या मनोभावना आपल्याशी संधान बांध-णाऱ्या. त्याला केलेले आवाहन कारणी लागेल. निदान अगदीच वाया होणार नाही : " बापू ! गड्या ध्वज उभा करशील काय ? तू देशकारण करू झटशील काय ? स्वातंत्र्य देव मनसा भजशील काय ? " केशवसुतांच्या काळच्या देशाबाबतच्या ज्वलंत भावनेचे हे प्रस्फुरण अतूट बलदायिनी आहे.

आपल्या जीवनाचे कानेकोपरे बारीक नजरेने हेर-णाऱ्या केशवसुतांच्या कवितेने केवळ स्वातंत्र्यभावनेचे प्रज्वलनच केले आहे असे नव्हे तर अंतिम समतेच्या विवक्षेने समाजप्रबोधनही साधले आहे. याच समाज-जीवनासंबंधीच्या सबल भक्तीच्या भावनेतून ' अंत्य-जाच्या मुलाचा पहिला प्रश्न ' प्रकट होतो. अंत्यजता हा हिंदुसमाजाला जडलेला कॅन्सर, माणुसकीला लागलेला कलंक. त्याचा प्रभाव आणि परिणाम सांगण्यात जाणत्यांचा अधिक्षेप घडेल. पण हजारोंच्या सार्वजनिक रस्त्यावर महार पोरांनी खेळण्यात गैर काय ? ते खेळणेही रस्त्याच्या मधोमध नव्हे. ' पथाच्या कडेला. ' पण रूढींच्या कर्मकांडाने पुरत्या नासलेल्या विप्राला (आणि इतर अनेकानाही, ते काही कुणी ' सभ्य ' नव्हेत.) परवडणारे नाही. रस्त्याची मध काय किंवा कड काय, शेवटी सारा मिळून रस्ताच, खेळ कडेला असला तरी विटाळाचा ओघळ पसाळत रस्ताभर होणारच. महार पोरांना रस्त्यावर मग कसे थांबता येईल ? (वस्तुतः धरतीवर कुठे ना कुठे ही महार पोरे असणार. सारी धरती एक आणि ही कार्टी इथे ना तिथे अडमडणार. म्हणजे कुठेही असली तरी विटाळ असा असा ओघळत पोचणारच. पण कर्मकांडात एवढ्या पल्ल्याचा विचार बसत नाही. दृष्टीला येणाऱ्या प्रत्यक्षाचाच येतो.) खेळणाऱ्या पोरा-तील बहुतेक सारी धूम ठोकतात. पण एक धीट उरते. (हा त्या उगवत्या काळाचा प्रतिनिधी) पण त्याला ' धम्मक लाडू'ची धमकी. तेही सुसाटते. (यथावकाश काळाने यावयाच्या पक्वेपणातील हे कच्चेपण) थेट आईकडे जाते. त्याचा प्रश्न : " जरी त्यावर सावली

माझि गेली. तरी काय बाधा असे ठेविलेली ?" प्रश्न मूलभूत. उत्तर निरुत्तर. पण समजूत पडणे नावाचा काहीतरी एक भाग आहे. उत्तर येते, "अम्ही नीच बा, आणि ते लोक थोर; तयां पाहतां होईजे नित्य दूर." जुन्या काळच्या ठशाची, अंधारी मनाची आई. तिचे हे उत्तर. प्रश्नकर्ते पोर उगवत्या पिढीचे, उत्तरणारी आई विरणाऱ्या युगातली. आईच्या 'सुधे बोलण्यात' सहनशीलतेची पराकोटी असली तरी त्यातूनच पोराच्या रूपाने-नव्या जीवनाने-तरुण बदलाने येणाऱ्या क्रांतीचे झालेले हे पथनिर्देशन आहे; 'स्वप्नतापा'ची ती नांदी आहे. त्यातूनच ठिणग्या फुटणार आहेत, झोपमोड होणार आहे, समत्वाच्या सूत्राचा अर्थ मस्तकी भिनणार आहे. 'मजुरावर उपासमारीची पाळी'ने त्याचे भरपेट पोषण केले आहे. अंत्यजापासून मजुरापर्यंत सारे कसे एकवटून येत आहे. त्यात या ना त्या रूपातला बदलच संभवतो. अवतीभोवती मंदिरे खुलावती आणि आमची इकडे भुकेने तळतळ व्हावी, याचा अर्थ काय ? हा अर्थघन प्रश्नच बदल दृढ करतो. तो आज ना उद्या होणार यात शंका नसते. पण क्रांतदर्शी कवीच्या मनाने घेतलेली ही जाग, त्याच्या अंतः-करणाला पडलेले हे स्वप्न-त्याच्या पूर्तीच्या मार्गात काही अडसर येतात. काळाचे ठसे आणि कर्मकांडाचे संस्कार यांनी जुलमाच्या प्रतिकारात उणे राहते. तशी महारपोराची आई काय किंवा कवडीही न मिळाल्याने भुकेने मरणारा मजूर काय–ही 'जनता' प्रतिकाराच्या जाणीवेपासून कितीतरी दूर... 'सर्वं दुःखम्' मानणारी... शब्द फुटणे हेच त्या काळाचे मोठे अपत्य. केशवसुतांच्या समाजप्रबोधनविषयक कवितेत याचेच प्रमुखत्वाने दर्शन होते. मात्र वेध घेतला जातो आणि विंधून जातो तो त्यांच्या क्रांतदर्शित्वातील 'बलस्थाना'ने ! अन्यथा आईचा 'नित्यदूर' होण्याचा सल्ला आहे तर 'हेवा तयांचा मजला मुळी नसे, जाडी मला भाकर ती पुरे असे" अशी मजुराची विनीत वृत्ती आहे. या कमालीच्या सोशिक वृत्तीच्या साचलेपणातून होणाऱ्या अचानक स्फोटात स्वाहाकार असतो पण मरगळलेल्या वृत्ती गतिरोध करतात ही गोष्टही डोळ्याआड करणे इष्ट नाही. "कष्टात देवा ! मरण्यास तत्पर, का मारिसी हाय ! भुकेमुळे तर ?" या मजुराच्या दैवबेड्या प्रश्नात त्याचे उत्तरच नाही काय ? असल्या हताश वैतागापोटी "जन्मास मी काय म्हणोनि आलो ? येताच वा कां न मरोनि गेलों ?" असल्या बुळ्या प्रश्नांचा कवटाळ उपजत गेल्यास नवल नाही. 'शास्त्राद्रुढिर्बलीयसी' लोक मानतात म्हणून हे घडते हे खरे म्हणूनच 'विस्मृतिचिया खोल खाड्यामधी' ती गाडणे जरूर. तीत 'मूर्ख लोकां' ताळ्यावर आणणारे क्रांतदर्शित्व आहे, गलितगात्र मंत्रबळाहून ऐश्वर्यसंपन्न क्रांतिबलाचे प्रोक्षण आहे.

'जगाचे क्षणोक्षणी रंग' बदलायचे तर ह्या प्रोक्षणाची नितांत गरज आहे. त्यातून रूढीचे दास खवळणार आहेत. औचित्याचा फोल विवेक मिटणार आहे. द्यावापृथ्वी द्रवुनि वेगाने मिसळणार आहे. जुलमाचे तुकडे तुकडे होणार आहेत. देवांनाच धुडकावण्याची ताकद संचारणार आहे. मात्र साम्यवादाच्या आवेशाने ताणलेल्या शीरांचे नजरेला पडणारे भरपेट ठसठशीतपण, अग्वलरंगी शाहिराचे उसळतेपण आणि केसांचे पिंजारलेपण जाणवणारे असले तरी साध्य साधन विवेकाने अखेर 'सत्त्वाचा उदयोऽस्तु' करायचा आहे. त्यात 'मूर्तिभंजन'–'बुतशिकन्' आहे पण 'बुतफरोश' नाही. मूर्ती विकणारे सत्त्व आणि स्वत्व यांचाच विक्रा करीत असतात, 'देव' गमावून बसतात. काही ते आपले कार्य नाही. नाव घालवणाऱ्या आणि अरिष्टाची उपासना सांगणाऱ्या साऱ्या 'मूर्तीं'चे मुंडन करायचेच आहे पण त्यातही "मूर्ती फोडुनियां, देऊं जोडूनियां । परी विकूनीयां, टाकूं न त्या" असे अनुष्ठान आहे. त्यासाठी 'नवा शिपाई' उभा आहे. त्याचे उभे ठाकणे तात्कालिक नाही तर सार्वकालिक आहे. सर्वस्पर्शी तसेच सर्वगामी आहे. डोळे गरगरून यावेत आणि बुद्धी चक्रावून जावी असा त्याचा 'ताठा' आहे. "ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा" ह्या सर्वंकष समतानिष्ठ व्यापक प्रतिज्ञेने केशवसुतातल्या 'मानवा'ने संकुचिततेच्या, आकुंचितपणाच्या, क्षुद्र हेव्यादाव्यांच्या अगदी पलीकडे ठाण मांडले आहे. निर्लेप आहे. त्यामुळे कुंपणात न बसणाऱ्या, सर्वत्र भावंडे असणाऱ्या, आपुल्यामधे विश्व पाहुनी विश्वाला पुजणाऱ्या, सर्वत्र भावंडे असणाऱ्या, 'मी' हा शब्दच न लागणाऱ्या

मानवतावाद्याचे–सच्च्या क्रांतिकारकाचे–लागेबांधे पार मातीखालच्या मातीत गेलेले आहेत. " ती माझी, मी त्यांचा, एकच ओघ अम्हांतुनि वाहे ! " म्हणून तर " तेच पतित की जे आंखडिती प्रदेश साकल्याचा " आहे. आकाशाच्या पोकळीतून साद यावा आणि धरित्रीच्या गर्भातून नाद घुमावा अशी त्याची तडफड आहे. त्यासाठी 'स्वप्राणाने' 'तुतारी' फुंकणे आहे; तिच्या रणवेशाने सगळी गगने भेदून टाकायची आहेत. अवकाशाच्या ओसाडीतील मुके पडसाद वाचाल करायचे आहेत. रूढी, जुलूम, दंभ यांची फाडून खाणारी राक्षसी संताने गाडायची आहेत. " ते पुराण तेथुनि सुंदर, सोज्वळ, गोडे, मोठे ? अलिकडले ते सगळे मोठे ? "ची अवडंबरे नष्ट करायची आहेत. स्वार्थाथनपेक्ष जीवाने संघशक्तीचे खंदक भरायचे आहेत, संप्रति माजलेले दानव दूर फेकायचे आहेत. 'विशाल भूधरात सुंदर लेणी ' खोदण्याच्या विक्रमाने देवाबर झेंडा मिरवायचा आहे. त्यात त्रिगुणी समाजास त्रिगुणी माल पुरविण्याची हुकमेहुकूम ठेकेदारी नाही तर अश्रूंच्या डोही भिजलेल्या जीवनाचे नवे धारदार कर्तृत्व आहे; उगवत्या जीवनाचे यौवनगीत आहे.

या यौवनगीताचे सूर ज्या काळात लागले त्या काळाचे रूप काय होते ? स्वरूप कोणते होते ?— केशवसुतांच्या मानवतावादी कवितेच्या संदर्भात या प्रश्नाला खूपच महत्त्व आहे : केशवसुतांच्या काळची सामाजिक परिस्थिती अनिष्ट धार्मिक कल्पना व घातुक आचार यांनी भरलेली होती. इतर अनेक कारणांबरोबर भयानक अज्ञानाने चलत्या असलेल्या जीवघेण्या रूढींनी संस्कृतीला अर्थ ठेवला नव्हता त्यातच राजकीय दास्याची भर होती. सर्व बाजूंनी बांधून टाकले होते, घेतले होते. पेट्रोल साठ्याच्या आकस्मिक स्फोटात सर्वांगाची सालडी लोंबावीत तशी संस्कृतीच्या मूळच्या मोठेपणाची लक्तरे लोमकळत होती, रस्त्यावर होती. जे काही निर्माण झाले होते त्यास कवचकुंडलाचे रूप आले होते. पण आचार्य स. ज. भागवत यानी १९४८ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात दिलेल्या व्याख्यानात म्हटल्याप्रमाणे, "आपल्या समाजावर हे जे रूढीचे कवच निर्माण झाले होते त्याला बाहेरून (ही) लाथ देऊन ते फाडून टाकण्याचे कार्य पाश्चात्य संस्कृतीने केले. इंग्रज आपणावर राज्य करू लागले. त्यांच्या व आपल्या संस्कृतीचा संघर्ष झाला आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता ही सुप्रसिद्ध त्रयी आमच्या विचारवंतांच्या कानावर पडली. या त्रयीचे पडसाद गद्यामध्ये आगरकरानी व कवितेमध्ये केशवसुतानी प्रथम उमटविले. आपल्या संस्कृतीला यावेळी असे एक ' जडत्व ', ' निर्जीवपणा ' आला होता, तसा आपल्या काव्यातही तो भरून राहिला होता. " संस्कृतीच्या ह्या कोंडीला आगरकर–केशवसुतांनी सुरुंग लावला. चांगले खोलवर खणून सुरुंग लावला. या संघर्षात शब्दप्रामाण्याचे पाय मोडत होते. पुराव्याविहीन बडबडीला सज्जड आधाराची मागणी होती. शब्दा-अर्थाच्या मखलाशी पोकळ खुंट्या उपटून फेकल्या जात होत्या. भलेपणाचे शिसवी बार घट्ट मेखून रोवले जात होते. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य आणि ऐहिकतेचे सुखसंवर्धन यांच्या घणाघाताने चिपळूणकरांची केवळ भाषेतील पुनरुज्जीवनवादी विचारसरणी दूर ढकलली जात होती. महाराष्ट्राचे शरीर, मन आणि जीवन यांच्या पुनर्जन्माचा योग सुरू होता. पूर्वचिन्हे पूर्वीपासूनची असली तरी केशवसुतकाळात त्यांचा भर होता. या साऱ्या बदलत्या वातावरणातून निर्माण होणाऱ्या भावात्मक मूल्यांचा (Positive values) केशवसुतावर खोल परिणाम आहे. केशवसुतांचा त्यांचा–त्यांचा स्वतःचा म्हणून–हा परिणाम आहे. तत्काली आगरकरांनी उभारलेल्या वैचारिक बंडखोरीने हा परिणाम पुष्ट बनविला आहे. त्या दृष्टीने आगरकराशी त्यांचे निकटचे वैचारिक नाते आहे. पूर्वोल्लेखाप्रमाणे अनुकरण किंवा अनुवादन असे त्यात नसून छाया आगरकरांची, मुद्रा केशवसुतांची असेच घडले आहे. जीवनाच्या हरेक अंगाला स्पर्श करण्याच्या प्रतिज्ञेने झपाटून कटिबद्ध झालेल्या केशवसुतांना अनुकरण वा अनुवाद अशक्य होता. स्वतःच्या काव्याने समाजात स्फूर्ती निर्मू इच्छिणाऱ्याला ' औरसत्व ' च पहावे लागते, अनौरसत्व त्याच्या दृष्टीने कालबाह्यच असते. अस्सलाची खाज दत्तकाने भागत नाही. भागल्याचा बहाणा केला तरी चढतेवाढते रूप येत नाही. म्हणूनच केशवसुतांची अनुभूती खोटी किंवा उसनी राहिली नाही. ती अस्सलतेने अवतरली; अस्सल होती म्हणून. भावनांचा प्रखर उद्रेक कवितेचा आत्मा बनला; काळजातून काव्य फुटले; आगीच्या लळलळत्या लोळातील दहनाचे सामर्थ्य आले. नव्या

शिपायाचा डिंडीम, तुतारीची गर्जना, ' गोफण'ची हाणाहाण-सामर्थ्याच्या या विस्तारासाठी आहे. 'मनाच्या मळयाच्या जाणीवेच्या सीमारेषा ' फार विस्तृत असणाऱ्यालाच ते शक्य आहे. क्रांतिरसाची भावशक्ती मळयाच्या या सामर्थ्यात साठविलेली आहे; पण तेवढेच त्यात आहे असे नव्हे तर पुराण्या आप्तवाक्यांना जाळणारे आणि ते जळत नाही तोवर त्यासाठी जळणारे हृदय आहे, जाणीवेचा जिव्हाळा आहे.

त्यादृष्टीने केशवसुताच्या कवितेत राजकीय किंवा सामाजिक विचाराच्या दर्शनापेक्षा मानवी जीवनाच्या अंतिम हेतुसंबंधीचा विचार अधिक प्रबळ आहे, किंबहुना तोच एक आहे, दुसरे काहीच नाही. बाकी आहेत त्या शिड्या, तिथपर्यंत जाऊन पोचण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या ! तशी केशवसुतांची सामाजिक किंवा राजकीय कविता सामाजिक किंवा राजकीय अशी नसून मूलतः ती मानवाच्या मंगल जीविताशी, त्या जीवितमार्गात उगीच अडमडणाऱ्या खडक-कातळाशी आणि त्याच्या प्रयोजनाशी संधान बांधून आहे. म्हणजेच ' माणूस ' या घटनेशी ती कुऱ्यासारखे इमान बाळगून आहे. त्यामुळे 'समकालीन राजकीय किंवा सामाजिक अशा तात्कालिक घटनांचा उल्लेख ' कुठेही होत नाही, फक्त ' सामान्य परिस्थितीचे अप्रत्यक्ष सूचन ' होते. म्हणजेच समाज फिरवण्यासाठी लागणारी चेतनशक्ती देण्याचे कामच केशवसुतांच्या कवितेने स्वीकृत केले आहे. या स्वीकृतीत आगरकरांच्या विचारातील मूळ गाभ्याचा आणि विचारप्रकटीकरणातल्या आवेशाचा असा दोहोचाही असर आहे. मराठी माणसाच्या रणरणत्या पिंडाने हा असर उजळून टाकला आहे, बेफाम ऊर्जस्वल बनवला आहे.

या ऊर्जस्वलतेत अहंकार जाणवतो. चांगलाच जाणवतो. विशेषतः व्यक्तिस्वातंत्र्याच्या जयजयकारात त्याचे जाणवणे खूपच घडते. पण नव्या समाजाची रचना आणि उभारणी करण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा केशवसुतांना वापर करायचा होता हे ध्यानात घेतले की हे जाणवणे खूपच खाली येते. केशवसुत ' विशाल भूधरा'त ' सुंदर लेणी ' खोदण्यासाठी ' नव्या मनूतिल नव्या दमाचा ' ' शूर शिपाई ' बनून आले आहेत. " आडवतील जरि देव तरी ! झगडूं त्यांच्याशी निकरीं । हार न खाऊं रतीभरी ! " असा अटीतटीचा सामना आहे. त्यात प्रतिगाम्यांच्या, सनातन्यांच्या पीछेहाट करणाऱ्या कल्पनांचा निःपात करण्याचा निर्धार आहे. या निर्धारात ' देवदानवा नरे निर्मिले हे मत लोकां कळवू द्या ' असा तारणारा निखळ मानवी दृष्टीकोन आहे. आत्मघातकी परंपरांच्या या मृत्यूत व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड लपविलेला अहंभाव किंवा अहंकार नाही. फुसका आवेशही नाही, तो आहे ' आत्मप्रत्यय '; समाजपूजनासाठी– सर्वेश्वर-पूजनासाठी– मुळातून उचंबळून आलेले ते आवेगीकरण आहे. जीवनाच्या अन्वयार्थावर आधारलेली पौरुषसंपन्न आत्मविश्वासाची ती ऐट आहे; संघशक्तीचे युयुत्सु आवाहन त्यात समाविष्ट आहे.

केशवसुतांनी जीवनाला पोखरणाऱ्या साऱ्या अंतर्बाह्य कुरूपतेवर तडाख्याने हल्ल्यामागून हल्ले चढविले आहेत. समाजातल्या सर्वोत्तम सर्वेश्वराची अंतिमातील हिरण्मयाशी त्यांना सोयरीक जोडावयाची होती.त्यासाठी नरानेच नराला आणलेला हीनपणा त्यांना बदलायचा होता. त्यासाठी ' योद्धे हो ! ' ही साद आली आणि ' झटुनि द्या प्राण ' हा मंत्र सुसाणला. ' तत्कालीन आत्मजागृत नव्या समाजाचे ते प्रातिनिधिक मूल्य ' आहे, केशवसुत ही व्यक्ती निमित्तमात्र आहे. पण त्यांच्या भावनेतील चमक, विचारातील वादळ आणि लिखाणातील गडगडाट– साऱ्याचीच पाळेमुळे या भूमीशी खोलवर रुजून आहेत. द्यावापृथ्वीवरील उदात्त कोमल सौंदर्य प्रेमाने भारलेल्या जीवनप्रेमी विश्वकुटुंबी वृत्तीने ती फुलली आहेत. त्यामुळेच आकाशातल्या घर्षण–क्षेत्राची वाढती व्याप्ती रानारानाच कळते त्याप्रमाणे " विश्वगत विशाल जीवनाशी समरस होऊ बघणाऱ्या मानवतावादाचे सौंदर्य बघावयाचे असेल तर त्यासाठी केशवसुतांच्याच काव्याकडे वळावे लागेल. " हे आचार्य भागवतांचे मत आजही खोटे पडत नाही. त्याचबरोबर मराठी कवितेच्या कक्षा रुंदावत असताना, अमरशेख, शरच्चंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, वसंत बापट ह्यासारख्या मंडळींचे पक्के स्मरण मनात राखूनही केशवसुतानंतर त्यांच्याशी निदान बरोबरी साधू शकेल असा कवी का उपजला नाही याविचाराबरोबरच त्यांच्या थोरवीचे ठसे मनावर अधिकाधिक गडद, गहिरे होत जातात.

प्रा. ना. बा. मराठे

संपादनशास्त्र : कला व तंत्र

आधुनिक ग्रंथांच्या अंतरंग व बहिरंग पद्धतीत जे आमूलाग्र बदल घडत आहेत आणि ग्रंथांच्या उपयुक्ततेत दिवसेंदिवस अधिकाधिक भर पडत चालली आहे, त्यामागे ज्या शास्त्राचा, कलेचा वा तंत्राचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हात दिसतो त्या संपादनशास्त्र : कला व तंत्र याचा विचार करावयाचा आहे. ग्रंथविद्येच्या विकासात या संपादन चातुर्याचा निःसंशय फार मोठा वाटा आहे. मराठी भाषेत ' संपादन ' या विषयावर खास करून विशेषशी माहिती सापडत नाही. संपादन करणे हे एक शास्त्र आहे, त्या शास्त्राचा योग्य वापर करणे ही एक कला आहे, या शास्त्राचा कलात्मक वापर करण्याचे तंत्रही घडू पाहात आहे. या शास्त्राचे रूढ संकेत बाजूला ठेवून नवीन नवीन तंत्राचा वापर करण्याचे स्वातंत्र्य या कलेला मंजूर आहे. लघुकथा तंत्र मंत्र विकास लिहून लघुकथा लिहू इच्छिणाऱ्या नवशिक्यांना प्रा. फडके यानी मार्गदर्शन केले तसे ' संपादन तंत्र : मंत्र विकास ' लिहून एखाद्या मर्मज्ञ संपादकाने ही कामगिरी उचलली असती तर मराठी मायबोली त्या संपादकाची नक्कीच ऋणी राहिली असती.

संपादन

वर्तमानपत्रांचे संपादन आणि ग्रंथांचे संपादन यात मूलतःच फरक असतो. वर्तमानपत्राच्या संपादकाला ते वर्तमानपत्र अशा तऱ्हेने सजवावयाचे असते की ते आबालवृद्धांना वाचावेसे वाटावे. विशिष्ट विषयाला वाहिलेल्या कालिकाच्या संपादकाला त्या त्या विषयातील जटिल प्रश्नांवर वा तात्कालिक प्रश्नांवर लिहिल्या गेलेल्या लिखाणाचे आपल्या कालिकाने ठरविलेल्या आपल्या काही एका विशिष्ट साच्यात बसते की नाही हे ठरवावे लागते व मुद्रणाच्या दृष्टीने जे फेरफार करावयाचे ते करावे लागतात. वर्तमानपत्रे (Newspapers) व कालिके (Periodicals, Journals) यांच्या संपादकांचे कामही वेगवेगळ्या ठराविक साच्यांचे असते. दैनिक वृत्तपत्राच्या संपादकाला आपल्या विशिष्ट दृष्टीकोणानुरूप येणाऱ्या बातम्यांचे वर्गीकरण करून कमी अधिक महत्त्वाच्या मानाने मुखपृष्ठावर द्यावयाच्या की इतर पृष्ठावर रवानगी करावयाची हे ठरवावे लागते. सामान्य विषयालाही असामान्य महत्त्व देऊन अगर असामान्य महत्त्वाच्या विषयाला सामान्य लेखून त्यांची विल्हेवारी करण्याचे काम या संपादकांना सहसम्पादकांच्या साहाय्याने करावे लागते. या उलट कालिकांच्या संपादकांचे काम काहीसे त्या तुलनेत सोपे असते. आलेल्या लिखाणाची कालिकाच्या स्थान–मर्यादा ओळखून निवड करावयाची, मूळ लिखाणात जरूर तर फेरफार करावयाचे, योग्य असे मथळे द्यावयाचे अशा तऱ्हेचे काम या संपादकांना करावे लागते. कालिकांची संपादकीये व दैनिक वृत्तपत्रीय संपादकीये यात सामान्यतः फरक आढळतो. दैनिक वृत्तपत्रांचे संपादक रोजच्यारोज घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांवर स्तंभांतून (Columns) आपले विचार व्यक्त करतात. काही देशांतून दैनिक वृत्तपत्रांच्या संपादकांच्या मतांचा प्रचलित राजकारणावर परिणाम घडविण्यास मदत होते. प्रमुख वृत्तपत्राचे संपादकांची अमुक एका घटनेसंबंधी मते काय आहेत याचा संदर्भ राजकीय पातळीवर चर्चा करणाऱ्यांना घ्यावा लागतो. राजकीयदृष्ट्या प्रमुख वृत्तपत्रांच्या संपादकांचे स्थान बरेच मौलिक समजले जाते. ग्रंथ संपादकाचे स्थान विद्वत्तेच्या क्षेत्रात मौलिक असते.

संपादक

वर्तमानपत्राच्या संपादकापेक्षा ग्रंथ संपादकाचे संपादकीय कामकाज वेगळ्या प्रकारचे असते. संपादक या एकाच शब्दाने दोन विभिन्न अर्थी हा शब्द रूढ झाला आहे. पुस्तकांचे संपादन करणारा, मालेचे संपादन करणारा, कोशाचे संपादन करणारा, ग्रंथसूची—संपादक, इत्यादि आणि वृत्तपत्रांचे संपादन करणारा संपादक ! प्रस्तुत स्थली पुस्तकाचे संपादन करणाऱ्या संपादकांच्या कामकाजाच्या मर्यादा कोणत्या त्या पाहावयाच्या आहेत. कारण ग्रंथविद्येच्या विकासात या संपादन

कार्याने बहुमोल भर घातली आहे. संपादक या नात्याने, माला सम्पादक, ग्रंथसम्पादक, कोशसम्पादक, इ. चे कार्य बरेचसे एकाच तऱ्हेने असते. पण त्याजबरोबर अतिशय जिकिरीचे असते. पुस्तकाचे महत्व संम्पादकीय हात फिरल्याने वाढते किंवा महत्त्वाच्या पुस्तकाला उत्तम सम्पादक न लाभल्याने ते गबाळ्या स्वरूपात प्रकाशित केले जाते. श्री. आठल्ये यांनी भाषांतर करून प्रसिद्ध केलेल्या अन्नंभट्टाच्या तर्कसंग्रहाला श्री. बोडस यांच्यासारखे सम्पादक मिळाले आणि मूळ पुस्तकाच्या उपयुक्ततेत भर पडली. मम्मटाच्या काव्यप्रकाशाचे महत्त्व प्रा. गजेन्द्रगडकर यांच्यासारख्या सम्पादकाचा हात फिरल्याने किती तरी वाढले. तर ' महाराष्ट्र परिचय ' सारख्या उत्तम कल्पनेने प्रेरित झालेला ग्रंथ इष्ट अशा सम्पादकाभावी सन्दर्भ ग्रंथ म्हणून वापरणे मुष्किल होते. किंवा Index to the papers in commemoration volumes सारख्या अतिशय महत्त्वाच्या संदर्भग्रंथामध्ये सूची नसल्याने तो सन्दर्भ ग्रंथ म्हणून वापरणे कठीण जाते.

ग्रंथसम्पादन

सम्पादकाने पुस्तकाचे सम्पादन करावयाचे म्हणजे नेमके काय करायचे असते ? या प्रश्नाचे उत्तर केवळ व्यापक स्वरूपात देता येईल. ' उत्कृष्ट रीतीने प्रकाशित होईपर्यंत पुस्तकासंबंधीचा पुरा आराखडा प्रत्यक्षात आणण्यासाठी आन्तर्बाह्य जे जे करावे ते ते सम्पादकीय कार्यातच गणावे लागेल. ' हस्तलिखित गोळा करून मूळ संहिता पाठ निश्चित करणे, जरूर तर अनुवाद, शक्य तेथे टिपा-टिप्पणी. चिकित्सक प्रस्तावना, थोर लोकांचे पुरस्कार, प्रकाशक मिळवून त्याच्या मार्फत प्रकाशनाची कामगिरी उरकून घेणे, मूळ मुद्रणप्रत बनवणे, प्रुफे तयार झाल्यावर हवा नको टाईप ठरविणे, पुस्तकाचे सौष्ठव (get up) पाहाणे, खर्चाची तोंडमिळवणी करणे, पुस्तकाची विक्री व प्रसिद्धी व्यवस्थित होते की नाही पाहाणे, त्यावरील अभिप्रायांची (Book Reviews) व्यवस्था करणे व दखल घेणे यासारख्या अनंत कार्यांची जबाबदारी या सम्पादकाची असते. ज्ञानकोश, विश्वकोश, संस्कृतिकोश यासारखी प्रचंड कामे अंगावर घेऊन ती तडीस नेणाऱ्या सम्पादकाचे अखंड प्रयत्न याबाबतीत ' सम्पादन कार्याचे मानदंड ' ठरावेत इतके भरीव समजले पाहिजेत. सम्पादकालाच क्वचित् संकलक, वा संग्राहक या नात्याने कार्यभार उरकावा लागतो. अशावेळी ज्याचे संकलन वा संग्रह करावयाचा त्या मूळ लेखनातच योग्य ते फेरफार करून घ्यावे लागतात. कोणते फेरफार कोणत्या कारणास्तव केले याची नोंद ठेवावी लागते. मनात येईल तसे फेरफार करून छापले तर मूळ लेखकावर अन्याय न करता, लेखनाच्या अभिरुचीत व्यत्यय न येता किंबहुना अभिरुचीत भरच पडेल इकडे लक्ष ठेवून त्या लेखनाचे संकलन वा संग्रह करावा लागतो. काही ठिकाणी अभिनंदनग्रंथ प्रसिद्ध करण्याचे ठरते. मान्यवर लेखकांकडून विशिष्ट विषयांवर लेख मागवून त्यांचा संग्रह प्रसिद्ध केला जातो. यावेळी ज्याचे अभिनंदन करावयाचे त्या व्यक्तीचे त्या विषयातील प्राधान्य डोळ्याआड करून चालत नाही. डॉ. गोडे यांच्या अभिनंदनपर ग्रंथात विद्वान सम्पादकांनी जी जिवापाड मेहनत घेतली आहे ती ' अभिनंदन ग्रंथ ' सम्पादकानी डोळ्यासमोर ठेवण्यासारखी ! किंवा ' डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे : व्यक्ति व कार्य ' हा जो अभिनंदनग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला तोही लक्षात घेण्यासारखा.

संशोधित आवृत्तीचे सम्पादन

विविध हस्तलिखित पोथ्या गोळा करून त्यातून विश्वासार्ह अशा एका हस्तलिखित पोथीच्या आधाराने एक आदर्श पाठ असलेली मूळ संहिता तयार करावयाची व इतर पोथ्यांतून मिळालेले पाठभेद (Variants) नमूद करावयाचे, व्याकरणदृष्ट्या किंवा संदर्भदृष्ट्या जरूर तेथे मुळांत दुरुस्ती (Emendation) सुचवावयाची, मिळालेल्या हस्तलिखित पोथ्यांची वर्णनात्मक माहिती (Description) द्यावयाची, संपादित केलेल्या ग्रंथाच्या अंतर्गत व बहिर्गत पुराव्यांवरून ग्रंथकाल, ग्रंथशैली, ग्रंथगत विषय–अनुसंधान, ग्रंथसारांश इत्यादि माहिती द्यावयाची, मूळ हस्तलिखिताचे छायाचित्र (Facsimile), शेवटी उल्लेखसूची, पारिभाषिक शब्दार्थ संग्रह (Glossary of the technical terms) यासारखे विषय ग्रंथाच्या संशोधित आवृत्तीत (critical edition) सापडतात. त्यातील पाठभेद कोणत्या मुद्यावर ठरवायचे याबद्दलची विस्तृत माहिती पाठचिकित्साशास्त्रात मिळते. यूरोपमध्ये हे शास्त्र सोळा-सतराव्या शतकापासूनच उपलब्ध होते.

अनुक्रमणिका

आपल्याकडे मूळ ज्ञानेश्वरीचे संशोधन करून एकनाथांनी 'एकनाथी प्रत' तयार करविली असा इतिहास सापडतो. त्याही पूर्वी बाराव्या शतकात सायणाचार्यांनी चारही वेदांवर भाष्ये लिहिली त्या वेळी वेगवेगळ्या पोथ्या जमा तरी कराव्या लागल्या किंवा लेखकांकरवी लिहवून तरी घ्याव्या लागल्या असाव्या. भगवान् पतंजली आणि कात्यायनी यांनी पाणिनीय सूत्रावर भाष्य आणि वार्तिके लिहिली त्यानीही मूळ सूत्रांत फरक सुचवले आहेत. ठिकठिकाणी पसरलेल्या ऋचा आणि सूक्ते एकत्र संग्रहित करून वेदांच्या संहिता बनविल्या गेल्या हा आपल्याकडचा प्राचीनतम पुरावा म्हणता येईल. त्याला पाठचिकित्साशास्त्र म्हणता येणार नाही. हे खरे तथापि संग्रह करून ' संहिता ' बनवण्याचे तंत्र इतके जुने आहे हें नक्कीच ! भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातर्फे डॉ. सुखठणकर यांच्या संपादकत्वाखाली महाभारताची चिकित्सक संशोधन आवृत्ति तयार करण्यासाठी जे परिश्रम करण्यात आले त्याचे डॉ. सुखठणकरांनी प्रस्तावनेत पुरे निवेदन केले आहे. भारतीय पाठचिकित्सा शास्त्राची मुहूर्तमेढ या प्रस्तावनेत रोवली गेली. डॉ. सु. मं. कत्रे यांनीही या शास्त्राची एका पुस्तकातून मांडणी केली आहे.

संपादकीय संशोधनकार्याचा व्याप थोडक्यात असा :

अ) पारिभाषिक शब्दांचा योग्य वापर करणे.

आ) नजरचुका टाळणे (Avoid the errors of the eye)

१. अक्षरांची गल्लत होते.

२. अक्षरे गाळली जातात.

३. अक्षरांची उलटापालट ठीक करावी लागते.

४. संक्षिप्त चिन्हांचा योग्य वापर करणे किंवा गैरवापर टाळणे.

५. घ, ध, म, भ, ख, र, व, अशा सारख्या अक्षरांची काळजी घेणे.

६. कालदोष टाळणे.

इ) निष्काळजीपणामुळे अक्षरे, वाक्ये, ओळी उलट्या सुलट्या होतात, पुनरावृत्त होतात ते पाहणे (Omissions and commissions through negligence).

ई) शब्दाशब्दांतील घोटाळे तसेच राहतात, (Confusion of words) ते कटाक्षाने टाळणे.

उ) चुकीची शब्दफोड वा चुकीचे समास होऊ न देणे (Faulty divisions of the words and compounds).

ए) शब्दसाधर्म्याने होणारे व्याकरणदोष टाळणे (Grammatical assimilations).

ऐ) बिनमहत्त्वाच्या शब्दांचा पसारा कमी करणे.

ओ) मुळातील नसलेला मजकूर अकारण काढून टाकणे वा काटछाट करणे.

औ) मुळात नसलेला मजकूर मुळात न घुसडणे (Interpolation).

अं) मूळ मजकुरांत सुधारणा करणे. (Emendations).

अः) सम्पूर्ण मजकूर वाचून त्यात तांत्रिक दृष्ट्या पौर्वापर्य साधणे.

२ अः) संशोधित आवृत्ति (Critical edition) असल्यास आंतर्बाह्य पुराव्यांवरून: (१) मूळ पाठ निश्चित करणे (२) पाठभेद तळटीपातून देणे (३) मूळ पोथ्यांचे वर्णन देणे (४) सूची तयार करणे (५) आवश्यक तेथे टीपा देणे (६) भाषांतर देणे (७) विषयाची व कार्याची व्याप्ति दाखवणारी समुचित प्रस्तावना देणे (८) आत्यंतिक वा तर्कदुष्ट विधाने काढून टाकणे.

उदाहरणार्थ

(१) एल्. सी. बेरेट् (L. C. Barret) यांनी अथर्ववेदाच्या पैप्पलाद संहितेचे संपादन केले आहे. मूळ भूर्जपत्रावरील लेखन अर्थाशी सुसंगत वाटेना म्हणून त्यांनी—

' श्रियं धातुर्मयि धेहि श्रिया धिपतिं कृणु ।
यशसेशानो मघवानिद्रां मा यशसा नयत ।। '

या ऋचेतील ' यशसेशानो'च्या ऐवजी ' यशमीशानो ' अशी पाठ दुरुस्ती (emendation) सुचवली. परंतु प्रा. दुर्गामोहन भट्टाचार्य यांना ओरिसातील मयूरभंज संस्थानात बारीपद (Baripada) गांवी उडिया लिपीतच एक नवी पोथी सापडली. तिथे पाठचिकित्सा शास्त्राप्रमाणे संशोधन करून तिचा नुकताच एक भाग प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्याच गावच्या ब्राह्मणांच्या

अनुक्रमणिका

पठन-पाठनामध्ये ती संहिता असल्याने मूळ संहिता-संशोधनार्थ या पठनाचा अथर्ववेदी श्रीसूक्ताला आधार घेता आला. येथील पठनात 'यशसेशानो' किंवा दुरुस्तीनुसार छंदानुसारी 'यशामीशानो' असाही पाठ नव्हता. तो होता 'विशामीशानो'–विशामीशानः म्हणजे 'प्रजांचा अधिपति' हा अर्थही चपखलपणे बसल्याने 'विशामीशानो' हाच पाठ अधिकृत म्हणून त्यांनी नवीन संपादित आवृत्तीत घेतला, असे त्यांनी प्रस्तावनेत स्पष्टीकरण दिलेले आहे. (पाहा पृ. १२ अथर्ववेदीया पेप्पलाद संहिता, संपा. प्रा. दुर्गामोहन भट्टाचार्य)

(२) आचार्य योग्घम विरचित नीतिं निर्णीतिनामी कौटिलीय राजसिद्धान्त टीका संयुक्त–आचार्य कौटिल्य-कृत अर्थशास्त्र–अपरनाम–राजसिद्धान्त–संपादक जिन-विजयमुनि–प्रस्तावना : दामोदर धर्मानंद कोसंबि पृ. ३

In general, the North preserves a shorter version without regard to grammatical polish and Paninian rules, while the South inflates and rearranges in the interest of Logic. In particular, the Kashmiri in the North and Malayalam in the South often preserve archaic readings. For smaller works preserved in numerous copies and local versions the South again shows logical rearrangement and rigid attention to syntax; North presents growth by accretion but preserves archaisms.

(3) Shri. M. R. Bodas : Preface to the second edition of Annambhattas Tarkasangraha, ed. with English translation and explanatory notes by Shri Athalye, Bombay, Sanskrit and Prakrit series, 55.

The most important addition to the notes was a liberal translation of the text of the Sangraha, printed in italics at the top of each section, which will be found useful to students. Ambiguities and mistakes left in the hurry of the first edition have now been removed as far as possible and many passages in the notes have been re-written for the purpose. Some Paragraphs had to be renumbered and some sections have been rearranged. The portion of the preface in the first edition dealing with the author has been placed after the introduction and anotation, portion dealing with Mss. collated for the text has been transfered to the end as Appendix C. The index at the end is a new feature added in this edition.

(4) J. F. Fleet, the editor of Buhlers Indian Paleography mentions:

My editorial functions.. have been confined to details of a formal kind : chiefly in the matter of giving more prominence to the titlings of the sections. and the divisions of them: in transferring to a more convenient position, as separated footnotes at the botton of the pages to which they belong, the notes which in the German original stand mossed together at the end of each section : and in marking by figures in square brackets in thick type, the commencement of each page of the German original, as closely as has been found convinient. Following, however, an example set by Prof. Buhler himself in breaking up some of the very long paragraphs of the original, following his lead in another direction also I have endeavoured to present

everywhere the correct spelling ... and I have corrected a few obvious mistakes—

(५) बुद्धघोष कृत समन्तपासादिका नाम विनयट्ठकथा नावाच्या पुस्तकाचे संपादक श्री. बिरबल शर्मा आपल्या प्रस्तावनेत म्हणतात— " We have coordinated this edition in Devanagari with Burmese, Simhalese, Siamese, Roman. We have broken new ground by providing headings and subheadings and adopting our own method of punctuation in order to make the text more intelligible and self contained.

सन्दर्भसाहित्याची नोंद

–(Bibliographical references)

सम्पादित ग्रंथात सन्दर्भ साहित्याची (Bibliographical references) नोंद देण्याची चाल सर्वत्र रूढ आहे. तिची जागा मात्र निश्चित नाही. ही नोंद कुठे करावयाची याचा निर्णय सम्पादकानेच घ्यावयाचा असतो. सध्या रूढ असलेल्या पद्धतीत (१) तळटीपेत (२) प्रकरणाचे शेवटी (३) सन्दर्भ आवश्यक असेल त्याच ठिकाणी (४) पुस्तकाचे शेवटी– असे चार प्रकार आढळतात.

या बाबतीत अधिक तपशीलवार संन्दर्भनोंद (Bibliographical footnotes) द्यावयाची, की पुस्तकाचे शेवटी केवळ आवश्यकतेनुसार वापरलेल्या पुस्तकांची यादी द्यावयाची, की त्याच विषयावर अधिक वाचनासाठी इतर वाचनीय ग्रंथांचा पुरस्कार करावयाचा याबद्दल सारे निर्णय सम्पादकाधीन असतात.

उद्धरणे वा उतारे

– (Extracts and excerpts)

विवेचनाला उपोद्बलक असे उतारे, उद्धरणे ग्रंथामध्ये देण्याची चाल ' ग्रंथ ' ही कल्पना जन्माला आल्यापासून रूढ आहे. माझ्या म्हणण्याला आधार असल्याशिवाय एकही शब्द मी लिहीत नाही ' नामूलं लिख्यते किंचित् नानपेक्षितमुच्यते '– अशी मल्लिनाथाची प्रतिज्ञा सर्व विश्रुत आहे. ' ज्ञानेश्वर भाष्यकाराते वाट पुसतच आपले वाक्पाटव व्यक्त करतात. शंकराचार्य तर आधारभूत श्रुति– स्मृति जिथल्या तेथे ' अवतरणांतून' देतात. आधुनिक कालखण्डात हे उतारे इंग्रजी, जर्मन सारख्या पुढारलेल्या भाषांतील लिखाणांतून शोधून काढून दिले जातात. हे मूल विवेचनांच्या ओघात दिले जातात किंवा त्याच पानाच्या तळटीपेतही दिले जातात. प्रतिपाद्य विषयाच्या विवेचनात ज्यायोगे अधिक सोईस्कर होईल अशा ठिकाणी ही अवतरणे द्यावयाची असतात हे सम्पादकाला ठरवावे लागते.

छायाचित्रे, आराखडे, मुखचित्र, रंगीत चित्रे, हस्तलेख, नकाशे इ.

प्रतिपाद्य विषयाच्या आकलनाला सहजसुलभता येण्यासाठीं ग्रंथांमध्ये वरील उपोद्बलक साहित्य ग्रंथाला जोडून ग्रंथाची उपयुक्तता वाढविण्याचे कौशल्य सर्वस्वी संम्पादकानेच वापरावयाला हवे. डॉ. वे. राघवन् यांनी ' भोजाज् शृंगारप्रकाश ' या ग्रंथाच्या सुरुवातीला धारा नगरींतील वाग्देवता मूर्ति व वाग्देवता मंदिर यांची छायाचित्रे मुद्दाम जोडली आहेत व भोजराजाच्या हस्ताक्षराचा फोटोही छापला आहे.

संस्करणें

आवृत्ति, पुनरावृत्ति, नवी आवृत्ति, सुधारून वाढविलेली आवृत्ति, संक्षिप्त आवृत्ति. शालेय आवृत्ति, स्वस्त आवृत्ति, (Pocket book), संशोधित (चिकित्सक) आवृत्ति (Critical edition), ग्रंथालयांसाठी आवृत्ति (Library edition), खास बांधणीची आवृत्ति (De luxe edition), या सारखी पुस्तकाची संस्करणें आता मराठीतही अधून मधून दिसू लागली आहेत. विशेषतः लोकप्रिय कथा-कादंबरी, नाटकें, कविता यांच्या अशा आवृत्ति काढणे प्रकाशकाला आर्थिक दृष्ट्या हितावह होऊ शकते. या आवृत्तींतून सम्पादनाला पुष्कळच वाव असतो. विद्वान् लोकांचा फायदा ज्या प्रमाणात या कामासाठी करून घ्यावयास हवा तेवढा अजून करून घेतला जात नाही. त्या त्या प्रकारांची लोकप्रियता निर्माण करण्यासाठी खास सम्पादनचातुर्याचा उपयोग करून घेणारे प्रकाशक निश्चितपणे आपली आर्थिक उन्नति करून घेतात.

मुद्रणप्रत (Press copy)

मुद्रणप्रत तयार करणे वा आपल्या ठरविलेल्या आराखड्याप्रमाणे मुद्रणप्रत तयार करून घेण्याची मह-

अनुक्रमणिका

त्याची कामगिरी सम्पादकांनाच उचलावी लागते. मुद्रण-प्रत जितकी व्यवस्थित, सुवाच्य व एकजिनसी तयार झाली असेल तितके मुद्रकांचे, जुळणीसांचे व मुद्रित शोधकाचे काम सोपे जाते. म्हणून मुद्रणप्रत तयार करताना घ्यावयाची काळजी सम्पादकाच्या देखरेखीखाली झाली तर मुद्रणकार्य झटपट होण्याला मदत होते.

हस्तलिखितांची सूची वा कॅटलाग

– (Catalogues of Manuscripts)

विश्वविद्यालयामध्ये असलेल्या हस्तलिखिताच्या सूचि अनेक उपलब्ध आहेत. संशोधन संस्थांमध्ये असलेल्या हस्तलिखितांचेही कॅटलॉग प्रसिद्ध झालेले आहेत. त्या सूचींमधून वर्णनात्मक पद्धत अवलंबलेली असते. यामध्ये खालील उल्लेख असतात :

(१) माध्यम : भूर्जपत्र, ताडपत्र, हातकागद, वस्त्र.
(२) लांबी रुंदी
(३) हस्तलिखिताची पाने
(४) प्रत्येक पानावरील ओळी
(५) ओळींची एकूण संख्या
(६) लिपी
(७) लिपिकाल
(८) रचनारीति : गद्य, पद्य, चम्पू, प्रशस्ति, लेख इ.
(९) लेखन स्वरूप : शुद्ध, अशुद्ध
(१०) सुरुवात
(११) अन्त
(१२) हस्तलिखित स्वरूप : पूर्णापूर्ण, त्रुटित जीर्ण इ.

उदाहरणार्थ,

Substance: Country made paper, size $17\frac{1}{2}\times3$ inches. Folio 1-11 (55-56) Lines 8 on a page. Extent 484 slokas. Bengali character. Appearance old, prose. Generally correct. Complete.

Beginning :– प्रामाण्यम् स्वत एव गृह्यते इति मीमांसकाः ।

Colophons :– अनुमितेर्मानसत्वविचारः समाप्तः ।

Post-colophon :– श्रीश्रीहरिशर्मणः स्वाक्षरमिति ।

A descriptive catalogue of Sanskrit Manuscripts by Calcutta Sanskrit College Research series, XX, p. 4-5.

युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनने विवरणात्मक सूचि पद्धति मान्य केली आहे. वाराणसेय संस्कृत विश्वविद्यालयाने प्रसिद्ध केलेल्या हस्तलिखित सूचीमधून या पद्धतीचा अवलंब केलेला आहे—

१) क्रमसंख्या २) ग्रंथनाम ३) ग्रंथाकारनाम ४) पत्रसंख्या विवरण ५) आकार ६) पंक्ति सख्या ७) अक्षर संख्या ८) लिपि ९) आधार १०) लिपिकाल ११) पूर्णापूर्णता १२) विशेष विवरण.

टीपः—

इ. स. १८०७ ते १९४० च्या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या हस्तलिखित सूचींची कालानुसार यादी डॉ. गोडे यांनी तयार केली असून डॉ. सु. मं. कत्रे यांच्या 'टेक्स्च्युअल क्रिटिसिझम्' या ग्रंथाच्या परिशिष्टात ही सूचि दिलेली आहे. डॉ. राघवन् यांनी संपादन केलेल्या 'न्यू कॅटलॉगस् कॅटलॉगरम्' मध्ये ३९७ हस्तलिखित कॅटलॉगसूचींची अकारानुक्रमे माहिती दिलेली आहे.

श्री. महादेवशास्त्री दिवेकर

ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी लिहिण्यामागची भूमिका कवीची होती का तत्त्वज्ञाची होती, योग्याची होती का भगवद्भक्ताची होती, ब्रह्मवेत्याची होती का केवळ सत्श्रद्धाची होती ? या संबंधाची चर्चा डॉ. वाळिंबे, डॉ. देशमुख, डॉ. तुळपुळे, प्रा. जहागीरदार इत्यादि विद्वानांनी केलेली आढळते. ज्ञानेश्वर हे प्रथम कोण होते हे त्यांच्याच शब्दांवरून जर समजून घेतले तर वरील सर्व विद्वानांच्या मतांचा समन्वय होणार आहे. ज्ञानेश्वरांचे अध्यात्म, योग, भक्ति, कर्म, इत्यादि सर्व क्षेत्रातील हिमालयतुल्य उच्च व श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व ध्यानी घेतले म्हणजे प्रत्येक विद्वान् आपापल्या दृष्टीने त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एकेका पैलूकडे पाहात आहे, असे दिसून येईल. प्रस्तुत लेखात हा समन्वय दाखविण्याचा यत्न आहे. यास्तव प्रथम ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वरकथित त्यांच्या चरित्राचा विचार करू.

ज्ञानेश्वरकथित स्वचरित्र

श्रीसमर्थांचे चरित्र दासबोधामध्ये आहे, हे कै. देवांनी दासबोधाच्या प्रस्तावनेत दाखवून दिले. टिळकांचे कर्मयोग कौशल्य त्यांच्या गीतारहस्यातील काही उताऱ्यावरून दाखविता येईल. ज्ञानेश्वरी अ. ६ श्लोक ४२।४३ वरील ओव्यात त्यानी स्वतःचे चरित्र मांडलेले आहे ते असे—

जे सिद्धान्ताच्या सिंहासनी । राज्य करिती त्रिभुवनी ।
जे कूजती कोकीळवनी । संतोषाच्या ॥ ४५० ॥
जे विवेकद्माचे मुळी । बैसले आहाती नित्यफळी ।
तया योगियांच्या कुळी । जन्म पावे ॥ ४५१ ॥
मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पहाट फुटे ।
सूर्यापुढे प्रगटे । प्रकाश जैसा ॥ ४५२ ॥
तैसी दशेची वाट न पाहाता । वयसेचिया गावा न येता ।
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ॥ ४५३ ॥
तिये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे ।
सकल शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥ ४५४ ॥
तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय ।
तेथ संसरेवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ४५९ ॥

पहिल्या दोन ओव्या वडील विठ्ठलपंतांना उद्देशून आहेत. त्यांची अध्यात्मनिष्ठा व वैराग्य फार प्रखर होते; पुढील चारी ओव्या ' लहानसा देह, वय व दशा यांच्यानिरपेक्ष सर्वज्ञता, पूर्वजन्मीची सिद्ध प्रज्ञा, त्यामुळे सकल शास्त्रावर प्रभुत्व, कोणत्याही विषयात अनिरुद्ध संचार करणारी बुद्धि या वाक्यावरून त्या ओव्या ज्ञानेश्वरांनी स्वतःलाच उद्देशून लिहिल्या आहेत. पुढे अ. १४ श्लो. ११ वरील ओव्यात ते म्हणतात

की सर्व शास्त्रात बुद्धी संचारते —
धराधर काळें । महानदी उचंबळें ।
तैसी बुद्धी पघळें । शास्त्रजाती ॥ २१२ ॥

—शिवाय अ. १६ च्या उपक्रमामध्ये माझ्या वाणीने अनेक कल्प **खरे बोलण्याचे तप** केले. त्याचे फळ म्हणजे **गीताद्वीपाची** प्राप्ती ! असाधारण मी पुण्ये आचरली त्यांनी मला गुरुवर्णनाची स्फूर्ती दिली व ती उतराई झाली. हे त्यांचे स्वतःसंबंधाचे उद्गार पाहिले म्हणजे ज्ञानेश्वर ही एक अलौकिक महान् विभूती होती, त्याबद्दल संशय राहात नाही. स्वतःचे हिमालयाइतके थोर व्यक्तिमत्त्व त्यात निवृत्तिनाथ गुरूंची कृपा मग काय ? त्यांनी विनयाने अनेक ठिकाणी म्हटले आहे की ' मी पढे ना वाची, शिकलो नाही. वाचन केले नाही. सहज बडबडू लागलो. रिकामे तोंडासह तो गीता ऐसें गोड आतुडलें ॥ अ. १५।२१ एवढे हे भाग्य मलाच प्राप्त झाले. कारण मी गुरूंचे एकुलते एक तान्हे अपत्य. त्यामुळे सर्वकृपा मजवरच झाली. माझ्या मस्तकावर त्यांनी वरदहस्त ठेवला. नव्हे ते बीजच लावले त्यामुळे माझ्या उक्ती सर्वांच्या हृदयाला पोंचतात !

ज्ञानविज्ञानसंपन्न संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वर हे केवळ फिलॉसफर म्हणजे तत्त्वज्ञ नव्हते तर ते तत्त्वस्वरूप, ज्ञानविज्ञानसंपन्न संतश्रेष्ठ होते गीतेमध्ये ज्ञान व विज्ञान हे शब्द अ. ७।९।१८ अशा तीन ठिकाणी आले आहेत. तेथे ज्ञानेश्वरांचे

अर्थ पाहावेत. " तैसी जाणीव जेथ न रिगे । विचार मागुता पाउली निघे ॥ तर्क आथणी नेघे । अंगीं जयाच्या ॥ अ. ७।५, " अर्जुना हे ज्ञान होय.

तैसे जे जाणितलेयासाठी । संसार संसाराचिये गाठी । लावूनि बैसवी पाटीं । मोक्षश्रियेच्या ॥ अ. ९।४६
तरी सत्वशुद्धीचिये ळे । शास्त्रे कां ध्यानबळे ॥
ईश्वरतत्त्वीचि मिळे । निष्टंकबुद्धि ॥ अ. १८।८४७॥

-जेथें मन-बुद्धि-वाणीचा प्रवेश नाही, जे जाणल्याने मोक्षलक्ष्मीच्या स्थानावर बसता येते. निदिध्यासादी अभ्यासाने ईश्वरतत्त्वातच बुद्धी मिळते ते ज्ञान विज्ञान होय. **ज्ञान हे परोक्ष व विज्ञान-अपरोक्ष असे आचार्यांचे अर्थ आहेत** या त्यांच्या व्याख्यानावरून ते ज्ञान-विज्ञानसंपन्न संतश्रेष्ठ होते.

ज्ञानेश्वर तत्त्वज्ञ (फिलॉसफर) नव्हते तर ते संत होते

सेंट व फिलॉसफर असा इंग्रजीतही भेद आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा विशेष हा आहे की ते नुसते बुद्धीने जाणवयाचे नसून तद्रूप होण्याकरिताच ते तत्त्वज्ञान आहे. (मोक्षार्थमिदं शास्त्रम्) ते स्वानुभवगम्य आहे. दुःखाची अत्यंत निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती हे मोक्षस्वरूप आहे. सत् चित् आनंद स्वरूप असे हे अद्वैतात्मत्त्व आहे, ते एकमेवाद्वितीय आहे. त्याचे पर्यवसान स्वानुभवामध्ये होते. हा अनुभव ज्यानी घेतला ते ऋषी, आचार्य व संत होते. अद्वैतात्मतत्त्वाचे ज्याना स्वानुभवाने आकलन झाले नाही असा स्पायनोझा त्या तत्त्वाला Universal substance सर्वव्यापक द्रव्य म्हणतो; तर कँट त्याला Unconditioned अपरिच्छिन्न तत्त्व म्हणतो ! रोलिंग व फिक्टी त्याला Absolute being अविकृत आत्मा म्हणतो; हेगेल त्याला Universal and pure being नित्य शुद्ध, आत्मा म्हणतो. शोपेन हॉर त्याला Universal will व्यापक इच्छा म्हणतो तर हार्टमन त्याला Unconscious अव्याकृत तत्व समजतो. अखेरीस हॅर्बर्ट् स्पेन्सर त्याला Unknown and Unknowable अज्ञात व अज्ञेय असे ठरवितो. भारतातही द्वैती, शुद्धाद्वैती, विशिष्टाद्वैती आचार्य होऊन गेले. केवल अद्वैताचा श्रुतिसिद्धांत श्रीमत् गौडपादानी शास्त्रीय परिभाषेमध्ये प्रथम मांडला.

अद्वैतं परमार्थोहि द्वैतं तत् भेद उच्यते ॥
-गौ. पा. का. ३।१८

-अद्वैताच्या पोटात अनेक द्वैती संप्रदाय आहेत असे ते म्हणतात. त्यांचे प्रशिष्य श्रीशंकराचार्य ह्यांनी अद्वैतशास्त्र सुप्रतिष्ठित केले. त्यानाच वाट विचारीत जाणारे ज्ञानेश्वर- " अयमात्माब्रह्म " (मांडुक्य,) यत् साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म । अयमात्मा-सर्वानुभूः ॥ (बृ. आ.) -आत्मसाक्षात्कारी होते. ते म्हणतात- मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे । आणि हृदयीं स्वयंभाच असे । प्रत्यक्ष फोवो लागे तैसे । आपैसयाची ॥ कानावचनाचिये भेटी । सरिसोचि पैं किरीटी । ज्ञा. अ, ९।४९ वस्तु होऊनि उठी । कवणी एकजो ॥

-तत्त्वमसि हे महावाक्य अधिकारी गुरुमुखाने उदय पावले की हृदयस्थ स्वयंभु आत्म्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो. शिष्याचा कान व गुरूचे महावाक्यवचन यांची भेट होताच शिष्य ब्रह्मरूपच होतो. ज्ञानेश्वर हे याच कोटीतील होते, **ते कवी होते, श्रेष्ठ योगी होते, महान् भगवद्भक्त होते. गुरुभक्त** श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ होते आणि **सर्वावर कळस म्हणजे** ते अपरोक्ष **आत्मसाक्षात्कारी संतश्रेष्ठ होते.**

योगी, भक्त, सकलशास्त्रज्ञ ज्ञानदेव

ज्ञानदेव हे नवनाथ परंपरेतील होते. योग, हठयोग, कुंडलिनी जागृती हे त्या पंथाचे वैशिष्ट्य. ज्ञानेश्वर महान् योगी होते, हे ज्ञानेश्वरी अ. ६ मध्ये पूर्णपणे दिसते व त्याचाच काही अवशेष अ. ९, १२, १८ मध्येही प्रसंगाने आढळतो.

कुंडलिनी योगाला ते 'पंथराजु' म्हणतात.

ज्ञानेश्वर हे परम ईश्वरभक्त होते याचे प्रत्यंतर संपूर्ण ज्ञानेश्वरीत येते. विशेषतः अ. ८,९,११,१२,१४ व अध्याय १८ तील विस्तृत व्याख्यानावरून खात्री पटते. सगुणभक्ती द्वैतभक्ती व तिचे पर्यवसान अद्वैत-भक्ती हे ज्ञानेश्वरांनीच अत्यंत प्रेमळ, रसाळ, व प्रभावीपणे मांडलेले आहे.

ज्ञानेश्वर निष्काम कर्मयोगी होते, ज्ञानेश्वरीमध्ये सुमारे १५०।१७५ ओव्या निष्काम कर्मयोगपर आहेत. लोकमान्यांनी जर ज्ञानेश्वरीचे चांगले अध्ययन केले असते तर ज्ञानेश्वर व निष्कामकर्मयोग असे एक प्रकरणच ते लिहिते. ' योगामाजि योगु । धुरेचा हा ' असे अ. १२ मध्ये ते म्हणतात. सांख्यशास्त्राविषयी

ज्ञानेश्वरांनी अ. १३।९५८, ९५९ ॥ अ. १८ ओ. ५२० ते ५२३ मध्ये गौरवोद्गार काढलेले आहेत. त्या शास्त्रात निर्दोष प्रकृतिपुरुषविवेक आहे. ते शास्त्र विचारक्षीर समुद्र, स्वबोधकुमुदिनीचंद्र डोळस शास्त्र आहे, असे ते म्हणतात.

अद्वैत वेदान्त तर त्याच्या हातांतील महारस मोदकच आहे.

कवी ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वर हे प्रतिभा संपन्न, दैवी स्फूर्ति संपन्न महान् कवी होते, हे डॉ. वाळिंबे यानी सिद्ध केलेच आहे. पण काव्यसुद्धा केवळ यश, अर्थ, अकल्याण नाशार्थ असते, असे नव्हे तर 'सद्यःपरनिर्वृत्तंय, असे त्यांचे लक्षण काव्यशास्त्रज्ञ करितात. इह व परत्र परमसुखार्थ म्हणजे मोक्षार्थ ज्ञानेश्वरांनी काव्य निर्माण केलेले आहे. केवळ काव्यानंद, लौकिकानंद, वाचण्यापुरता आनंद हा या काव्याचा हेतू नाही तर श्रृंगाराचे माथा पाय ठेवणारा शांत रस मराठीमध्ये आणून आत्मज्ञानाचा सुकाळ करावा हाच त्या काव्याचा हेतू आहे.

व्यासमहर्षी व शंकराचार्यांच्या मार्गाने जाणारे ज्ञानेश्वर अद्वैत वेदान्त, अद्वैतभक्ति, याशिवाय सांगणार काय ? ज्ञानेश्वरीमध्ये पूर्वमीमांसा, न्याय, वैशेषिक याशिवाय देहात्मवादी चार्वाक, शून्यवादी बौद्धादिकांचाही परामर्श व उल्लेख आहे. साहित्य व अलंकारांनी ग्रंथ नटलेला आहे. यावरून 'सकल शास्त्रे स्वयंभे निघती मुखे ॥' हे त्याचे उद्गार स्वानुभवच दर्शवितात. एवंच ज्ञानेश्वर हे श्रेष्ठ कवी, योगातील श्रेष्ठ योगी, भक्तांतील भक्तोत्तम, ज्ञान्यातील ब्रह्मज्ञानी, आणि पंडितामध्ये विनयसंपन्न पंडितही होते. ते नव्हते काय ? असाच प्रश्न येतो. हा त्यांचा अधिकार ध्यानी घेऊनच ज्ञानेश्वरी लिहिण्यामागची त्यांची भूमिका तपासून पाहिली पाहिजे. प्रथम गुरुगौरव व संतसभा यांचा विचार करतो.

श्रीगुरु श्रीनिवृत्तिनाथ व संतसभा-

श्रीज्ञानेश्वरांनी नेवासे येथे जेव्हा ज्ञानेश्वरी सांगितली तेव्हा त्याच्यापुढे सद्गुरु निवृत्तिनाथ हे जसे होते त्याप्रमाणे रसिक, अधिकारी, विरक्त, संतसज्जनही होते. म्हणून त्यानी ज्ञानेश्वरीमध्ये ठिकठिकाणी गुरुगौरव स्वतंत्र करून संतसज्जनांची प्रार्थनाही स्वातंत्र्याने केली आहे. निवृत्तिनाथ गुरु व संतसज्जन हे दोन्ही ते एक मानीत नाहीत. उदा. अध्याय पहिला ओव्या २२ ते २७ पर्यंत गुरूंना आदराने नमन केले असून पुढे : " जे अपेक्षिजे विरक्ती । सदा अनुभविजे संती । सोहंभावे पारंगती । रमिजे येथ ॥५३॥
अहो अर्जुनाचिया पांती । जे परिसणेया योग्य होती । तिही कृपा करुनि संती । अवधान द्यावे ॥६२॥
–असेच अ. ६ मध्ये आहे.
ज्ञानदेव म्हणे मी चाडे । सद्गुरूनी केले कोडे ।
माथा हात ठेविला ते फुडे । बीजचि वाइले ॥४९२॥
म्हणोनि येणे मुखे जे जे निगे ।
ते ते संताच्या हृदयी साचेचि लागे ।
हे असो सांगो श्रीरंगे ।
बोलिले जे ॥ ४९३ ॥
– अध्याय तेराच्या उपसंहारात ते म्हणतात–
हा ठावोवरी माते । पुरतया सारस्वते । केले असे श्रीमंते । श्री गुरुराये ॥ ११६६ ॥ तेणे जी कृपासावाये । मी बोले तेतुले सामाये । आणि तुमचिया सभे लाहे । गीता म्हणते ॥ ११६७ ॥ वरि तुम्हा संतांचे पाय । आजि मी लाधलो आहे ॥११६८॥ अध्याय १५ चा उपक्रम पाहा – तैसे श्री निवृत्तिराजे । अज्ञानपण हे माझे । आणिले वोजे ॥ ज्ञानाचिया ॥ २६ ॥ आता तेणेचि पसाये । तुम्हा संताचे मी पाये ॥ वोळगेन अभिप्राये । श्री गीतेचेनि ॥२८॥ अ. १६ चा उपसंहार– संजये व्यासाचिया निरोपा । जोवेळु फेडिला तया नृपा । तैसा मीही निवृत्तिकृपा । सांगेन तुम्हा ॥ ॥ ४७१ ॥ तुम्ही संत माझिया कडा । दिठीचा कराल बहुडा ॥ तरी तुम्हा माने येवढा । होईन मी ॥४७२॥ आता अ. १८ च्या उपसंहारातील स्पष्ट प्रभावी ओव्या पहा : आणि तुम्हा संताचिये सभे । जे उणिवेसी ठाके उभे ॥ ते पूर्ण नोहे तै लोभे । तुम्हासीचि कोपे ॥ १७७० ॥ म्हणौनि भाग्ययोगे बहुवे । तुम्हां संतांचे मी पाये ॥ पातलो आता के आहे । उणे जगी ॥ १७७३ ॥ अहो जी माझेनि स्वामी । मज संत जोडूनि तुम्ही । दीधलेती तेणे सर्वकामी । परिपूर्ण झालो ॥ १७७४ ॥ थोडक्यात 'अथपासून इति पर्यंत' ज्ञानेश्वरांनी श्रीगुरु व संत याचे भिन्नत्वाने वर्णन केले आहे. अहो **श्रीगुरुमहाराज, तुम्हीच मला**

या संतपदाची जोड करून दिली. त्यामुळे माझे सर्व महोरथ परिपूर्ण झाले.

याशिवाय केवळ संतांची प्रार्थनाही ज्ञानेश्वर करितात. "तेवीं तुम्हां संताचा पदियावो । कैसेनि तरी आम्हावरि हो । या बहुवा आळुकिया जी आहो । सलगी करित ॥ अ ९।७, ज्ञानदेव म्हणे तुम्ही । संत वोळगावेंति आम्ही । हे पढवितो जी स्वामी । श्री निवृत्तिदेवीं ॥ अ. १२।२४३ महाराज तुम्हा संत सज्जनांची सेवा करावी हेच आम्हांला श्रीगुरुंनी शिकविले आहे. त्यागुरुकृपेनेच मी तुम्हां संतांची चरणसेवा गीतेचा अभिप्राय निवेदन करून करणार आहे. काही ठिकाणी ज्ञानेश्वर संतस्तवनात इतके रमतात की गुरूंना " आतां हे संतसावन पुरे कर, गीतार्थाचा दिवा उजळ ' असे सांगावे लागले (अ. ५ ओ. १४१।४२)

भावार्थदीपिकेचा उद्देश

स्वतःचे पूर्व सुकृत व पूर्ण अभ्यास, आणि निवृत्तिनाथांची कृपा यामुळे जे त्याना गीतेतील गुह्यातील गुह्य, उत्तमातील उत्तम, ज्ञानविज्ञानयुक्त अद्वयानंद वैभव प्राप्त झाले, ते संतसज्जनापुढे मराठीमध्ये मांडून याद्वारे त्यांची सेवा घडावी व अमृताते पैजा जिंके अशा मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मविद्येचे अद्वयानंद वैभव वर्णन करून सर्व जगालाच नव्हे तर विश्वालाही आनंदाच्या आवारात नेऊन सोडावे, या उद्देशाने भावार्थदीपिका ज्ञानेश्वरांनी लिहिली. गीतेतील उपदेश, हितगुज, प्रमेये, सिद्धान्त हे प्रभावीपणे पटविण्याकरिता त्यानी षट्शास्त्रे, साहित्य, काव्य, योग, भक्ति, कर्म इत्यादि सर्व साधनांचा यथायोग्य उपयोग केला. मूळगीतेमध्ये जे जे विषय आहेत त्यांचा भावार्थ त्यानी सांगितला.

ज्ञानेश्वरीमध्ये कसलेही खंडण मंडण नाही, तर्कशुद्ध विवेचन नाही, उपदेश नाही, प्रचार नाही. फक्त हितगुज सांगितले आहे, या मताशी आम्ही मुळीच सहमत नाही. गीतेतील विषयानुरूप तर्कशुद्ध विवेचन, खंडण मंडण, उपदेश, आचार व हितगुजही आहे हे आता वाचकापुढे ज्ञानेश्वरीच्या आधारेच ठेवतो.

कुठेही तर्कशुद्ध मांडणी केली नाही

हे विधान साहसाचे आहे. पंचावयवयुक्त अनुमान मांडून निगमन केलेले नसले तरी ज्ञानेश्वरांनी पुष्कळ ठिकाणी काव्यमय भाषेत पण तर्कशुद्धच मांडणी केलेली आहे. त्यापैकी काही स्थळे देतो.

अद्वैतवेदान्त शास्त्रामध्ये मायाशक्ति ही स्वाश्रया व स्वविषया मानली आहे. या शास्त्रीय शब्दांचे स्पष्टीकरण ज्ञानेश्वर अगदी चपखल दृष्टान्तांनी तर्कशुद्ध पद्धतीने करितात. गीता अ. ७ श्लो. १३ वरील ओव्या.

परि उदकीं झाली बाबुळी । ते उदकाते जैसी झाकोळी ।
कां वायाचि आभाळी । आकाश लोपे ॥ ६० ॥
हे असो डोळयांचे । डोळाचि पडळ रचे ॥
तेणे देखणेंपण डोळयाचे । न गिळिजे कायी ॥ ६२ ॥
तैसी हे माझीच बिंबली । त्रिगुणात्मक साउली ।
कीं मजचि आड वोडविली । जवनिका तैसी ॥ ६३ ॥

–चांगल्या पंडितालाही एकदम स्वाश्रया व स्वविषया या शास्त्रीय पारिभाषिक शब्दांचा अर्थ पंडितांना मराठीत सांगता येत नाही. तो ज्ञानेश्वरांनी उदक व शेवाळे, आकाश व आभाळ, डोळा व मोतिबिंदु या दृष्टान्तांनी सांगितला. पाण्याच्याच आश्रयाने शेवाळ असते. म्हणून स्वाश्रय व ते त्याला झाकते म्हणून ते स्वविषय आहे.

स्वविषया म्हणजे आश्रयाला विषय करिते म्हणजे झाकते. गीता अ. १४ श्लो. ३ महत्ब्रह्मावरील व्याख्यान –

हे व्याख्यान ब्र. सू. १।४।३ तदधीनत्वात् अर्थवत्॥ या सूत्रावरील भाष्यानुसार तर्कशुद्ध व काव्यमय दृष्टांतानी केले आहे. या महत्ब्रह्मालाच ही नावे–अव्यक्त–वादमती । अव्यक्त ऐसी वदंती । सांख्यांचिया प्रतीती प्रकृति हेंचि ॥६९॥ वेदांती इयेते माया । ऐसे म्हणिजे प्राज्ञराया । असो किती बोलो वाया । अज्ञान हें ॥७०॥ स्वतःचा स्वतःला विसर हेच अज्ञानाचे स्वरूप : आणीकहि एक असे । जे विचारावेळे न दिसे । वाती पाहाता जैसे । आंधारे का ॥ ७२ ॥ पुढे स्थाणु पुरुषाच्या दृष्टान्ताने त्यानी अनिर्वचनीयता प्रतिपादलेली आहे.

अ. १८ श्लो. ५५ भक्तीचे स्वरूप–

ज्ञानी इयेते स्वसंविति । शैवे म्हणती शक्ति ।
आम्ही परमभक्ति । आपुली म्हणो ॥ ११३३ ॥

– वरील श्लोकावरील सुदीर्घ व्याख्यानाचा उपसंहार

वेदांतशास्त्र व तर्कशास्त्र दृष्ट्या काव्यमय भाषेत अभावीपणे मांडला आहे तो असा : भगवान् म्हणतात, पृथ्वीच्या पोटात निधान, गाईच्या कासेत दूध जसे असते तसा मी स्वतः सिद्ध आहे पण उपायांनी – साधनांनी साध्य होतो. ती साधने करून अविद्या निवृत्ति केली की, आत्मा स्वेनरूपेण अभिनिष्पद्यते,

वारा आभाळचि फेडी । वांचूनि सूर्याते न घडी ।
कां हात बाबुळी धाडी । तोय न करी ॥ १२३१ ॥
तैसा आत्मदर्शनी आडळु । असे अविद्येचा जो मळू ।
तो शास्त्र नाशीं येरू निर्मळू । मी आकाशे स्वये ॥
॥ १२३२ ॥
म्हणोनि आघवीच शास्त्रे । अविद्या विनाशाची पात्रें ।
वाचोनी न होती स्वतंत्रे । आत्मबोधी ॥ १२३३ ॥

ही तर्कशुद्ध मांडणी जणु ब्रह्मसूत्रभाष्यच डोळ्यापुढे ठेवून समर्पक दृष्टान्तांनी केली आहे "तत्तुसमन्वयात्" या चौथ्या सूत्रावरील भाष्यामध्ये शास्त्र काय करिते या प्रश्नाला "मोक्ष–प्रतिबंध–निवृत्तिमात्रमेव आत्मज्ञानस्य फलं दर्शयन्ति" तसेच पुढे अविद्याकल्पितभेदनिवृत्तिपरत्वात् शास्त्रस्य ... अत: अविद्या कल्पितसंसारत्व निवर्तनेन ... इत्यादीं जे उत्तर दिले आहे तेच ज्ञानेश्वरांनी वरील ओव्यात स्पष्ट केलेले आहे. शास्त्र गुरु श्रवणादि साधने ही केवळ अविद्या प्रतिबंध दूर करण्याकरिताच आहे. मोक्ष सिद्धच आहे, तो उत्पन्न करावयाचा नसतो. यापुढच्या ओव्यांमध्ये ते म्हणतात— अर्जुनाला हा विषय समजावा म्हणून त्याच्या प्रश्नाप्रमाणे जरी अनेक विषय आले असले तरी गीतेचा उपक्रम व उपसंहार हा असा आहे "सात शतें श्लोक । श्लोक अध्यायां अठरांचे लेख । परी देव बोलिले एक । जे दुजे नाही ॥ ५८ अ. १८ ॥ एथ अविद्यानाश हे स्थळ । तेणे मोक्षोपादान हे फळ । या दोही केवळ । साधन ज्ञान ॥ अ. १८ । १२४३ ॥ हाच विषय ग्रंथामध्ये नानाप्रकारे स्पष्ट केला आहे व तोच येथे वरील दोन शब्दात मांडला आहे अविद्यानाशपूर्वक मोक्षसंपादन हे याचे प्रयोजन आहे.

मोक्षाची तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध मांडणी

अनादी अनिर्वचनीय, भावरूप जी माया तिचे स्वाश्रय व स्वविषय रूप, तिचीच माया अविद्या, अव्यक्त, प्रकृति, व अज्ञान ही नावे व तिच्या निवृत्तीने मोक्ष यांची मांडणी आपण पाहिली. आता मुख्य प्रयोजन जे मोक्ष त्याची तर्कशुद्ध मांडणी पाहा– गीता अ. ५ श्लो. २३ वरील ओव्याः पक्षी जसा वेगळेपणाने फळाचा उपभोग घेतो, तसे हे आत्मसुख नाही तर तेथे भोक्तेपणही विसरावे लागते. भोक्ता, भोग्य व भोग हा त्रिपुटीही तेथे नसते.

भोगी अवस्था एक उठी । तेथ अहंकाराचा अंचळ लोटी ।
मग सुखेसि घे आटी । गाढेपणें ॥ १३२ ॥
तिये आलिंगनमेळी । होय आपेआप कवळी ॥
तेथ जळ जैसे जळीं । वेगळें न दिसे ॥ १३३ ॥
कां आकाशी वायु हारपे । तेथ दोन्ही हे भाष लोपे ।
मग सुखचि उरे स्वरूपें । सुरती तिये ॥ १३४ ॥
तेथ द्वैताची भाष जाय । मग म्हणो जरि एकचि होय
तरी तेथ साक्षी कवणु आहे । जाणते जे ॥ १३५ ॥

भावार्थ — आत्मानंद भोगत असता अशी स्थिती येते की ती अहंकाराचा पडदा दूर करिते व जीव परमात्म ऐक्य साधते. त्या आलिंगनामुळे पाणी पाण्याशी जसे एकरूप होते तसे जीव व परमात्मा एक होतात. किंवा आकाशात वायू लोपून गेला की आकाश व वायू ही भाषाच उरत नाही. त्याप्रमाणे जीव परमात्म संगम होताच केवळ सुखस्वरूपच तो होतो. मग तेथे द्वैताची भाषाच नाही पण एकत्वच उरते म्हणावे, तर त्याला जाणणारा साक्षी कोण आहे ?

साक्षात्काराच्या प्रक्रियेमध्ये वृत्तिव्याप्ती व फलप्राप्ती अशा पारिभाषिक संज्ञा आहेत. त्या सर्व विषयाचा अर्क तर्कशुद्धतेने अ. ६ श्लो. २०।२१ वरील ओव्यामध्ये मांडलेला आहे.

परतोनि पाठमोरे ठाके। आणि आपणियाते आपण देखे।
देखत खेवो वोळखे । म्हणे तत्व हे मी ॥ ३६६ ॥
तिये वोळखीचि सरिसे । सुखाचिया साम्राज्यी बैसे ।
मग आपणपां समरसे । विरोनि जाय ॥ ३६७ ॥
जयापरते आणीक नाही । जयाते इंद्रिये नेणती काही ।
ते आपणचि आपुल्या ठायी । होऊन ठाके ॥ ३६८ ॥

बुद्धिवृत्ति अंतर्मुख होऊन आत्म्यावरील आवरण दूर करिते. नंतर त्या निरावरण आत्म्याचा साधकाला साक्षात्कार होतो त्या सरशी सुखाच्या समुद्रात साधक संपूर्ण निमग्न होतो. हे सुख इंद्रियग्राह्य नाही. अतीन्द्रिय आहे

व ते तो स्वतःच स्वतःच्या ठिकाणी सुखसंपन्न होऊन भोगतो. हे अवघ्या ३ ओव्यामध्ये साक्षात्काररहस्य तर्कशुद्ध पद्धतीने वेदान्तप्रक्रियेला धरून बरोबर मांडलेले आहे. पुढे अ. १७ श्लो. १६ वरील ओव्यामध्ये मनःप्रसाद, याचे विवेचन करिताना साक्षात्कारोत्तर मन उन्मन होते. मीठ जसे जीवनाला मिळताच तद्रूप होते त्याप्रमाणे मग ते मन बहिर्मुख होत नाही. विषयगामी होत नाही. अशा प्रसन्न मनामध्ये भावसंशुद्धि सहजच असते. व साक्षात्कार होतो इत्यादी म्हटले आहे.

तर्कशुद्ध विवेचनाच्या सुटसुटीत व्याख्या व स्थळे आपापल्या योग्यतेनुरूप स्वकर्तव्य निष्कामतेने करणे हा एक सामाजिक यज्ञच होय. अ. १६ ओ. ९४ ते १०१

जन्माला येतानाच फक्त स्त्रीजननेंद्रियाला स्पर्श, त्यानंतर आजन्म सोवळे राहाणे हे ब्रह्मचर्य अ. १७।२११.

अभ्यासाला काही दुष्कर नाही म्हणून अभ्यासच करावा. अ. ८ (७९ ते ८०) अध्याय १२ ओ. १०४ ते ११३.

जीवस्वरूपाविषयी वेदांतशास्त्राच्या तीन प्रक्रिया आहेत. अ. १४ ओ. ७७ ते ८० येथे अवच्छेदवाद, मांडला आहे. तर पुढे अ. १८ ओ. ३२१ ते ३२६ येथे प्रतिबिंब व आभासवाद आहे. अ. ९ श्लो. ४ वरील ओव्यामध्ये जगत् प्रक्रियेपैकी सांख्यांचा परिणामवाद सांगितला आहे. तर श्लोक ५ वरील ओव्या जणु गौडपादांची कारिकाच "कल्पयत्यात्मनाऽऽत्मानं आत्मा देवः– स्वमायया (गौ. का.२।१२) डोळ्यापुढे ठेवून अजातवाद मांडला आहे तर श्लो. १० वरील ओव्यामध्ये मार्मिक ओव्यांनी विवर्तवाद सांगितला आहेः

म्हणे ज्ञानेश्वरांनी कसलेही खंडण मंडण केले नाही

हेही विधान धाष्टर्याचे आहे. गीतेचा भावार्थ सांगताना श्री ज्ञानेश्वरानी अवश्य तेवढे पण हळुवारपणे परमताचे खंडण करून स्वमताचे मंडण केलेले आहे. उदा. अ. १३ अहिंसेवरील व्याख्यान पहा, पूर्व मीमांसक कर्मठ हिंसाच करून अहिंसा निपजवितात. अनावृष्टिमुळे लोक गांजले जातात, त्यावेळी हे पर्जन्येष्टी करितात पण त्या 'इष्टीचिया बुडी । पशुहिंसा रोकडी ॥' असते मग अहिंसा कशी घडणार ? हिंसा पेरून अहिंसा उगवेल काय ? पण अर्जुना, 'नचल बापा धिंवसा । याज्ञिकांचा ॥ २२४ ॥ आता आयुर्वेद चिकित्सकही काय करितात पाहा. एक जीव वाचविण्याकरिता दुसऱ्याःजीवांचा ते घात करतात ! एके गर्भिणी उकडविली पुटामाजी ॥ २२८ ॥ आणि जंगमाही हात । लावूनि काढिले पित्त । मग राखिले शिणत । आणी कजीव ॥ २३० ॥ काही गरोदर प्राणी पाण्यात उकळतात. काही सजीव प्राण्यांना चिरून त्याच्या शरीरातील पित्तादि पदार्थांची औषधे करितात. हे त्यांचे करणे म्हणजे दुकान मोडून अन्नछत्र घालणे आणि बैल विकून गोठा बांधण्यासारखे आहे. आता 'अहिंसा परमोधर्मः' मानणारे पाणी गाळून पितात पण त्या गाळण्याच्या त्रासाने काही प्राणी मरतात. हिंसा होईल म्हणून कोणी धान्यच शिजवीत नाहीत, व खात नाहीत. त्यामुळे प्राणांची क्षीणता वाढते. तात्पर्य, हिंसा म्हणजेच अहिंसा असे समजणारे हे कर्मकांडी आहेत. ॥ २३७ ॥ आम्ही अहिंसा सांगावयास प्रवृत्त झालो तो लोकातील ही मते पुढे आली, म्हणून व स्वमतपुष्ट्यर्थ अन्यमत परामर्श करावा लागतोच. शेवटी ज्ञानेश्वर म्हणतात–

आणि स्वमताचिया निर्धारा।
लागोनिया धनुर्धरा ।
प्राप्तामतांतरा । निर्वचु कीजे ॥ २४१ ॥

– ही ओवी म्हणजे शांकरभाष्यांतील पंक्तीचाच अनुवाद होय. "पक्षांतरप्रतिपादनमात्रप्रदर्शनं प्रज्ञा–विकासनायेति द्रष्टव्यम् ॥ ब्र. सू. भा. ४।३।१४ बुद्धिविकासाकरिता फक्त दुसरा एक भासमान पक्ष दर्शविला आहे. अन्यमतांचे निर्वचन बुद्धिविकासाकरिता असते.

श्रोत्यांना स्पष्ट सूचना.

निवृत्तिनाथ प्रमुख श्रोत्यापुढे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरी सांगत असता अनधिकारी श्रोत्यांनी येऊन विक्षेप केला असावा म्हणून त्या श्रोयांना ज्ञानेश्वर स्पष्टच पण प्रेमाने सूचना देतात.

अहो अर्जुनाचियां पाति । जे परिसणेया योग्य होती । तिया कृपाकरूनि संती । अवधान द्यावे ॥

अ. ११६२ ॥ हे असो तया बोलांची ताटे भलीं ।
परि कैवल्यरसे ओगरिली । ही प्रतिपत्ति मिया
केली । निष्कामासी ॥ अ. ६।२२
ऐसें हळुवारपण येईल । तरीच हें उपेगा जाईल ।
येरव्ही आघवी गोष्टी होईल । मुकया बहिरियांची ॥
अ. ६।२६

जिही आत्मबोधाचिया आवडी ।
केली स्वर्गसंसाराची कुरोंडी ।
तेवाचूनि एथीचो गोडी । नेणती आणिक ॥ ६।२८
तैसें अध्यात्मशास्त्री इये । अंतरंगची अधिकारियें ॥
अ. १८ ओ. १७४९

–थोडक्यात साधनचतुष्टयसंपन्न अधिकाऱ्यांचाच हा विषय आहे, त्यानीच श्रवणास बसावे.

राक्षसी, आसुरी वृत्तींचे प्रदर्शन व खंडण

गीतेमध्ये श्रद्धावान् व ज्ञान विमूढ (अ. ३) दुष्कृती व सुकृती (अ. ७) राक्षसी मोघज्ञानी वा महात्मे (अ. ९) ज्ञान व अज्ञान (अ. १३) सत्वगुण व राजसतामसवृत्ती (अ. १४) दैवी व आसुरी-वृत्ती (अ. १६) पुढे १७ व १८ अध्यायामध्ये सात्त्विक श्रद्धा, आहार, तप, कर्मकर्ता, धैर्य, सुख इत्यादी-बरोबर या विरुद्ध असणाऱ्या रज, तम, श्रद्धा, आहार, तपादींचे विवेचन हे ज्ञानेश्वरांनी अगदी प्रभावी केले आहे. ते वाचू लागले की सात्विकांचे समर्थन स्वीकारा करिता व राजस–तामसाचे खंडण त्यागाकरताच त्यांनी केलेले आहे. जडवाद, देहात्मवाद, वित्त, स्त्री, देवधर्म याचे अगदी उघडेनागडे स्वरूप त्यांनी दाखविले आहे. त्यापुढे आजचा जडवादीसुद्धा लाजेने फिका पडेल–

स्त्री— ग्रामसिंहाप्रमाणे स्त्रीविषयी विचारच नाही. कामक्रीडेचा व्यसनी, स्त्रीजातीसंबंधी फक्त त्वचेंद्रिय जाणणारा, गाणे, नाचणे, पाहणे, सर्व स्त्रीमय समजणारा, माकडाप्रमाणे तिच्यापुढे नाचणारा इत्यादी वर्णन अध्याय १३ मध्ये आहे.

परद्रव्य– जग हे ' बळी तो कान पिळी ' असेच आहे. मोठे मासे लहानांना खातात म्हणून काही त्यांचे निसंतान होत नाही. संपन्नाचे प्राण घेतल्याने पाप न लागता द्रव्यलाभ होतो हे पुण्य नव्हे काय ? चोरीच्या ढंग्याने मिळणारी वस्तु काही विष होत नाही. जगात कामावाचून काही नाही. दुबळे लोक उगाच हाती आलेले भोग सोडून देतात. असले विचार ज्ञानेश्वरी अ. १६ त आहेत. अ. १८ श्लो. २२वरील तामस-ज्ञानाचा प्रकार पहा. विहितनिषिद्ध, तीर्थातीर्थ, खाद्या-खाद्य, वर्ज्यावर्ज्य कसलाच विचार नाही. जणु हे विश्व भोग्यच समजतो. देहखंड हा आत्मा व ईश्वर म्हणजे पाषाण, प्रतिमा, देह मेल्यावर भोगण्यास उरतो कोण, गांवातले देव म्हणजे देवळेश्वर जर नियंते असतील तर देशातील डोंगर स्वस्थ का बसतात ? असे हे ज्ञान, देवालाही आव्हान करिते. तामसकर्ता श्लो. २८ दुसऱ्याचा घात करणारी कृत्ये करणारा. मान्यपणामध्ये ईश्वराला तुच्छ समजणारा, दुसऱ्याच्या गुणांचा मत्सरी, दुर्व्यवहारात उत्साही, मूर्तिमंत पापाचा डोंगर किंवा उकिरड्याप्रमाणे सर्व दोषांचे स्थान, न करावे ते करणार, न चिंतावे ते चिंतणारा, न जावे तेथे जाणारा, नको तो संग करणारा, नायकावे, न बोलावे, न खावे ते सर्व करणारा तामस कर्ता असतो.

असे हे सर्व प्रदर्शन केल्यावर ज्ञानेश्वर भगवत्-मुखाने म्हणतात– विषयलोलुपांना माझा बोध रुचणार नाही. कावळयांना चंद्रोदय व मूर्खांना विवेक मानवत नाही. अर्जुना, त्याच्याशी तूं बोलूसुद्धा नकोस. विवेक व वैराग्याची शीवही न पाहणारे, शास्त्र व गुरु यांच्या वाऱ्यासही उभे न राहाणारे, यमनियमांची पर्वा न करणारे, सदैव शोक व दुःख यांच्या लाथा खाणारे, असल्यांच्या वाटेसही जाऊ नकोस. त्यांचे नावही घेऊ नकोस, चुकून जर तुझ्या तोंडून त्यांचे नाव निघाले तर प्रायश्चित म्हणून माझे नाव घे. ईशस्मरण हेच त्यावर प्रायश्चित्त.

तरि अर्जुना तूं तयातें । देखसी तै स्मरहो मातें ।
जें आन प्रायश्चित्त येथें । मानेल नाम ॥
अ. १७ ओ. १०९ ॥

ह्या घ्या तामसी वृत्तीच्या व आसुरी कृतीच्या खंडनपर ओव्या. इंद्रियाधीन होऊन जे माझे मत अव्हेरितील त्यांच्याशी अर्जुना बोलूसुद्धा नकोस.
" कां चंद्राचा उदयो जैसा । उपयोगा नवचे वायसा ।
मूर्खा विवेक तैसा ! रुचेल ना ॥ ३।१९८॥
तैसे ते पार्था । विमुख या परमार्थी । तयासी संभाषण सर्वथा । करवेना ॥ २०१ ॥.

पै चंद्रोदया आरौते । जयाचे डोळे फुटती असतें । ते काउळे केवी चंद्राते । वोळखिती अ. ४ ओ. २४

तैसी वैराग्याची शीव न देखती । जे विवेकाची भाषा नेणती । ते मूर्ख केवी पावती । मज ईश्वराते ॥ २५ ॥ ते वेळी यमनियमांचे वख नाठवे । पुढील अधोगतीची लाज नेणवे । आणि करितात जे न करावे । वेदु म्हणे ॥ अ. ७ ओ. १०४ ॥ दुःख शोकांच्या घाई । मारिलियाची सेचि नाही । हे सांगावया कारण काई । जे ग्रासिले माया ॥ १०७ ॥

एवं तमाचिये पडिले गर्ते । जे न पविजती विचाराचेनि हाते । हे असो ते गेले जेथ । शुद्धीचि नाही ॥ ओ. ॥१८५ अ. ९ श्लो. १२; म्हणोनि असोत इये वायाणी । कायसी मूर्खाची बोलणी । वाया वाढविता वाणी । शिणेल हन ॥ १८६ ॥ ऐसे बोलिले देवे । तेथ जी जी म्हणितले पांडवे । आइके जेथ वाचा विसंवे । ते साधु कथा ॥१८७॥.

पै वाचेचेनिहि पाल्वे । पापिया तया नातळावे । परि पडिले सांगावे । त्यजावया ॥ अ. १७ श्लो. ६ ओ. १०६ येथ शुद्धीचिया आशा । तो लेप न मनवे जैसा । तयाते सांडावया तैसा । अनुवादु हा ॥१०८॥

ज्ञानेश्वरांचे श्रोते व गीतेतील हितगुज

तू तें मुरारी । म्हणितले प्रगट करी । जे अभिप्राय गव्हरी । झाकिले आम्ही ॥ ते देवाचें मनोगत । दावित अहासि तूं मूर्त ॥ अ. १३।८५६।५७ ॥ तुमा श्री कृष्णाची आज्ञा आहे की गीतेच्या गव्हरांत जो आमचा अभिप्राय आहे तो तूं प्रगट कर, त्याप्रमाणे तूं देवाचे मनोगतच आम्हांस सांगत आहेस—

श्री भगवंतांनी गीतेत अर्जुनाला विविध तऱ्हेने जे जे गुह्य सांगितले. ते तें ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे. भगवंतांनी अ. ४ श्लो. ३ ' उत्तमरहस्य; अ.७ श्लो. २ सविज्ञान ज्ञान; अ. ९ श्लो. १ गुह्यतम ज्ञानविज्ञान; अ. १० श्लो. १ परमवाक्य, अ. १४ श्लो. १ ज्ञानातले उत्तमज्ञान; अ. १९ श्लो. अ. २० गुह्यतमशास्त्र; अ. १८ श्लो. ६८ परमगुह्य; इतक्या ठिकाणी जे हितगुज सांगितले आहे ते ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले आहे. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी श्लोकाचा मागील भाव त्यांनी व्यक्त केला आहे. उदा. अ. ६ ओ. १२१ ते १२६ पाहा. " तैसे जाहले श्री अनंता । ऐसे तरी मी न म्हणता । जरि ब्रयाचा न देखता । अतिरायो येथ ॥ देवांचा अतिशय म्हणजे अर्जुनाविषयी प्रेम अधिक जर मला न दिसते तर मी असे म्हणालो नसतो. याप्रमाणे अ. १५ श्लो. ६ ओव्या ३२१ ते ३३१ हे व्याख्यान आहे. व अ. ९ श्लो. १४ ओव्या २३१ ते २३८ व अन्य काही स्थळे हितगुज दृष्टीने पाहण्यासारखी आहेत.

गीतेतच उपदेश आहे व प्रचार आहे

मग ज्ञानेश्वरीमध्ये तो नाही असे म्हणण्यात स्वारस्य नाही. गीता हा ग्रंथच मुळी अर्जुनाला विविध तऱ्हेने बोध करण्याकरिता प्रगट झाला. व्यासांनी तो श्लोकबद्ध करून जगावर उपकार केला. अर्जुनाला निमित्त करून सर्वलोकानुग्रहार्थंच तो भगवंतानी उपदेशिला असे शंकराचार्यही म्हणतात. " तदुपदिदिक्षुः......भगवान् वासुदेवः " असेच त्यांचे शिष्य आहेत. मूळ भारत ग्रंथ व्यासांनी स्त्री, शूद्र, द्विजबंधु म्हणजे सर्वांकरिता लिहिला. वेद हे त्रैवर्णिकांतच होते. त्या बाहेरच्या सर्वसाधारण समजाकरिता भारत तयार केले असे भागवतस्कंध १ अ. ४ श्लो. २५ मध्ये म्हटले आहे. त्या भारताचा अर्क गीता, त्या गीतेतील ब्रह्मविद्येचा सुकाळ ज्ञानेश्वरांनी मराठीमध्ये जगाकरिता केला. इये मराठियेचिया नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी । देणे घेणे सुखचि वरी । होदेई या जगा ॥ १६ ॥ अ. १२, हे सारस्वताचे गोड झाड तुम्ही लाविले आहे ते अवधानामृताने शिंपडा म्हणजे तुमचेनि धर्मे होईल । सुरवाडू जगा ॥ श्लो. २ अ. ११. तैसा वागविलास विस्तारुं । गीतार्थेसी **विश्वभरु** । अ. १३. आनंदाचे आवारु । मांडू **जगा** ॥ ११६० ॥ दिसो परतत्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा ॥ माजी **विश्व** ॥ ११६२ ॥

तैसे अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें ।
संसारायेवढे थोर ओझें । फोडणें जगाचें ॥ १४७० ॥
अ. १८

बाप कुळ तें पवित्र । जेथीचा पार्थु या ज्ञाना पात्र ।
तेणे गीता केलें शास्त्र । आवारु जगा ॥
परी साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि माते ।
प्रबंध व्याजें जगातें । रक्षिले जाणा ॥ अ. १८।१७४४

-वरील सर्व ओव्या जगाला ब्रह्मविद्या समजावी, ती ऐकून सर्व जगाला सुख व्हावे, वाग्विलासाने, आनंदाचे आवार जगापुढे यावे, विश्वाला महाबोधाचा सुकाळ व्हावा, संसारायेवढे थोर ओझे नष्ट करण्याचे हे शास्त्र जगाला मिळाले असे म्हटले आहे. याचा अर्थ आचार व उपदेश याशिवाय अन्य काही आहे काय ?

परमभक्त परस्परांना बोध कथन करीत रमतात

गीता अ. १० श्लो. ९ वरील व्याख्यानात ज्ञानेश्वर म्हणतात- परमभक्त, ज्ञानी, जीवन्मुक्त अशांना आपले सुख, आपला ब्रह्मानंद, आपला अनुभव अधिकारी साधकांना सांगावा व त्या आनंदात निमग्न असावे असे वाटते. " पै गुरुशिष्याच्या एकांती । जे अक्षराचा एकाची वदंती । ते मेघाचियापरा त्रिजगतीं गर्जती । सैंघ, जैसी । कमलकलिका जाळेपणें। हृदयींच्या मकरंदातें राखो नेणें । हे रायारंकापारणे । आमोदाचें ॥ १२७ ॥ तैसेनि मातें विश्वांकथित । कथितेनि तोषें कथू विसरत । मग तया विसरामाजी विरत । आंगें जीवें ॥ १२८ ॥

-गुरु शिष्यांच्या एकांतातील एकाक्षरब्रह्म, मेघगर्जने-प्रमाणे सांगतात. कमलविकसित झाले की आपल्या घमघमाटाला झाकू शकत नाही. ते रावारंकांना सुगंधाने आनंदविते. त्याप्रमाणेच ज्ञानेश्वरादि संत निवृत्तिनाथ कृपेने भगवद्भक्ति सुख भोगतात, सांगतात व त्यांत स्वतःला विसरतात.

दुःख दुसऱ्याला सांगावे म्हणजे कमी होते व आनंद दुसऱ्यास सांगितला की वाढतो. ज्ञानेश्वरीमध्ये, असे ४।५ प्रसंग वर्णिले आहेत की, भगवंतांना ही ब्रह्म-विद्या कुणातरी अधिकाऱ्याला सांगावी अशी तळमळ लागली होती. अर्जुनाला ती ब्रह्मविद्या सांगून त्यांनी तळमळ घालविली- अ. १३ ओ. ११४४ ते ४७ मध्ये भगवंतांनी अर्जुनाला सर्व आत्मज्ञान दिले. देणारा कोण व घेणारा कोण दोन्ही एकच. जणु एका भांड्या-तील पाणी दुसऱ्यात ओतावे तसे झाले. अ. १६ ओव्या ४४८ ते ५५. अर्जुना ही ब्रह्मविद्या अखंड सांगावी असे वाटते परंतु काय करू, कोणी विचारणाराच भेटत नाही; आज तू माझे मनोरथ पूर्ण केलेस. तोंड भरून विचारणारा भेटलास व अद्वैत स्थितीला पोचल्यावर जे निर्मळ सुख होते ते विचारून तू माझेच मला सुख दिलेस, असे भगवान् म्हणतात. अ, १८ ओ. १३४६ ते ५० अर्जुना, आरसा, स्वच्छ करण्याचे कारण आपले तोंड चांगले दिसावे हे असते. अर्जुना तुझ्या निमित्ताने हे माझेच सुख मी भोगत आहे असे म्हटले आहे. ज्ञानेश्वरी अ. ११ च्या उपक्रमात 'तीरे संस्कृताची गहने । तोडोनिया मराठीच्या शब्द सोपाने । रचिलि धर्मनिधाने । श्रीनिवृत्ति देवे ।।अ. ११।९

आबालवृद्ध स्त्रीशूद्रादींना गीतार्थ सौलभ्याने सम-जावा, तो जगाला तारक व्हावा म्हणूनच संस्कृतमध्ये कोंडून पडलेला हा गीतार्थ मराठी भावार्थदीपिकेने प्रगट व्हावा हाच ज्ञानेश्वरीचा हेतू आहे. ज्ञानेश्वरांनी या ग्रंथावर उपजीविका करणाऱ्याचाही दृष्टादृष्ट विजय चिंतिला आहे. ग्रंथोपजीवी म्हणजे प्रकाशक व विक्रेते नव्हेत तर ज्ञानेश्वरीवर प्रवचने करणारे, तिचा अर्थ सांगणारे कीर्तनकार, निरूपणकार इत्यादि होत. त्या कामी हेच मोठे प्रचारक व उपदेशक होते.

एकंदरीत निष्कर्ष

ज्ञानेश्वरीमध्ये ब्रह्मविद्या आहे, काव्य आहे, साहित्य आहे. उपदेश आहे, प्रचार आहे. तर्कशुद्ध मांडणी आहे. खंडण-मंडणेही हळुवारपणे केली आहेत. अन-धिकारी श्रोत्यानांही स्पष्ट सूचना आहेत. सर्वकाही आहे. ज्ञानेश्वरी लिहिण्याची त्यांची भूमिका पान १५ वर ठसठशीत सांगितली आहे.

अनुक्रमणिका

प्रा. नी. वि. सोवनी

होळकर देणगी प्रकरण : टिळक-आगरकर-पत्रव्यवहार

टिळक व आगरकर यांच्यामधील वैचारिक वाद-विवाद केसरी व सुधारक यांच्या रकान्यातून जाहीर रीतीने झालेले असल्यामुळे प्रसिद्ध व सर्वश्रुत आहेत. त्यांच्या वैयक्तिक व खासगी संबंधासंबंधी जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून ते संबंध पुढे पुढे फारच बिघडले होते असे दिसते. त्यांना डेक्कन एज्युकेशन सोसायटी-तील भांडणांची पार्श्वभूमी होती. ही भांडणे काहीशी खासगी, काहीशी सार्वजनिक अशा स्वरूपाची होती. तथापि टिळक-आगरकर यांच्यामधील सर्वच हर्षा-मर्षाचे प्रसंग एकमेकाशी निगडित होते. व कोणत्याही क्षेत्रातील वैमत्याचा प्रश्न आला की सर्वच क्षेत्रातील वैमत्ये त्यात इच्छा असो वा नसो आणली जात, अगर येत. टिळक-आगरकरांच्या वैयक्तिक संबंधात होळकर देणगी प्रकरण हे एक प्रमुख प्रकरण आहे. त्यासंबंधी आतापर्यंत ५।६ वेळा निरनिराळ्या लोकांनी लिहिले आहे. तथापि त्या प्रकरणातील अस्सल पत्रव्यवहार त्यापैकी बहुतेकांच्यापुढे (प्रा.प. म. लिमये याखेरीज) नसल्यामुळे कोणालाच त्यावर प्रकाश पाडता आलेला नाही. या प्रकरणातील अस्सल पत्रव्यवहार काही वर्षांपूर्वी उपलब्ध झाला. टिळकांच्या जन्मशताब्दीच्या वेळी (१९५६) गायकवाडवाड्यात मांडलेल्या प्रदर्शनात तो मांडण्यात आला होता. त्या पत्र-व्यवहाराच्या आधारे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास तयार करणारे प्रा. प. म. लिमये यांनी २७।१२।१९५९ च्या केसरीत होळकर देणगी प्रकरणासंबंधी 'टिळक व आगरकर यांच्या जीवनातील होळकर देणगी प्रकरणावर नवा प्रकाश' या मथळ्याचा एक लेख लिहिला. परंतु त्यात तो अस्सल पत्रव्यवहार न छापता त्याच्या आधारावर "दोघेही बरोबर होते. होळकर महाराजांना योग्य सल्ला मिळाला नाही." असा सारवासारवी करणारा निष्कर्ष त्यांनी काढला असे दिसते. मग त्यामागील हेतू अगर कारणे काहीही असोत !

हा लेख लिहिण्याच्या भानगडीत मी आकस्मिक पडलो आहे. गेल्या दिवाळीत सहज प्रा. मा. दा. आळतेकर यांचे "आगरकर चरित्र" वाचावयास घेतले आणि त्यातील होळकर देणगी प्रकरणासंबंधी थोडासा एकान्तिक मजकूर वाचल्यावर त्यासंबंधीचा प्रा. प. म. लिमये यांनी वर उल्लेखिलेला लेख लिहिल्याचे आठवले. दुसऱ्या दिवशी केसरी-मराठा ग्रंथसंग्रहालयात गेलो व प्रा. लिमये यांचा तो लेख वाचला. परंतु त्याने माझे समाधान झाले नाही. म्हणून त्यासंबंधीचा अस्सल पत्रव्यवहार पहावा अशी इच्छा मनात उत्पन्न झाली. परंतु तो ग्रंथालयात नाही असे कळले. तथापि त्याचे फोटो प्रा. ग. प्र. प्रधान, (फर्ग्युसन कॉलेज) यांनी काढून ठेवले आहेत असे कळले. तेव्हा त्यांच्याकडे गेलो. व त्यांनी आनंदाने ते फोटो मला दिले. ती अस्सल पत्रे वाचल्यावर प्रा. प. म. लिमये यांच्या लेखाबद्दल माझे प्रथमवाचनी झालेले व वर उल्लेखिलेले मत दृढ झाले. आणि यासंबंधीचा हा अस्सल पत्रव्यवहार प्रसिद्ध व्हावा असे वाटू लागले. या पत्रव्यवहारातील तुटक उतारे सर्वश्री शि. ल. करंदीकर, व धनंजय कीर यांच्या इंग्रजी टिळक चरित्रातून प्रसिद्ध झालेले आहेत. वॉलपर्ट या अमेरिकी तरुण प्राध्यापकाने लिहिलेल्या 'टिळक व गोखले' या ग्रंथातही त्यातील काही मजकूर छापला आहे. तेव्हा हा सर्वच पत्रव्यवहार प्रसिद्ध व्हावा असे मला वाटले आणि त्यातूनच या लेखाची निष्पत्ती झाली आहे.

प्रा. प्रधानांनी दिलेली ही पत्रे मी बऱ्याच वेळा वाचली. त्यात खाडाखोड केलेला व कागद फाटल्यामुळे अगर जीर्ण झाल्यामुळे वाचण्यास दुर्बोध झालेला मजकूर जुळवण्याची खटपट केली. या कामी भारत इतिहास मंडळातील श्री. नाना जोशी यांची फार मदत झाली. पत्रे वाचताना बरेच नवीन धागेदोरे जुळवावे लागले. काहींचा अधिक शोध करावा लागला.

त्यात पुष्कळांचे साह्य झाले. डे. एज्युकेशन सोसायटीच्या दप्तरातील यासंबंधीचे कागदपत्र पाहण्याची इच्छा होती. व तशी खटपट प्रा. प्रधान यांनी केलीही. परंतु सोसायटीच्या दप्तरात त्या संबंधीचे कोणतेच कागदपत्र उपलब्ध नाहीत असे कळले. एका मान्यवर शैक्षणिक संस्थेच्या दप्तरातील जुन्या कागदपत्रांची ही अवस्था शोचनीयच म्हटली पाहिजे.

प्रा. प्रधानांनी ज्या पत्रांचे फोटो घेतले ते पत्रे आगरकरांच्या वंशजांकडील आहेत असे कळते. टिळकांची अस्सल पत्रे आगरकरांच्या दप्तरी असणे साहजिकच आहे. आणि ती तशी आहेत. पण आगरकरांनी टिळकांना लिहिलेली पत्रे आगरकरांच्याकडे कशी ? आगरकरांच्या पत्रातील खाडाखोड व तारखांची जुळवणी केली तर येथे छापलेली ही आगरकरांची पत्रे अस्सल पत्रांचे पहिले तर्जुमे (Drafts) आहेत हे स्पष्ट होते. हे आगरकरांच्या दप्तरी असावे हे नैसर्गिकच आहे. हे तर्जुमे असल्यामुळे त्यात काही दडलेला इतिहासही आपणास उपलब्ध होतो हा एक फायदाच म्हटला पाहिजे.

होळकर देणगी प्रकरणाची पहिली चर्चा न. चिं. केळकरांच्या टिळक चरित्राच्या पहिल्या खंडाच्या ९ व्या भागात केलेली आढळते. त्यापूर्वी यासंबंधी काही चर्चा झालेली असली तर ती मी पाहिलेली नाही. केळकरांच्या यासंबंधीच्या लिखाणावरून त्यांच्यापुढे मुख्यतः टिळकांनी आपल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदत्वाचा जो राजिनामा दिला त्यात यासंबंधी असलेला मजकूरच होता असे दिसते. टिळकांनी या राजिनाम्यात "होळकर देणगी प्रकरणासंबंधी मी एक स्वतंत्र परिशिष्टच लिहिले आहे व त्यात आगरकर व मी यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जोडल्या आहेत" असे म्हटले आहे.[१] परंतु हे परिशिष्ट सोसायटीच्या दप्तरातून फार पूर्वीच गहाळ झालेले दिसते. सोसायटीच्या इतिहासात टिळकांचा राजिनामा छापला आहे त्यात हे परिशिष्ट नाही. प्रा. आळतेकरांनी आपल्या आगरकरचरित्रात टिळकांच्या राजिनाम्याचे संपूर्ण मराठी भाषांतर छापले आहे. त्यातही हे परिशिष्ट नाही. कारण राजिनाम्याची प्रत त्यांना डे. ए. सोसायटीकडूनच मिळाली होती. आपल्या राजिनाम्याची प्रत त्यांनी विनंती केली असता त्यांना देण्याचे टिळकांनीच नाकारले होते ही गोष्ट प्रा. आळतेकरांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद करून ठेवलेली आहे.[२]

केळकरांनी समोर असलेल्या त्रुटित सामुग्रीवर या प्रकरणासंबंधीचा मजकूर सजविला आहे. तो अर्थातच एकांगी आहे. परंतु त्यावरून यासंबंधी त्यावेळी लोक काय बोलत असत याची चांगली कल्पना येते. टिळकांनी आपल्याला मिळालेली देणगी सोसायटीस दिली तर आगरकरांनी ती खासगीकडे घेतली. असे टिळकपक्षीय मंडळी म्हणत असत असे दिसते. ही देणगी प्रथम सोसायटीच्या सर्व सभासदांना दिली असता त्यात आपणास व्यक्तिशः मोठा वाटा मिळावा अशी आगरकरांनी खटपट केली व तसा हुकूम होळकर महाराजांच्याकडून आणवला असा स्पष्ट आरोप खुद्द टिळकांनी आगरकरांच्यावर प्रथम पासूनच केलेला दिसतो व तो त्यांनी आपल्या राजिनाम्यातही स्पष्टपणे उच्चारला आहे. याउलट टिळकांनी कपटाने हा डाव खेळून आगरकरांना तोंडघशी पाडले असे आगरकरांच्या बाजूचे वा टिळकांचे विरोधी लोक म्हणत असत[३]. या मताचा पूर्ण आविष्कार श्री. बापूजी आंबेकर यांनी केळकरांच्या टिळकचरित्र खंड पहिल्याचे जे विस्तृत परीक्षण ज्ञानप्रकाशात "टिळक जीवनरहस्य" या नावाची लेखमाला लिहून केले त्यात सापडतो. त्यात फक्त एकच नवा मुद्दा पुढे येतो. आगरकरांनी त्या देणगीपैकी एकही पैसा आपल्याला घेतला नाही असे विधान खात्रीलायक

1. Tilak's Resignation, *History of the Deccan Education Society* (1880–1935), Poona, 1935, Appendix I, pp. 3, 14.

२. उलटलेली पाने (आत्मचरित्र), कै. मा. दा. आळतेकर, संपादक- म. मा. आळतेकर, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, १९६१, पृ. ८१-८२.

३. टिळक चरित्र, खंड १ ला, पृ. २१५.

पुराव्यावरून आंबेकरांनी केले आहे. व आता पुढे आलेल्या माहितीवरून ते सर्वस्वी खरें होते असे निःसंशय दिसते. प्रा. आळतेकरांच्या आगरकर चरित्रात आंबेकरांच्या पुस्तकातील लिखाणच उद्धृत केले आहे. त्यात आगरकरांच्या मुलाला होळकर महाराजांनी आगरकरांच्या मृत्यूनंतर शिष्यवृत्ती दिली होती एवढी नवी माहिती या संदर्भात कळते. यानंतरचा लेख प्रा. लिमये यांचा. त्यांचा लेख समाधानकारक नाही असे मी आधीच म्हटले आहे. या प्रकरणाचा मी लावलेला सुसंगत इतिहास असा :

होळकर देणगी प्रकरण

१८८८ साली इंदूरचे शिवाजी महाराज होळकर पुण्यास आले. त्यांचा राज्यारोहण संमारंभ १८८६ साली इंदुरास झाला. त्या प्रसंगी डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे टिळक हजर होते. त्यावेळी टिळकांना शेला पागोटे देऊन महाराजांनी त्यांची संभावना केली होती. १८८८ च्या डिसेंबरमध्ये महाराज पुण्यास आले. तेव्हा त्यांनी पुण्यातील लेखक, पत्रकार, विद्वान वगैरे लोकांना आपल्या भेटीस बोलावले व त्यांना पोषाख वगैरे देऊन त्यांची संभावना केली. याप्रसंगी आगरकर व टिळक यांनाही आमंत्रण होते परंतु दोघेही या समारंभाला गेले नाहीत. त्यानंतर महाराजांनी त्या दोघांना स्वतंत्रपणे आपल्याला भेटावयास बोलावले. त्या निमंत्रणाचा स्वीकार करून दोघेही गुरुवार २० डिसेंबर रोजी सकाळी गाडीतून महाराजांच्या भेटीस गेले. या भेटीत आपली वैयक्तिक सत्कार–संभावना होणार याची दोघांनाही कल्पना होती. तशी झाल्यास आपण दोघांचीच संभावना म्हणून तिचा स्वीकार न करता ती डे. ए. सोसायटीच्या सर्व सभासदांचीच होणार असेल तर ती स्वीकारावी असे उभयतांच्या मते ठरले होते. तथापि ही संभावना टिळक आगरकर यांची किंवा सोसायटीच्या सर्व सभासदांची जरी असली तरी ती व्यक्तिशः प्रत्येकाची होती. ती डे. ए. सोसायटी या संस्थेला दिलेली देणगी नव्हे याबद्दल दोघातही भेटीस जाताना एकमत होते". अशा रीतीने कोणी देणगी देऊ लागला तर कोणी फेकून देईल काय? महाराजांनी तुमच्या माझ्या बरोबरच जर नामजोशी, आपटे वगैरे मंडळींना या देणगीत समभागी केले तर ती घ्यावयास हरकत नाही" असे टिळकांनी उद्गार काढल्याचे आगरकरांनी आपल्या २२।२४ डिसेंबरच्या पत्रात (नं. ३) नमूद केले आहे.

गुरुवार २० डिसेंबर रोजी सकाळी टिळक-आगरकर होळकर महाराजांना भेटले. काही औपचारिक बोलणे होऊन महाराजांनी त्यांना प्रत्येकी रु. ३५० देणगी-दाखल दिले. दोघेही ही देणगी स्वीकारून तेथून बाहेर आले. त्यासंबंधी महाराजांना दोघांपैकी कोणीही काहीही निराळे सांगितले नाही, अगर सुचविले नाही. दोघांनीही बाहेर आल्यावर महाराजांचे अनुचर (aid-de-camp) गुप्ते यांना "ही रक्कम आम्हा दोघानाच न मिळता आमच्या सोसायटीच्या सर्व सभासदात वाटून घ्यावयाची परवानगी आपण महाराजांच्याकडून मिळवून द्यावी" अशी विनंती केली. श्री. गुप्ते यांनी लगेच महाराजांच्याकडे जाऊन "तुमची विनंती महाराजांनी मान्य केली आहे" असे टिळक-आगरकरांना येऊन सांगितले. त्यानंतर दोघेही गाडीत बसून परत गावात आले. परत येताना टिळक आर्यभूषण छापखान्यात उतरले व आगरकर ओंकारेश्वराजवळील तांबे यांच्या वाड्यातील आपल्या बिऱ्हाडी गेले. त्यांनी ते रु. ७०० न्यू इंग्लिश स्कूलचे कारकून श्री. त्रिंबकराव जोशी यांच्याकडे दिले. ते तांबे यांच्याच वाड्यात रहात असल्याने हे सहज शक्य झाले.[४]

---

४. सहदरहू जोशी हे आगरकरांच्या थोडेफार तरी विरुद्ध असणारे गृहस्थ असावे असे वाटते. आगरकरांच्या संबंधी नाना प्रकारच्या बदनामीकारक कंड्या पिकविण्याचा त्यांनी १८८९ मध्ये उपक्रम केला असे दिसते. कारण त्याबद्दल त्यांनी बिनशर्त माफी मागावी अगर फौजदारी फिर्यादीस सिद्ध असावे असे पत्र आगरकरांनी त्यांना लिहिले होते. (नं. ७ चे पत्र). शि. ल. करंदीकर यांच्या टिळकचरित्रात याच गृहस्थांचे १९१६ चे एक अप्रसिद्ध पत्र टिळकांच्या कागदपत्रात आहे व ते संपूर्णतया टिळकांच्या भूमिकेचा पाठपुरावा करणारे आहे असा उल्लेख आहे. (पृ. ९३).

ता. २० डिसेंबर रोजी घरी आल्यावर शिराळकरांच्याकडून आगरकरांना असे कळले की होळकर महाराजांतर्फे एक इसम पुणे शहरातील ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ यांची यादी करीत फिरत आहे. ग्रंथकारांना उत्तेजन देण्यासाठी त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्या बऱ्याचशा प्रती विकत घेऊन त्या शाळेतील विद्यार्थ्यांना बक्षिस म्हणून वाटाव्या असा या मागचा महाराजांचा हेतू होता. आगरकरांना हे कळताच त्यांनी स्वत: प्रसिद्धिलेल्या 'विकारविलसित' व 'वाक्यमीमांसा' या पुस्तकांचा त्या यादीत समावेश झाल्यास आपला काही फायदा होईल असे वाटून त्यांनी महाराजांचे अनुचर गुप्ते यांना तशी विचारणा करणारी चिठ्ठी लिहिली. तिला गुप्ते यांच्याकडून ताबडतोब होकारार्थी उत्तर आले. "महाराजांनी तुमच्या दोन्ही पुस्तकांच्या प्रत्येकी २५० प्रती घेण्याची आज्ञा केली आहे. तरी त्या ताबडतोब पाठवाव्या व त्याचा आकारही कळवावा" असा मजकूर त्यात होता. त्याप्रमाणे आगरकरांनी त्या दोन्ही पुस्तकांच्या एकंदर मिळून ५०० प्रतींचा गठ्ठा बांधून व त्यांचा झालेला रु. ३०० आकार पावती करून ते सर्व महाराजांच्याकडे लगोलग रवाना केले.

दुसरे दिवशी सकाळी (शुक्रवार ता. २१ डिसेंबर १८८८) गुप्ते यांनी आगरकरांच्याकडे गाडी पाठवून त्यांना आग्रहाने आपल्याकडे बोलावून घेतले. त्याप्रमाणे आगरकर गेले. तेव्हा गुप्ते यांनी त्यांना सांगितले की, 'तुमच्या वाङ्मयसेवेवर महाराज खूष आहेत व त्यानिमित्त तुमचा यथोचित सन्मान करण्यासाठी काल दिलेल्या रु. ७०० पैकी रु. ४०० तुम्हाला द्यावे व उरलेले सोसायटीच्या दहा सभासदात वाटून घ्यावे' असा त्यांनी हुकूम केला आहे. तो मी तुमच्याकडे कालच पाठविला होता तो मिळाला का?' याला आगरकरांनी नकारार्थी उत्तर देता गुप्ते म्हणाले: 'काही हरकत नाही. मी त्या हुकुमाची दुसरी प्रत पाठवून देतो.' त्यानंतर महाराजांच्यांकडून तुम्ही शेला-पागोटे स्वीकारलेच पाहिजेत असा गुप्ते यांनी त्यांना आग्रह करून त्याप्रमाणे त्यांना शेला-पागोटे दिले. यानंतर आगरकर घरी परत आले. दुसऱ्या दिवशी (ता. २२) संध्याकाळी महाराजांच्या हुकुमाची प्रत गुप्ते यांच्याकडून आगरकरांना मिळाली. ती त्यांनी त्याचदिवशी टिळकांच्याकडे पाठविली.

हा प्रकार काय झाला हा आता तर्काने व कल्पनाशक्तीच्या साहाय्यानेच पुनर्रचिला पाहिजे. कारण तोच या प्रकरणातील केन्द्रबिंदू आहे. माझा यासंबंधीचा तर्क येथे देत आहे. डे. ए. सोसायटीच्या सर्व सभासदात वाटून देण्यासाठी दिलेल्या रु. ७०० पैकीच रु. ४०० आपल्याला आपल्या पुस्तकांचा मोबदला म्हणून महाराज देतील अशी आगरकरांना शुक्रवारी सकाळी गुप्ते यांना भेटण्यापूर्वी काहीच कल्पना नव्हती. मिळालेले रु. ७०० सोसायटीच्या सर्व सभासदांत वाटून घ्यावेत ही गोष्ट आगरकरांना मान्य होती. होळकर महाराजांच्याकडून ता. २० रोजी परत आल्यावर टिळक-आगरकरांनी सोसायटीच्या इतर सभासदांनाही तसे सांगितले होते असे टिळकांनी आपल्या राजिनाम्याच्या परिशिष्टातील कैफियतीत म्हटले आहे.[५] 'त्या रु. ७०० पैकीच रु. ४०० आपल्याला आपल्या पुस्तकांबद्दल देतील अशी मला कल्पना असती तर माझी पुस्तके घ्या अशी विनंती मी महाराजांना केली नसती' असे आगरकरांनी आपल्या २२।२४ डिसेंबरच्या पत्रात (क्रमांक ३ चे पत्र) लिहिले आहे. इतर लेखकांची पुस्तकेही महाराजांमार्फत खरेदी होणार आहेत व त्यासाठी अर्थातच निराळे पैसे अंकित केलेले असतील अशीच आगरकरांची समजूत होती व कोणाचीही झाली असती. महाराजांनी (ता. २०) गुरुवारी जो दुसरा हुकुम काढला तो आगरकरांना त्याच दिवशी मिळता तर त्यांना गुप्ते यांच्याकडे शुक्रवारी सकाळी जाण्यापूर्वी या नव्या बनावाची कल्पना आली असती. परंतु तसे झाले नाही. तसे झाले असते तर त्यांनी काय केले असते हे सांगणे कठीण आहे. तथापि तो गुरुवारचा हुकूम गुरुवारीच आगरकर-टिळकांना मिळता तर या प्रकरणाचा सर्वच रंग पालटला असता. परंतु तसे व्हावयाचे नव्हते.

---

५. पहा: Appendix to Tilak's Resignation of the Lifemembership of the D. E. Society, सुरवातीची कैफियत.

शुक्रवारी (ता. २१) सकाळी गुप्ते यांचे बोलावण्यावरून जेव्हा आगरकर त्यांच्याकडे गेले त्यावेळी त्यांना हा नवा हुकूम समजला. त्यावर ' काल दिलेले पैसे आम्ही आता वाटून घेतले आहेत तेव्हा या नवीन हुकुमाची तामिली करता येणार नाही. तेव्हा माझ्या पुस्तकांचे पैसे निराळे दिले पाहिजेत. ' असे आगरकरांनी म्हणावयास पाहिजे होते असे टिळकांनी आपल्या पत्रात सूचित केले आहे. (पत्र क्रमांक ४ व टिळकांची कैफियत) आगरकरांनी तसे म्हटले नाही ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यांनी तसे का म्हटले नाही याबद्दल निरनिराळे तर्क करता येतील. परंतु प्रत्यक्ष त्यांच्या मनात काय प्रक्रिया झाल्या हे पूर्णत्वाने आज सांगणे कोणासच शक्य होणार नाही. तथापि त्या संबंधी थोडीफार कल्पना करणे अशक्य नाही. एकतर आम्ही पैसे वाटून घेतले आहेत असे म्हणणे असत्य होते. कारण ते वाटलेले नव्हते. दुसरे तसे म्हटल्यावर 'पुस्तकांचे पैसे निराळे देणार नसाल तर आदल्या दिवशी पाठवलेली पुस्तके परत द्या ' असेही म्हणणे क्रमप्राप्तच होते. ते कितपत प्रशस्त होते यासंबंधी मतभेद होऊ शकतील. आगरकरांनी तसे म्हटले नाही हे उघड आहे. त्यांच्याहून अधिक व्यवहारी माणूस तेथे असता तर तो खचित तसे म्हणता; परंतु आगरकरांच्या एकंदर चरित्रावरून त्यांच्यावर व्यवहारीपणाचा आरोप करणे शक्य नाही असेच कोणासही वाटेल. यासर्व देणगीप्रकरणात आगरकरांनी रु. ४०० ही घेतले नाहीत व होळकर महाराजांना पाठवलेल्या त्यांच्या पुस्तकांची रु. ३०० ही किंमतही त्यांना मिळाली नाही. म्हणजे रु. ३०० ची खोटच त्यांना बसली हे ओघाने पुढे येणारच आहे.

या सर्व प्रकरणात होळकर महाराजांचे अनुचर गुप्ते यांची भूमिका व कर्तृत्व काय याबद्दल बऱ्याच शंका निर्माण होतात. ता. २० (गुरुवार) रोजी ज्या वेगाने व तडफेने हालचाली झाल्या त्यात गुप्ते यांचा वाटा फार मोठा असावा. आणि त्यांच्या दरबारी वळणात या प्रकरणाचे रहस्य दडलेले असावे असे वाटते. हिंदी संस्थानिक व त्यांच्या भोवतीचे लोक आणि तेही १८८० सालचे. हे यासंबंधी विचार करताना लक्षात घेणे आवश्यक आहे. राजा महाराजांचा दबदबा त्यावेळी इतका होता की गुरुवारी भेटीस गेले असताना टिळक वा आगरकर यापैकी कोणाचीच महाराजांना प्रत्यक्षपणे ही देणगी सर्वांना वाटून देण्याची विनंती करण्याची छाती झाली नाही. त्यावेळच्या रीतिरिवाजात त्यांना ते अप्रशस्तही वाटले असेल. राजाने एखाद्यास दिलेली देणगी त्याने आपण न घेता आपल्या मित्र मंडळींत वाटून घेण्याची विनंती करणे म्हणजे एकप्रकारे राजाचा अपमान करण्यासारखेच होय असे त्या सरंजामशाहीबद्दल अभिमान व प्रेम बाळगणाऱ्या काळात वाटत असले तर आज आपणास नवल वाटण्याचे कारण नाही. टिळक-आगरकरांनी तशी विनंती गुप्ते यांना केली. आता गुप्ते हे होळकर महाराजांचे A. D. C. म्हणजे अनुचर होते. त्यांचा दर्जा खासगी चिटणीस इतकाही नव्हता. त्यांनी महाराजांना वरील प्रमाणे विनंती करून तावडतोब ती मान्य करवून घेणे संभवनीय वाटत नाही. यासंबंधी असा तर्क वाहतो कीं गुप्ते यांनी महाराजांना त्यावेळी काहीच सांगितले नाही अगर त्यांची परवानगीही मिळवली नाही. टिळक-आगरकरांना तसे भासविले व त्यांची बोळवण केली. योग्य संधी साधून हे काम करता येईल तडकाफडकी करण्याचे कारण नाही असा यासंबंधी गुप्ते यांचा दरबारी अंदाज असावा. दरबारियांच्या रीतरिवाजासंबंधी व वागणुकीसंबंधी जी सर्वसामान्य माहिती आपल्याला आहे त्यावरून यात काही गैर होते असेही म्हणता येणार नाही.

सुदैवाने श्री. गुप्ते यांना तशी संधी काही तासातच मिळाली. ' माझ्या पुस्तकाच्या काही प्रती घेता येतील काय?" अशी निराळ्या भूमिकेवरून लिहिलेली आगरकरांची चिठ्ठी त्यांच्या हाती पडली. त्या अनुरोधाने आगरकरांना महाराजांच्या इच्छेप्रमाणे मानधन देता येईल. (नुसते दिले तर ते घेणार नाहीत हे सकाळीच सूचित झाले होते) असे त्यांनी महाराजांच्यापाशी सांगून त्यांचे मन वळवले असण्याचा दाट संभव दिसतो. त्यातूनच त्या दुसऱ्या हुकुमाचा उगम झाला. तो हुकुम गुप्ते यांनी त्याच दिवशी पाठवला का तसे आगरकरांना शुक्रवारी सकाळी भासवले हे सांगणे कठीण आहे. त्या दिवशी आगरकरांना पुन्हा बोलावून त्यांना शेला-पागोटे देण्याचे काही प्रयोजन दिसत नाही. फक्त गुप्ते यांच्या

योजनेतच त्याचा उगम दिसतो. ता. २० (गुरुवार) ची या हुकुमाची अस्सल प्रत आतापर्यंत कोठेही उपलब्ध झालेली नाही. आहेत त्या प्रती २१ तारखेच्या आहेत. तेव्हा गुरुवारी हुकुम काढला होता का? व तो गुरुवारीच आगरकरांच्याकडे पाठवण्यात आला का हे प्रश्न राहतातच. कदाचित् मूळ हुकुम बारनिशीत गेला असेल व तो न मिळाल्याचे आगरकरांनी दुसऱ्या दिवशी सांगितल्यामुळे त्याच्या प्रतीच फक्त बारनिशीच्या बाहेर आल्या असतील. परंतु त्याबद्दल निर्णायक सांगणे कठीण आहे.

मला असा दाट संशय येतो की शुक्रवारी सकाळी गुप्ते यांनी जेव्हा आगरकरांना 'कालचा हुकुम मिळाला का?' असे विचारले ते मानभावीपणाने विचारले असावे. कारण त्यानी नाही म्हणताच गुप्ते यांनी त्याची प्रत पाठवतो असे म्हटले. (आगरकरांचे पत्र- ता. २६ क्रमांक ५) प्रत्यक्षात ती हुकुमाची प्रतसुद्धा आगरकरांच्याकडे २२ तारखेस आली असे दिसते (टिळकांची कैफियत). आगरकर-गुप्ते यांच्यामधली निरोपानिरोपी व चिठ्ठ्यांची ने आण गुरुवारी ज्या गतीने झाली त्यावरून मूळ हुकूम गुरुवारी संध्याकाळी काढला असता तर तो त्याच दिवशी आगरकरांना न मिळण्याचे काही कारण नव्हते. परंतु गोष्ट यांच्या योजनेस अनुकूल नसल्याने असा हुकूम महाराजांनी दिला असला तरी तो गुरुवारी काढलाच नसावा अशी शंका येते. गुरुवारी महाराजांची संमती नव्या हुकुमास गुप्ते यांनी मिळवली असेल परंतु प्रत्यक्ष कागदावर हुकुम त्या दिवशी काढला नसावा. तो दुसऱ्या दिवशी काढला असे दिसते. त्यामुळे हे तथाकथित गुरुवारचे (ता. २० चे) पत्र अस्तित्वातच नव्हते. त्याची अस्सल प्रत आगरकरांना मिळती तर त्यांना टिळकांनी विचारलेल्या 'ते गुरुवारचे पत्र कोठे आहे?' या प्रश्नाला बिनतोड उत्तर देता आले असते. आणि टिळकांची त्यावरची सर्व रचना कोसळली असती. परंतु ते पत्रच अस्तित्वात नसल्याने (अर्थात टिळक म्हणत होते त्या अर्थाने नव्हे!) तसे झाले नाही. व आगरकर खोड्यात अडकले.

मी हा जो तर्क केला आहे त्याला आगरकरांच्या ता. २२।२४ च्या पत्राच्या तर्जुम्यातील खोडलेल्या परंतु वाचता येणाऱ्या मजकुरात थोडासा पुरावा मिळतो. (पत्रक्रमांक ३ ची पादटीप). शुक्रवारी सकाळी गुप्ते यांनी आगरकरांना नव्या हुकुमाची बातमी सांगितल्यावर तसे करणे बरोबर नाही असे त्यांनी म्हटले असावे व त्याला उत्तर म्हणून गुप्ते यांनी त्यांना 'महाराजांच्या मनात सोसायटीच्या सर्व सभासदांचा सत्कार करण्याचे कधीच नव्हते. तुमचा दोघांचाच सत्कार त्यांना करावयाचा होता' असे सांगितल्याचे आगरकरांनी लिहिले आहे व तो मजकूर खोडला आहे. हे टिळकांना लिहिण्यात काही फायदा नाही असे त्यांना वाटले असावे. कारण टिळक त्यांच्या कोणत्याही शब्दावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते हे या पत्रव्यवहारावरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. तथापि या मजकुरावरून गुरुवारी सकाळी महाराजांची झटपट संमती ही देणगी वाटून घेण्यास गुप्ते यांनी मिळवली होती यातील असत्यता उघड होते.

गुप्ते यांनी यात जी कारवाई केली ती वाईट हेतूने केली असे म्हणावयाचे कारण नाही. त्यांना जे उचितकर्म प्रासंगिक वाटले ते त्यांनी सद्बुद्धीनेच केले असावे. त्यातून वादाची जी राळ उडाली त्याला त्याने साह्य झाले तरी त्यामागची टिळक-आगरकरांची मानसिक परिस्थिती त्याला अनुकूल होती म्हणूनच ती उडाली. ना तर उडती ना.[६] हे ध्यानात ठेवले पाहिजे.

होळकर महाराजांच्या दुसऱ्या हुकुमाची बातमी टिळकांना ता. २२ ला संध्याकाळी मिळाली. तो हुकुम प्रत्यक्ष पाहण्याची अगर त्यासंबंधी आगरकरांना काही विचारण्याची वाटही न पाहता आपल्या एक

---

६. आगरकरांच्या पुस्तकांची किंमत रु. ३०० असूनसुद्धा त्यांना रु. ४०० द्यावे असे सुचविण्यात इंदूर दरबारचा आगरकरांच्यावरचा लोभ दिसून येतो. हा लोभ विशेष होता याला आणखीही पुरावा आहे. महाराजांनी आगरकरांना दरमहा रु. ५०० ची नोकरी देऊ केली होती. ती त्यांनी नाकारली हे प्रसिद्धच आहे. आगरकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाला इंदूर दरबारने शिष्यवृत्ती दिली होती ही गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे. आगरकरांच्या बद्दल होळकर महाराजांना विशेष ममत्व होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

दोन मित्रांशी चर्चा करून टिळकांनी न्यू इंग्लिश स्कूलचे कारकून त्रिंबकराव जोशी यांना सूचनापत्र लिहिले की तुमच्याकडे जी रु. ७०० ची रक्कम जमा झाली आहे तिचा मला सांगितल्याशिवाय कोणताही विनियोग करू नये. (क्रमांक ३ च्या पत्रासोबतचे पत्र) हे पत्र पाठवल्यावर गुप्ते यांचे पत्र (क्रमांक १) टिळकांच्या हाती आले. त्यानंतर थोडयाच वेळात सदर त्र्यंबकराव जोशी रस्त्यातून जाताना टिळकांना दिसले. त्यांना बोलावून आणून त्यांना पाठवलेल्या पत्रातील सूचना त्यांनी त्यांना तोंडी केल्या. व हिशोब लिहिताना ही रु. ७०० ची रक्कम डे. ए. सोसायटीच्या बोर्डातील सभासदांच्या नावे जमा करण्यास सांगितले व तशी त्यास त्याच्या डायरीत नोंद करण्यास सांगितले. (पत्र क्रमांक ४) त्यानंतर होळकर महाराजांना पाठवावयाच्या पत्राचा एक तर्जुमा त्यांनी तयार केला. त्यात 'काल आपणाकडन आलेली रक्कम आम्ही सर्व सोसायटीच्या सभासदांना वाटून टाकली आहे तेव्हा आपल्या नव्या हुकुमाची अंमलबजावणी कशी करावयाची असे विचारले होते'. हा तर्जुमा त्यांनी आगरकरांच्याकडे पाठवला व त्याला त्यांची संमती व त्यावर त्यांची सही त्यांनी मागितली. 'तुमच्या वाङमयीन कामगिरीबद्दल होळकर महाराजांनी तुम्हाला निराळे पैसे द्यावे' असे आपले मतही त्यांनी त्यात सूचित केले. (पत्र क्रमांक २).

त्र्यंबकराव जोशी यांना लिहिलेले सूचनापत्र व होळकर सरकारांना लिहावयाच्या पत्राचा तर्जुमा त्याच दिवशी आगरकरांना मिळाले आणि त्यांना या टिळकांच्या खटाटोपाचा अतिशय संताप आला. आणि मनाच्या त्या व्यग्र अवस्थेतच त्यांनी लगेच त्यास क्र. ३ चे पत्र त्याच दिवशी लिहिले पण त्याची प्रत करून ते ता. २४ रोजी टिळकांना मिळाल्याचे दिसते. या पत्रात आगरकरांनी आपल्या परीने सर्व गोष्टींचा खुलासा करून टिळकांनी होळकर महाराजांच्याकडे पाठवण्यास तयार केलेल्या पत्रावर सही करण्याचे नाकारले. टिळकांनी त्र्यंबकराव जोशी यांना दिलेल्या सूचना व त्यासंबंधी त्यांचे सर्व वर्तन याचा आगरकरांना फार राग आला होता. कारण त्यावरून आगरकर हे महाराजांच्या हुकुमाच्या आधारे कोणासही न विचारता आपले रु. ४०० घेऊन टाकण्याचा संभव आहे असे टिळकांनी स्पष्टपणे सूचित केले होते व आगरकरांवर आत्यंतिक गैरविश्वास त्यांनी प्रकट केला होता. आगरकरांचे हे पत्र व त्यानंतरचे पत्रही एखाद्याने अंतःकरण भडभडून लिहावे असे लिहिलेले आहे.

या पत्राला टिळकांचे उत्तर पत्र क्रमांक ४ हे होय. हे २४ तारखेचे आहे. त्यात त्यांनी आपल्या बाजूचा खुलासा केला आहे तो थोडाफार वकिली थाटाचा वाटतो. परंतु त्यातही 'तुमचे मागचे वर्तन पाहता तुम्ही हे रु. ४०० बोर्डाला न विचारता घेतले असतेत' असा आपला दाट संशय सूचित केला आहे. त्याचप्रमाणे गुप्ते यांना शुक्रवारी सकाळी आगरकर भेटल्यावरच हा नवा हुकुम निघाला. तो त्यांच्या भेटीपूर्वीच पाठवला होता हे खरे दिसत नाही असेही स्पष्टपणे सुचविले आहे.

या पत्राला आगरकरांचे ता. २६ चे क्र. ५ चे उत्तर आहे. त्यांत पुन्हा एकदा खुलासा व टिळकांच्या एकंदर स्वभावधर्माबद्दल फारच कडक भाषेत लिहिलेले आहे. त्याला टिळकांचे उत्तर एक पोस्ट कार्डावर लिहिलेले क्रमांक ६ चे पत्र आहे. त्यात 'तो गुरुवारी पाठवलेला हुकुम कोठे आहे?' असे विचारले आहे व 'दुसरा हुकुम मागण्यास तुम्हास लाज कशी वाटली नाही?'' असेही विचारले आहे.[७]

ता. २५ रोजी आगरकरांनी डे. ए. सोसायटीच्या बोर्डाच्या चिटणिसास पत्र पाठवून आपण त्याच्या सभासदत्वाचा राजिनामा देत आहोत. कारण टिळकांनी आपल्याबद्दल आत्यंतिक गैरविश्वास प्रकट केला आहे असे लिहिले व टिळकांना याबद्दल बोर्डाने खुलासा मागावा असे सुचविले. (पत्र क्रमांक ८) त्याप्रमाणे ता. २७ ला बोर्डाची सभा झाली. त्याला लिहिलेल्या पत्रात टिळकांनी ही रु. ७०० ची रक्कम

७. या शेवटच्या दोन्ही पत्रात डे. ए. सोसायटीतील पैशाच्या देण्याघेण्यासंबंधींच्या काही घटनांचा व ठरावांचा उल्लेख आहे. त्यासंबंधी टिळकांच्या राजिनाम्यातील पुढील उद्धृत भागावरून खुलासा होईल :

"३१ मार्च १८८६ रोजी छापखान्याला कर्ज देण्याचे वेळी तिजोरी आगरकरांच्या ताब्यात होती. बहुमताने कर्ज द्यावे असे मंजूर झाले होते तरी त्यांनी (ते) देण्याचे नाकारले. त्यावेळी पैसे दिले पण आगरकरांचे समाधान

होळकर महाराजांनी डे. ए. सोसायटीच्या सर्व सभासदांच्या वैयक्तिक सत्कारासाठी दिली होती असे म्हटले आहे. बोर्डाने या संबंधात कोणतेच मत दिले नाही अगर अभिप्राय व्यक्त केला नाही. पुढच्याच वर्षी १८८९–टिळकांनी डे. ए. सोसायटीच्या तहहयात सभासदत्वाचा जो राजिनामा दिला त्यात या पत्रात आगरकरांवर केलेल्या आरोपांचा पुनरुच्चार केला आहे. व वामन शिवराम आपटे यांचा याबाबतीत आगरकरांना पाठिंबा आहे असे नमूद केले आहे.

ज्या रु. ७०० वरून हा वाद पेटला त्यांचे शेवटी काय झाले ? त्यापैकी आपला हिस्सा टिळकांनी सोसायटीस दिला व आगरकरांनी खासगीकडे घेतला हे न. चिं. केळकरांचे विधान सर्वस्वी चूक होते. हे रु. ७०० बरेच वर्षे सोसायटीच्या खाती पडून होते. व कालांतराने ते सोसायटीच्या इतर पैशात जमा झाले. अशा रीतीने वैयक्तिक सत्कारासाठी म्हणून होळकर महाराजांनी दिलेले हे पैसे सोसायटीला देणगी म्हणून मिळाले ! 'या वैयक्तिक देणगीची सोसायटी या संस्थेला देणगी असा तुम्ही यातून अर्थ काढीत आहांत' असे टिळकांना आगरकरांनी ता. २६ च्या पत्रात (क्रमांक :५) लिहिले आहे. त्याप्रमाणे टिळकांच्या मनात तसे असून अगर नसूनसुद्धा झाले हे खरे !

समालोचन

हा सर्व पत्रव्यवहार वाचताना आणि त्यामागील घटनांचा विचार करता काही गोष्टी अगदी स्पष्टपणे मनात भरतात.

(१) टिळक-आगरकरांचे वैयक्तिक संबंध आधीच ताणले गेले होते. सोसायटीतील भांडणांची त्याला पार्श्वभूमी होती. या अनुकूल भूमीत या घटनेची ठिणगी पडली. व भडका उडाला. ती विशिष्ट पार्श्वभूमी नसती तर हे प्रकरण इतके रंगले नसते.

(२) या पत्रातून उल्लेखिलेल्या १।२ गोष्टी व त्यावरील उभयतांची भाष्ये ही स्पष्टपणे पोरकट-पणाची वाटतात.

(३) आगरकरांच्या लिहिण्यात भडभडेपणा व सरळपणा आहे. त्यात भावनेचा जोर अधिक. टिळकांचे लिहिणे जास्त सावध, जेवढ्यास तेवढे व वकिली वळणाचे वाटते. त्यात भावना जवळजवळ नाहीच.

टिळक आगरकरांचे भिन्न स्वभावही या प्रकरणात उत्तम प्रकारे प्रतीत होतात. त्रयस्थदृष्टीने पाहता शुक्रवारी सकाळी गुप्ते यांच्याकडून नवीन हुकुमाची बातमी कळताच आगरकरांनी स्पष्टपणे त्यातून निघणाऱ्या अडचणी गुप्ते यांना सांगावयास पाहिजे होत्या. आगरकरांच्या पत्रांवरून तसे त्यांनी काहीसे म्हटले असावे व त्याला उत्तर म्हणूनच गुप्ते यांनी 'महाराजांना तुमच्या दोघांशिवाय इतर कोणाचाच सत्कार करावयाचा नव्हता' असे सांगितले असावे. (हा बोध खोडलेल्या पण वाचता येणाऱ्या आगरकरांचे ता. २२।२४ च्या पत्रातील मजकुरावरून होतो हे यापूर्वीच म्हटले आहे). यावरही त्यांनी 'हे मान्य करता येणार नाही' असे गुप्ते यांना सांगावयास हवे होते. परंतु त्यांनी सांगितले नाही हेही स्पष्ट आहे. तसे त्यांनी का केले यासंबंधी तर्क करावयाचा तर संस्थानी आणि दरबारी पद्धतीचे त्यांच्या मनांवर असलेले दडपण असावे असे वाटते. टिळकांच्या

करण्यासाठी आम्ही ३ एप्रिल १८८६ रोजी असा ठराव मंजूर केला की सभासदांचे एकमत झाल्याशिवाय यापुढे कोणालाही कर्जाऊ रकमा देऊ नयेत. पुढे एका वर्षाने गोखल्यांना कर्जाची नड वाटली आणि खरोखर चमत्कार असा की नामजोशांना कर्ज देण्याच्या विरुद्ध पूर्वी मत देणाऱ्या आगरकरांनीच गोखल्यांना कर्ज द्यावे म्हणून ठराव स्वतः आणला आणि त्याला विरोध होईल या भीतीने ३ एप्रिल १८८६ रोजी मंजूर झालेल्या नियमाला गोखल्यांचे उदाहरण अपवाद म्हणून समजावे या उपसूचनात्मक ठरावाला त्यांनी दुजोरा दिला. मी पुनः यावेळी देणगी विरुद्ध कर्ज हा प्रश्न पुढे आणला. परंतु गोखल्यांनीच कर्जासाठी केलेला अर्ज परत घेतला त्यामुळे हा वाद येथच थांबला व हा सर्व प्रश्न निर्णय लागल्याशिवाय भिजत पडला."

गोपाळ गणेश आगरकर, चरित्रात्मक निबंध, मा. दा. आळतेकर, भारत गौरव ग्रंथमाला, पुष्प ८७, मुंबई, १९३०, पृ. २३५.

मनावरही हे दडपण कमी होते अशातला अर्थ नाही. त्यांनीही गुरुवारी प्रत्यक्ष भेटीच्या वेळी खुद्द महाराजांना विनंती करण्याचे धैर्य दाखविले नव्हतेच. गुप्ते यांच्या मार्फतच विनंती करण्यात आली होती हे वर आलेच आहे. 'गुप्ते यांनी गुरुवारी सकाळी महाराजांना विनंती करून ही देणगी सर्वात वाटून घेण्याची परवानगी मिळवून दिली. हा दुसरा हुकूम महाराजांनी दिला तो नुसता तोंडी न राहता पत्रांकितही झाला. आता पुन्हा तोही बदलून द्या असे गुप्ते यांना म्हणणे म्हणजे त्यांना संकटातच घालणे होय. शिवाय महाराजांच्या मनातही आपणा दोघांचाच सत्कार करावा असे आहे असे गुप्ते सांगत असताना त्यांना पुन्हा हुकूम बदलण्यास कसा सांगावा' असे विचार आगरकरांच्या मनात आले असण्याचा संभव दिसतो. त्यामुळे त्यांची जीभ रेटली नाही असे वाटते. मात्र त्यांनी गुप्ते यांच्याकडून परत आल्याबरोबर शुक्रवारी सकाळी लगेच टिळकांची गांठ घेऊन त्यांच्या कानावर ही हकीकत घातली असती तर व्यवहारदृष्टया बरे झाले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही. नव्या हुकुमाची प्रथम बातमी व नंतर प्रत्यक्ष हुकूम टिळकांच्या हाती आल्याने त्यांना या सर्व प्रकाराचा संशय आला असल्यास नवल नाही. पण त्यांनाही यासंबंधी आगरकरांना विचारण्याची अगर त्याचा खुलासा विचारण्याची गरज वाटली नाही. दोघांचेही वैयक्तिक संबंध अधिक सलोख्याचे असते तर असे खासच झाले नसते. 'मी गुप्त्यांना स्पष्ट सांगावयास हवे होते पण माझी जीभ रेटली नाही. माझी चूक झाली' असे आगरकर टिळकांना म्हणते तर टिळकांनीही ते चालवून घेतले असते. (टिळकांनी आपल्या पुढच्या राजकीय आयुष्यात आपल्या कित्येक अनुयायांचे किती गोष्टीत चालवून घेतले, त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष केले हे सर्वश्रुत आहे.) याउलट आपल्या स्नेह्याचा भिडस्त आणि अव्यवहारी स्वभाव ओळखून अशी चूक त्याच्या हातून झाली तर ती क्षम्य आहे असा सहानुभूतीने टिळकांनी विचार केला असता तर त्यांनाही या प्रकरणी राळ उडवण्याची गरज भासली नसती. परंतु एकमेकाबद्दल अशा तऱ्हेचे समंजस वर्तन करण्यास लागणारे प्रेमाचे वैयक्तिक संबंध त्यावेळी त्या दोघांमध्येही अस्तित्वातच नव्हते. त्यामुळे आगरकरांनी टिळकांना तसे म्हटले नाही व टिळकांनीही ह्या प्रकरणी सहानुभूतीने विचार केला नाही. आगरकरांच्या अव्यवहारीपणाचा पुरेपूर फायदा घेऊन टिळकांनी त्यांना पेचात पकडले. गुप्ते यांच्या पडद्यामागल्या हालचाली टिळकांची बाजू उचलून धरण्यास पोषक ठरल्या. या सर्व प्रकरणात डे. ए. सोसायटीच्या बोर्डाने कोणतेच मत प्रकट केले नाही ही गोष्ट महत्त्वाची आहे. या प्रकरणी आगरकरांना रु. ३०० ची खोट बसली. हे वर सांगितलेच आहे. टिळकांनी या प्रकरणावर पडदा न पाडता पुढच्या वर्षी दिलेल्या आपल्या राजिनाम्यात त्यासंबंधीचे एक स्वतंत्र परिशिष्ट जोडले. आणि त्यातील आपल्या कैफियतीत हे सर्व प्रकरण सभासदाची बाहेरची वैयक्तिक कामे व संस्थेचे हित यातील परस्पर विरोधातून निर्माण झाले असे प्रतिपादन केले आहे. इतर गोष्टींसंबंधाने ते तसे होते की नाही या वादात न शिरता निदान होळकर देणगी प्रकरणी तरी टिळकांचे हे म्हणणे बरोबर नव्हते. देणगी सोसायटी या संस्थेस दिली असे टिळकही म्हणत नव्हते. सोसायटीला मिळालेली देणगी खासगी म्हणून घेतली असे यात कोठेच दिसत नाही. उलट वैयक्तिक सत्कारासाठी म्हणून दिलेली देणगी शेवटी सोसायटीसच मिळाली. हे वर आलेच आहे. 'जी देणगी सोसायटीच्या सर्व सभासदांना देणार त्यातूनच माझी पुस्तके घेऊन मला जास्त देणगी द्या' असे आगरकरांनी सूचितसुद्धा केल्याचे दिसत नाही. मात्र त्यांनी तसे केले असावे असा आपल्या मनातील अंदेश टिळकांनी आपल्या लिहिण्यात आणि वागण्यात स्पष्टपणे दाखविला. टिळकांचे हे वर्तन उघड उघड अनुदार वाटते. माणुसकीच्या निकषावर ते निषेधार्हच ठरेल.

अनुक्रमणिका

परिशिष्ट : टिळक–आगरकर पत्रव्यवहार

येथे एकंदर १० पत्रे छापली आहेत. त्यापैकी क्र १ ते ६ ही पत्रे टिळकांनी आपल्या राजिनाम्याच्या परिशिष्टास जोडलेली होती ती आहेत. क्रमांक २ च्या पत्रासोबत जोडलेले टिळकांचे पत्र व क्रमांक ३ बरोबर जोडलेले त्र्यंबकराव जोशी यांना टिळकांनी लिहिलेले पत्र ही जादा पत्रे आहेत. ती टिळकांच्या राजिनाम्याच्या परिशिष्ठांत नव्हती. क्रमांक ७ चे पत्र प्रा. प्रधान यांनी दिलेल्या पत्रांतील आहे. क्र. ८ चे पत्र डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासात छापले आहे तेथून घेतले आहे.

पत्र क्रमांक– १

१. गुप्ते यांचे टिळक-आगरकरांना पत्र २१।१२।८८
२. टिळकांनी गुप्ते यांना पाठवावयाच्या पत्राचा तयार केलेला मसुदा व आगरकरांनी त्यावर सही करण्यास विनंती केलेले पत्र २२।१२।८८
३. आगरकरांचे टिळकांना पत्र. टिळकांचे त्र्यंबकराव जोशी यांना पत्र. (२२।१२।८८), २२,२४।१२।८८
४. टिळकांचे आगरकरांना पत्र २४।१२।८८
५. आगरकरांचे टिळकाना पत्र २६।१२।८८
६. टिळकांचे आगरकरांना पत्र (कार्ड) २६।१२।८८
७. आगरकरांचे त्र्यंबकराव जोशी यांना पत्र १६।११।८९
८. आगरकरांचे प्रा. भानू यांना राजिनाम्याचे पत्र २५।१२।८९

Appendix to Tilak's Resignation of the Life-membership of the D. E. Society.

His H. Balasaheb Holkar was in Poona in December 1888 and desired to present dresses of honour to the editors of the local newspapers and some other gentlemen of the city as is the custom of Native Darbar. Mr. Agarkar and myself had along with several others received invitations to go to the Joshi Hall to receive dresses as editors. But neither of us deemed it proper to go there. The next day Mr. B. A. Gupte who was then H. H. 's A. D. C. sent a word to Mr. Agarkar that he and myself should go to H. H. on the following day. Early next morning (it was I believe Thursday 19th of December) Mr. Agarkar came to me in a carriage and told me that it was for the purpose of taking me to H. H. 's Bungalow. We could easily guess that the invitation was for the presentation of dresses which we did not go to receive at the Joshi Hall and it was settled that we should decline to accept such individual favours. We then went over to H. H. where as anticipated we were offered after some conversation *Rupees 350 each for the dress of honour.* I took the money from H. H. and shortly after withdrew from his presence. Before leaving the Bungalow however, we requested Mr. Gupte to obtain H. H. 's consent to allow us *to distribute the sum amongst the members of our body* in as much as it was not proper that only a member or two thereof *Should receive such favours.* Mr. Gupte kindly obtained Maharaja's sanction to our proposal and we both left Maharaja's quarters satisfied with the result. On our return Mr. Agarkar dropped me at the press while he went to his house and handed over the sum to the school clerk Trimbak rao, who lived in the

same house at the time. The same day I informed my colleagues as to what took place and how we got His H.' S permission to use the sum for all of us. Mr. Agarkar himself was present, when I communicated this information to our friends and when the question of how to dispose of the sum was discussed amongst the life members, he agreed with others in proposing a particular disposal ol the sum. On Sunday evening *22nd December* while I was in the press, I learnt that H. H. had cancelled his previous sanction to distribute the sum of 700 amongst all the life members. Thereupon after consulting my friend Mr. V. B, Kelkar, who was there I wrote a chit (note) to the clerk asking him not to pay any part of the sum of Rs. 700 to anyone without letting me know previously. and to keep the whole sum intact with him. About an hour after I received from Mr. Agarkar Mr. Gupte's letter (marked No.1) addressed jointly to him and myself and opended by Mr. Agarkar whose hands it reached first. This was a request to pay Rs. 400 out of the sum of Rs. 700/ to Mr. Agarkar, in appreciation of his book on "Analysis of sentences in Marathi" which he had then recently published. This request appears to have been the outcome of Mr. Agarkar's appeal for patronising his work, and previously to the receipt of the letter just mentioned. Mr. Agarkar had come to know from Mr. Gupte that the sum to be granted in appreciation of his work was to be paid out of Rs. 700/- *handed over to us the previous day and allowed* at our request to be distributed amongst all the life members. But neither did Mr. Agarkar express his disapproval of the course nor did he offer to withdraw his application for patronising his work if there was no additional money available for the purpose. On receipt of the letter from Mr. Agarkar I drafted a reply to Mr. Gupte (2) and sent it over to Mr. Agarkar for approval with a request that in case he approved of it he should change 'I' into 'We' and signing it himself, sent me the same for signature. As I was writing this draft our clerk Trimbakrao happened to go by the A. B. Press and I called him up and gave him instructions as to how he should enter the same in the account books. I might here mention that I was then in charge of accounts; besides as the whole transaction had passed through my hands I was anxious that it should be properly represented in the account book. I told Trimbakrao to credit the sum in the name of the members of the board received per Mr. Agarkar and myself from H. H. When the draft letter was taken to Mr. Agarkar, he was

extremely wroth and returned the draft to me after two days together with his reply (3) addressed to me. I atonce sent in my explanation (4) but instead of satisfying Mr. Agarkar, it further roused his feeling and I received an epistle (5) from him the next day. This was couched in such a language, as to make it unbearable and to put a stop to such disgraceful correspondence I immediately wrote an open card (6) and posted it to his address. The result was, as I anticipated, and no further correspondence took place. It is needless for me to quote from the letters, which will speak for themselves. They will clearly show first how outside interests, directly or indirectly, clashed with the general interests of the body and secondly to what extent our feelings have been strained in consequence of my taking upon myself the odius task of drawing the attention of the members to cases of such conflict of interests every now and then and protesting against the same. Letters No. 1 to 6 annexed.

No. 1

Copy of the Official letter sent by Mr. B. H. Gupte, A. D. C. to His Highness Maharaj Holkar.

H. H. Maharaj Holkar's Camp,
Poona, 21st December 1888.

My dear Sirs,

I am desired by His Highness Maharaj Holkar to inform you that out of the sum of Rs. 700 paid by His Highness Rs. 400 should be given to Mr. Agarkar in appreciation of his book entitled Vakyamimamsa and Rs. 300 distributed among the ten members of the New English School Association.

Yours faithfully,
(Signed) B. H. Gupte, A. D. C.

Messrs. Agarkar and Tilak, Poona.

No. 2

Poona
